राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

वार्षिक अहवाल

(१ जुलै २०२४ ते ३० जून २०२५)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

वार्षिक अहवाल

प्रकाशक
डॉ. राजू हिवसे
कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

मुद्रक
श्री. प्रवीण गोतमारे
प्रकाशन अधिकारी (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
मुद्रण व प्रकाशन विभाग, नागपूर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या
कलम १३६ अन्वये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा दिनांक ३० जून २०२५ रोजी संपणाऱ्या
वर्षाचा अहवाल



वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

Vandaneeya Rashtrasant Tukadoji Maharaj

आचार्य देवव्रत

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व कुलपती
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
(दिनांक १५-०९-२०२५ पासून)

Acharya Devvrat

Hon'ble Governor, Maharashtra State and
Chancellor, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur
(From 15 - 09 - 2025)

श्री. सी. पी. राधाकृष्णन

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व कुलपती
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
(दिनांक ३१-०७-२०२४ ते ११-०९-२०२५ पर्यंत)

Shri. C. P. Radhakrishnan

Hon'ble Governor, Maharashtra State and
Chancellor, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur
(From 31 - 07 - 2024 Upto 11 - 09 - 2025)



श्री. रमेश बैस

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व कुलपती
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(दिनांक ३०-०७-२०२४ पर्यंत)

Shri. Ramesh Bais

Hon'ble Governor, Maharashtra State and
Chancellor, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur

(Upto 30 - 07 - 2024)

डॉ. मनाली मकरंद क्षीरसागर

कुलगुरू

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(दिनांक ०३-१२-२०२५ पासून)

Dr. Manali Makarand Kshirsagar

Vice-Chancellor

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur

(From 03 - 12 - 2025)

डॉ. (श्रीमती) माधवी खोडे चवरे,

(भा.प्र.से.)

कुलगुरू (अति.प्रभार)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(दिनांक १३-०३-२०२५ ते ०३-१२-२०२५ पर्यंत)

Dr. Madhavi Khode Chaware

Vice-Chancellor (Additional Charge)

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur

(From 13 - 03 - 2025 Upto 03 - 12 - 2025)

डॉ. प्रशान्त बोकारे

कुलगुरू (अति. प्रभार)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
(दिनांक ०५-०७-२०२४ ते १२-०३-२०२५ पर्यंत)

Dr. Prashant Bokare

Vice-Chancellor (Additional Charge)
Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur
(From 05 - 07 - 2024 Upto 12 - 03 - 2025)

डॉ. सुभाष चौधरी

कुलगुरू

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(दिनांक ०४-०७-२०२४ पर्यंत)

Dr. Subhash Chaudhari

Vice-Chancellor (Additional Charge)

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur

(Upto 04 - 07 - 2024)

डॉ. सुभाष कोंडावार

प्र-कुलगुरू (Officiating)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(दिनांक २१-०४-२०२५ पासून)

Dr. Subhash Kondawar

Pro-Vice-Chancellor (Officiating)

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur

(From 21 - 04 - 2025)

प्रा. राजेंद्र काकडे

प्र-कुलगुरू (Officiating)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(दिनांक ३१-१०-२०२४ ते १३-०३-२०२५ पर्यंत)

Dr. Rajendra Kakde

Pro-Vice-Chancellor (Officiating)

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur

(From 31-10 - 2024 Upto 13 - 03 - 2025)

डॉ. संजय दुधे

प्र-कुलगुरू

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(दिनांक २६-०९-२०२४ पर्यंत)

Dr. Sanjay Dudhe

Pro-Vice-Chancellor

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur

(Upto 26 - 09 - 2024)

वार्षिक अहवाल समिती

डॉ. शामराव कोरेटी
अध्यक्ष

डॉ. उमेश पलीकुंडवार
सदस्य

डॉ. मेधा कानेटकर
सदस्य

डॉ. राजश्री वैष्णव
सदस्य

डॉ. प्रकाश ईटनकर
सदस्य

डॉ. अजित जाचक
सदस्य

डॉ. संजय पळवेकर
सदस्य

डॉ. विजय खंडाळ
सदस्य

डॉ. (श्रीमती) मंजुश्री सरदेशपांडे
सदस्य

डॉ. नंदकिशोर करडे
संचालक (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष)
सदस्य–सचिव

डॉ. शैलेंद्र लेंडे
संपादन

अनुक्रमणिका

प्रकरणे

	प्रकरण पहिले
विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे	पृष्ठ क्र. १ ते २४
	प्रकरण दुसरे
दीक्षांत समारंभ	पृष्ठ क्र. २५ ते ३०
	प्रकरण तिसरे
विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संचालित महाविद्यालये	पृष्ठ क्र. ३१ ते ६२
	प्रकरण चौथे
विद्यापीठाचे इतर विभाग	पृष्ठ क्र. ६३ ते ७८
	प्रकरण पाचवे
विद्यापीठ विकास योजना	पृष्ठ क्र. ७९ ते ९०
	प्रकरण सहावे
विद्यापीठातील स्पृहणीय उपक्रम	पृष्ठ क्र. ९१ ते १०२
उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सुचविलेल्या मुद्यांची माहिती	पृष्ठ क्र. ९६ ते १०२
	प्रकरण सातवे
विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय	पृष्ठ क्र. १०३ ते १४४

परिशिष्टे

परिशिष्ट एक - स्नातकोत्तर अभ्यासक्रम	पृष्ठ क्र. १ ते १८
परिशिष्ट दोन - सांख्यिकी सारण्या	पृष्ठ क्र. १९ ते २२
परिशिष्ट तीन - शोधनिबंध	पृष्ठ क्र. २३ ते ३२

अभिनंदन

डॉ. (श्रीमती) माधवी खोडे चवरे (भा.प्र.से.)

महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती यांनी अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ. (श्रीमती) माधवी खोडे चवरे यांच्याकडे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा अतिरिक्त प्रभार दिनांक १३ मार्च २०२५ पासून पुढील आदेशापर्यंत सोपविल्याबद्दल डॉ. (श्रीमती) माधवी खोडे चवरे यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. प्रमोद गोविंदराव येवले

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद गोविंदराव येवले यांची जयपूर येथील राजस्थान आरोग्य विज्ञान विश्वविद्यालय येथे कुलगुरूपदी नियुक्ती झाल्याबद्दल डॉ. प्रमोद गोविंदराव येवले यांचे हार्दिक अभिनंदन.

प्रा. राजेंद्र बळीराम काकडे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधिनिर्माणशास्त्र विभागाचे प्राध्यापक राजेंद्र बळीराम काकडे यांची मा. कुलगुरूंनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्र–कुलगुरूपदी (Officiating) दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी नियुक्ती केल्याबद्दल प्रा. राजेंद्र बळीराम काकडे यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. सुभाष कोंडावार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे प्राध्यापक डॉ. सुभाष कोंडावार यांची मा. कुलगुरूंनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्र–कुलगुरूपदी (Officiating) दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी नियुक्ती केल्याबद्दल डॉ. सुभाष कोंडावार यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. रविशंकर मोर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(ङ) अन्वये मा. कुलगुरूंनी विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्था यांचे प्रमुख किंवा संचालक संवर्गातून डॉ. रविशंकर मोर, प्राचार्य, विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून दिनांक १ सप्टेंबर २०२४ पासून ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंतच्या कालावधीकरिता नामनिर्देशित केल्याबद्दल डॉ. रविशंकर मोर यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. संजय कवीश्वर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(घ) अंतर्गत मा. कुलगुरूंनी डॉ. संजय कवीश्वर, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून नामनिर्देशित केल्याबद्दल डॉ. संजय कवीश्वर यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. शामराव कोरेटी

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(घ) अंतर्गत मा. कुलगुरूंनी डॉ. शामराव कोरेटी, प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून नामनिर्देशित केल्याबद्दल डॉ. शामराव कोरेटी यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. मनोजकुमार डायगव्हाणे

नागपूर येथील शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. मनोजकुमार डायगव्हाणे यांच्याकडे शासनाने तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूरच्या सहसंचालक पदाचा कार्यभार दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून सोपविल्याबद्दल डॉ. मनोजकुमार डायगव्हाणे यांचे हार्दिक अभिनंदन.

श्री. मनिष झोडपे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या लेखा विभागाचे उपकुलसचिव श्री. मनिष झोडपे यांच्याकडे मा. कुलगुरू महोदयांनी विद्यापीठाच्या परीक्षा मूल्यमापन मंडळाच्या संचालक पदाचा अतिरिक्त प्रभार दिनांक ३ मे २०२५ पासून पुढील आदेशापर्यंत सोपविल्याबद्दल श्री. मनिष झोडपे यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. उज्ज्वला डांगे

दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(ञ) नुसार विद्यापरिषदेवरून व्यवस्थापन परिषदेवर निवडून आल्याबद्दल डॉ. उज्ज्वला डांगे यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. क्षितिजा कदम

दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(ञ) नुसार विद्यापरिषदेवरून व्यवस्थापन परिषदेवर निवडून आल्याबद्दल डॉ. क्षितिजा कदम यांचे हार्दिक अभिनंदन.

विनम्र
श्रद्धांजली

मा. डॉ. मनमोहन सिंग

भारताचे माजी पंतप्रधान मा. डॉ. मनमोहन सिंग यांचे दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्षाचे होते. मा. डॉ. मनमोहन सिंग यांचा जन्म दिनांक २६ सप्टेंबर १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील गाह या खेडेगावी झाला होता. त्यांने प्राथमिक शिक्षण पेशावर येथे, उच्च शिक्षण पंजाब विद्यापीठातून झाले होते. १९५७ साली त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली होती. त्यानंतर १९६२ साली डॉ. सिंग यांनी ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी फील संपादन केली होती.

मा. डॉ. मनमोहन सिंग यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, भारताच्या योजना आयोगाचे उपाध्यक्ष, राज्यसभेचे सदस्य इत्यादी पदे भूषविली होती. १९९१ ते १९९६ या कालावधीत डॉ. सिंग यांनी भारताचे अर्थमंत्रीपद भूषविले होते. भारताच्या आर्थिक सुधारणा अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष धोरण तयार करण्यात सिंग यांची भूमिका जगभरात नावाजली जाते. दिनांक २२ मे २००४ रोजी पार पडलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीनंतर डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताच्या पंतप्रधान पदाची शपथ घेतली होती. ते भारताचे १३ वे पंतप्रधान होते. त्यानंतर त्यांनी सन २००९ मध्ये दुसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान पदाची शपथ घेतली होती. भारत सरकारद्वारे त्यांना पद्मविभूषण व केम्ब्रिज विद्यापीठाद्वारे ॲडम स्मिथ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

मा. डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देश व समाज एका अनुभवी आणि कुशल अर्थशास्त्रज्ञ व प्रशासकापासून मुकलेला आहे.
स्व. मा. डॉ. मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

मा. श्री. एस. एम. कृष्णा

महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल व विद्यापीठांचे माजी कुलपती मा. श्री. एस. एम. कृष्णा यांचे दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्षाचे होते. मा. श्री. एस. एम. कृष्णा यांचा जन्म कर्नाटक राज्यातील मांड्या जिल्ह्यातील सोमानाहाल्ली या गावी दिनांक १ मे १९३२ रोजी झाला होता. त्यांनी आपले स्नातक पर्यंतचे शिक्षण मैसूरच्या महाराजा कॉलेज मधून, तर विधीची पदवी बँगलोर येथील शासकीय महाविद्यालयातून पूर्ण केले होते. श्री. एस. एम. कृष्णा यांनी १९९९ ते २००४ या कालावधीत कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून कार्य केले होते. २००९ ते २०१२ पर्यंत त्यांनी भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणून कार्य सांभाळले होते. अत्यंत कुशल प्रशासक म्हणून त्यांची ख्याती होती. मा. श्री. एस. एम. कृष्णा यांच्या निधनाने देश व समाज एका अनुभवी आणि कुशल प्रशासकापासून दुरावलेला आहे.
स्व. मा. श्री. एस. एम. कृष्णा यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

डॉ. सुभाष रामभाऊ चौधरी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. सुभाष रामभाऊ चौधरी यांचे गुरूवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० च्या सुमारास अल्पशः आजाराने खाजगी रुग्णालयात दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५९ वर्षाचे होते. डॉ. सुभाष चौधरी यांचा जन्म अत्यंत गरीब कुटुंबात दिनांक १८ मे १९६५ रोजी नागपूर येथील शनिवार पेठ येथे झाला होता. त्यांनी आपले शालेय शिक्षण कॉटन मार्केट येथील महात्मा जोतिबा फुले प्राथमिक शाळेतून, तर बारावी पर्यंतचे शिक्षण धंतोली येथील मुळे महाविद्यालयातून आणि स्नातक अभियांत्रिकीचे शिक्षण नागपूर विद्यापीठातून पूर्ण केले होते. तदनंतर ते सर्वप्रथम बापुराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालय येथे दिनांक ५ डिसेंबर १९८८ रोजी अधिव्याख्याता म्हणून रूजू झाले होते.

दिवंगत डॉ. सुभाष चौधरी यांनी दिनांक ८ ऑगस्ट २०२० रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून सूत्रे सांभाळली होती. तत्पूर्वी ते जे. डी. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर येथे प्राचार्यपदी कार्यरत होते. त्यांनी आपल्या कुलगुरू पदाच्या कालावधीत विद्यापीठात विविध विशिष्ट व उल्लेखनीय कार्य पार पाडलीत. त्यात आपल्या विद्यापीठाला नॅकद्वारे 'अ' दर्जा प्राप्त झाला. विद्यापीठाच्या शताब्दी वर्षात अनेक कार्यक्रम पार पाडण्यात आलेत, विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागांना स्वायत्तता दर्जा प्रदान करण्यात आला, इंडियन सायन्स काँग्रेसचे आयोजन आपल्या विद्यापीठात दुसऱ्यांदा करण्याची संधी मिळाली, इंडियन फार्मास्यूटिकल सायन्सचे आयोजन, शताब्दी महोत्सवानिमित्त शासनाद्वारे १०० कोटी रुपयाचा निधी प्राप्त झाला, आंतरराष्ट्रीय दर्जाचे मल्टीयुटीलिटी मल्टीस्टोरेज स्पोर्ट कॉम्प्लेक्स, इंटरनॅशनल दर्जाचे सिंथेटीक ट्रॅकचे बांधकाम पूर्ण करण्यात आले, सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्कसह अन्य नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यापीठात त्यांच्या नेतृत्वात आरंभ झालेत. विद्यापीठात समाज विकासाचे माध्यम मानत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी दिलेल्या ग्रामविकासाच्या संदेशाचे पालन करीत त्यांनी 'रिचिंग टू अनरिच्ड' अभियान राबविण्यास सुरूवात केली. विद्यापीठाद्वारे आयोजित कोणत्याही बैठका ते पूर्णत: अभ्यासपूर्वकरित्या हाताळीत होते. जनमानसात आपल्या प्रशासकीय कौशल्य व प्रेमळ स्वभावामुळे ते सुप्रसिद्ध होते. विद्यापीठाच्या प्रशासनात त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आपले कामकाज सांभाळले आहे.
डॉ. सुभाष चौधरी यांच्या मृत्युमुळे विद्यापीठ शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शकाला व एका कुशल प्रशासकाला मुकले आहे.
स्व. डॉ. सुभाष चौधरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

डॉ. योगानंद काळे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी प्र–कुलगुरू डॉ. योगानंद काळे यांचे दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८५ वर्षाचे होते. डॉ. योगानंद काळे यांचा जन्म सन १९४० मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेडा येथे झाला होता. त्यांनी १९९० ते १९९५ पर्यंत एम.पी. देव स्मृती धरमपेठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून, तर दिनांक २२ ऑगस्ट १९९५ ते २४ एप्रिल १९९७ आणि त्यानंतर दिनांक ७ जुलै १९९७ ते १९ जुलै १९९९ पर्यंत नागपूर विद्यापीठाचे प्रथम प्र–कुलगुरू म्हणून कार्य केले होते. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि अभ्यासक म्हणून त्यांची ख्याती होती. ते एक प्रभावी वक्ते, समर्पित शिक्षक, कुशल प्रशासक आणि विद्यार्थ्यांचे आवडते प्राध्यापक म्हणून ओळखले जात होते.

'विदर्भाचा आर्थिक अनुशेष' या विषयावरील त्यांच्या संशोधन प्रबंधाला लक्षणीय मान्यता मिळाली होती आणि आता सुद्धा तो एक मौल्यवान संदर्भ मानला जात आहे. त्यांनी स्थानिक नियतकालिकांमध्ये समकालीन आर्थिक मुद्यांवर विस्तृत लेखन केले आहे. विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके लिहिली. शिमला येथील प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हांस स्टडीजच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. डॉ. काळे यांचा अनेक सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांशी निकटचा संबंध होता. संपूर्णपणे निरहंकारी व विनम्र वृत्तीने त्यांनी विद्यापीठाकरिता व समाजाकरिता कार्य केले होते. डॉ. काळे यांच्या निधनाने विद्यापीठ व समाज एक कुशल शिक्षक व सामाजिक विचारवंतापासून मुकले आहे.
स्व. डॉ. योगानंद काळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

डॉ. पी. एस. जी. कुमार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते ज्ञानस्त्रोत केंद्राचे माजी संचालक डॉ. पी. एस.जी. कुमार यांचे दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७९ वर्षांचे होते.

डॉ. पी. एस. जी. कुमार यांचा जन्म दिनांक ९ जून १९४६ रोजी गुंटूर जिल्ह्यातील बाबटला या गावी झाला होता. त्यांनी बाबटला येथील कृषी महाविद्यालयातून बी. एस्सी. ची पदवी प्राप्त केली होती. तद्नंतर त्यांनी बी. लिब. व एम. लिब. आंध्रा युनिव्हर्सिटीमधून तर पीएच. डी. गुलबर्ग विद्यापीठातून प्राप्त केली होती. त्यांनी लायब्रेरी इंडियन असोसिएशनचे अध्यक्षस्थान भुषविले होते. काही काळ त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिव पदाचा अतिरिक्त प्रभार देखील सांभाळला होता. त्यांचे ६५ पुस्तके, २३० पेपर्स आणि १८ अहवाल प्रकाशित झाले होते. ग्रंथालय क्षेत्रात त्यांचे मानाचे स्थान होते.

डॉ. पी. एस. जी. कुमार यांच्या मृत्यूमुळे विद्यापीठ शिक्षण क्षेत्रातील व ग्रंथालय क्षेत्रातील एक तज्ज्ञ मार्गदर्शकापासून समाज मुकला आहे. स्व. डॉ. पी. एस. जी. कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

ॲड. धनंजय मंडलेकर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य ॲड. धनंजय मंडलेकर यांचे दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी दुख:द निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८३ वर्षे होते. विद्यापीठाच्या अधिसभेवर सदस्य म्हणून कार्यरत असतांना शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे प्रश्न ते अधिसभेपुढे अत्यंत पोटतिडकीने मांडत होते. विद्यापीठाच्या विविध समित्यांवर ते कार्यरत होते. विद्यापीठाच्या अनेक कार्यात त्यांच्या अनुभवाचे मोलाचे सहकार्य विद्यापीठास प्राप्त झाले होते. ॲड. धनंजय मंडलेकर यांच्या निधनाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राची फार मोठी हानी झाली आहे.

स्व. मा. ॲड. धनंजय मंडलेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

डॉ. रामदास भगवानजी आंबटकर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद व अधिसभेचे माजी सदस्य डॉ. रामदास भगवानजी आंबटकर यांचे दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ वर्षांचे होते.

डॉ. रामदास आंबटकर यांनी बीएएमएस पदवी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून प्राप्त केली होती. ते विधानपरिषदेचे माजी सदस्य होते. त्यांनी २००० ते २००५ या कालावधीत विद्यापीठ अधिसभा, व्यवस्थापन परिषद, स्थायी समिती व इतर विविध समित्यांवर कार्य केले होते. समाजातील तळागाळातील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी त्यांनी कायम आवाज उठविला होता.

विद्यापीठाच्या बऱ्याच विकासात्मक कामामध्ये डॉ. आंबटकर यांचा मोलाचा वाटा होता. विद्यार्थ्यांच्या हितकार्यासाठी अखेरपर्यंत झटणारे असे ते ऋषितुल्य मार्गदर्शक होते. लोकसंग्रहाचे ते धनी होते. डॉ. आंबटकर यांच्या निधनाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील एक अभ्यासू व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेल्यामुळे विद्यापीठ व समाज एका उत्तम मार्गदर्शकाला पारखे झाले आहे.

स्व. डॉ. रामदास भगवानजी आंबटकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

श्री. हेमंत ठाकरे

विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य व अभियांत्रिकी विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता श्री. हेमंत ठाकरे यांचे दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६२ वर्षांचे होते.

श्री. हेमंत ठाकरे यांचा जन्म दिनांक १२ एप्रिल १९६२ रोजी नागपूर जिल्ह्यातील कारंजा बहिरम येथे झाला होता. त्यांचे प्राथमिक शिक्षण नागपूर येथील सी. पी. अँण्ड बेरार महाविद्यालय, उच्च शिक्षण शिवाजी सायन्स कॉलेज, नागपूर आणि त्यांचे बी. ई. व एम. ई. चे शिक्षण व्ही. एन. आय. टी., नागपूर येथे झाले होते. शिक्षण आटोपल्यानंतर ते प्राध्यापकपदी वायसीसीई येथे रूजू झाले होते. त्यांनी विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य आणि अधिष्ठाता, अभियांत्रिकी विद्याशाखा म्हणून कार्य केले होते. श्री. हेमंत ठाकरे यांच्या निधनाने विद्यापीठ व समाज एका अनुभवी आणि कुशल प्रशासकाला मुकला आहे. स्व. श्री. हेमंत ठाकरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

डॉ. निलिमा देशमुख

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील लोकप्रशासन विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. निलिमा देशमुख यांचे दिनांक १८ मे २०२५ रोजी दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७१ वर्षांचे होते.

डॉ. निलिमा देशमुख यांचा जन्म २९ जून १९५४ रोजी झाला होता. त्यांनी आपले स्नातक व स्नातकोत्तर शिक्षण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून पूर्ण केले होते. तसेच डी. लीट ही पदवी देखील विद्यापीठातून प्राप्त केली होती. त्यांनी लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्य केले होते. त्यांनी विद्यापरिषद, अधिसभा, परीक्षा व मूल्यमापन मंडळ आणि इतर विविध प्राधिकरण व समित्यांवर कार्य केले होते. त्यांनी भारतातील इतर विद्यापीठांच्या देखील विविध प्राधिकरण व समित्यांवर कार्य केले होते.

त्यांचे अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय रिसर्च जर्नल्स प्रकाशित झाले होते. सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान होते. डॉ. निलिमा देशमुख यांच्या निधनाने विद्यापीठ व समाज एक कुशल शिक्षक व सामाजिक विचारवंतापासून मुकले आहे.

स्व. डॉ. निलिमा देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

डॉ. सुरेश चंद्रकांत मसराम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. सुरेश चंद्रकांत मसराम यांचे दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी अल्पशः आजाराने दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५० वर्ष होते.

डॉ. सुरेश मसराम यांचा जन्म चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे झाला होता. त्यांनी आपले पदव्युत्तर शिक्षण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून पूर्ण केले होते. ते विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात सहायक प्राध्यापक म्हणून दिनांक १० जून २०११ रोजी रुजू झाले होते. विद्यापरिषदेचे सदस्य व प्राणीशास्त्र अभ्यासमंडळाचे ते अध्यक्ष होते. विद्यापीठाच्या सीएसआयआर विभागाच्या मानद संचालक पदाचा अतिरिक्त प्रभार देखील ते सांभाळीत होते. डॉ. सुरेश मसराम यांच्या मृत्यूमुळे अत्यंत मनमिळावू आणि प्राणीशास्त्र विषयातील एका तज्ज्ञ व्यक्तीपासून विद्यापीठ व समाज मुकला आहे. स्व. डॉ. सुरेश मसराम यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

दानवीर श्री. रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण

Generous Donor Shri. Rao Bahadur D. Laxminarayan

कृतज्ञता

अहवाल कालावधीत पुढील दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी विद्यापीठाला देणग्या दिल्या आहेत. विद्यापीठ या सर्वांप्रती कृतज्ञ आहे.

डॉ. (श्रीमती) राखी व्यंकटेश व्याघ्रा, नागपूर यांचेकडून "स्व. व्यंकटेश रमेश व्याघ्रा सुवर्णपदक" निधी स्थापन करण्याकरिता रु. ३,००,०००/– (रुपये तीन लक्ष फक्त) ची देणगी विद्यापीठाला प्राप्त झाली.

डॉ. श्रीकांत कोमावार, नागपूर यांचेकडून "निखिल, स्नेहल, श्रीमती लक्ष्मीबाई व अरुणा कोमावार आंतरराष्ट्रीय संस्था सुवर्णपदक" निधी स्थापन करण्याकरिता रु. ३,००,०००/– (रुपये तीन लक्ष फक्त) ची देणगी विद्यापीठाला प्राप्त झाली.

श्री. दिलीप चिंतामण महाशब्दे, अध्यक्ष विश्वनाथ चिंतामण महाशब्दे चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर यांचेकडून "विश्वनाथ चिंतामण महाशब्दे सुवर्णपदक" (दोन पदके) निधी स्थापन करण्याकरिता रु. ६,००,०००/– (रुपये सहा लक्ष फक्त) ची देणगी विद्यापीठाला प्राप्त झाली.

श्री. मिलिंद रघुनाथराव साखरकर, वर्धा यांचेकडून "श्री. रघुनाथराव साखरकर सुवर्णपदक" निधी स्थापन करण्याकरिता रु. ३,००,०००/– (रुपये तीन लक्ष फक्त) ची देणगी विद्यापीठाला प्राप्त झाली.

अध्यक्षीय मनोगत

सत्र १ जुलै, २०२४ ते ३० जून, २०२५ या कालखंड विद्यापीठासाठी अतिशय जलद घडामोडीचा राहिला. विद्यापीठ प्रशासकीय व्यवस्थेत अनेक बदल होत राहिले तरीही विद्यापीठ प्रशासन अतिशय गतिशील व सकारात्मक उपक्रमाना प्राधान्य देत विकासाभिमुख राहिले.

४ ऑगस्ट विद्यापीठाचा वर्धापन दिन यावेळेचा विशेष होता. मागील दोन वर्षापासून विद्यापीठ शताब्दी महोत्सव साजरा करीत होता, त्याची सांगता ह्यावर्षी झाली. पद्मविभूषणडॉ. रघुनाथ माशेलकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर मा. नितीन गडकरींची विशेष उपस्थिती होती.

ह्या शैक्षणिक सत्रात मागील वर्षभरापासून विविध उपक्रम राबविले गेले. विविध व्याख्यानमाला, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा याव्यतिरिक्त माजी शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा स्नेह मेळावा, माजी विद्यार्थी महामेळावा सुद्धा यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.

हा संपूर्ण कार्यक्रम राबवितांना विद्यापीठाच्या अफाट क्षमतेचे दर्शन होत असतानाच मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे दु:खद निधन झाले व विद्यापीठाचा कार्यभार मा. कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे सोपविण्यात आला. शिवाय डॉ. राजेंद्र काकडे यांच्याकडे प्रभारी प्र.कुलगुरूची जबाबदारी देण्यात आली.

अशा परिस्थितीत ही विद्यापीठाची यशोगाथा कायम राहिली. 'इंद्रधनुष्य' सारख्या उपक्रमात विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी अनेक पुरस्कार प्राप्त केले. संशोधनाच्या क्षेत्रात विद्यापीठाला DST कडून ११.४२ कोटींचे अनुदान प्राप्त झाले. शिवाय ANRF पेअर अंतर्गत विद्यापीठाला ६ कोटी रूपयाचा संशोधन निधी प्राप्त झाला.

ह्यातच ११२ वा दीक्षांत समारंभ पार पडला. मा. राज्यपाल व तत्कालीन उपराष्ट्रपती श्री. सी. पी. राधाकृष्णन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

विद्यापीठातील विविध विभागाद्वारे विद्यार्थी हिताचे विविध उपक्रम राबविण्याचे सत्र सुरूच होते. अशातच प्रथमच विद्यापीठात नागपूर फिल्म फेस्टिवलचे यशस्वी आयोजन करण्यात आले. युवकांसाठी तर हे वर्ष पर्वणीचे होते. युवारंगात हास्यजत्रा फुलली, त्यात विद्यार्थ्यांचा विक्रमी सहभाग राहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय येथे शताब्दी महोत्सवाचे थाटात उद्घाटन मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व मा. मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत पार पडले.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी अॅडव्हांटेज विदर्भ . २०२५ चा लाभ घेतला. शिवाय या वर्षात विद्यापीठाने अनेक नामवंत विदेशी विद्यापीठासोबत व काही महत्वाच्या संस्थेसोबत करार केले.

ह्यातच पुन्हा शैक्षणिक वर्ष सरतेपूर्वी प्रशासकीय बदल होऊन मा. प्रशांत बोकारे यांच्या जागी डॉ. माधवी खोडे चवरे, अतिरिक्त डिविजनल कमिशनर यांच्याकडे कुलगुरू पदाचा भार सोपविण्यात आला.

विद्यापीठ आपल्या गतिशीलतेत कुठेच खंड पडू दिला नाही. भारत युवा संसद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या १०० वर्षाचा इतिहास पुस्तकांचे विमोचन करण्यात आले. विद्यापीठ परिक्षेत्रात ४ ठिकाणी सुविधा केंद्र उभारण्यात आले. ह्यात अधिसभा सदस्यांची महत्वाची भूमिका राहिली.

विद्यापीठात संविधानाची ७५ वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने अनेक कार्यक्रम राबविले गेले. अनेक नामवंत कंपन्यांनी विद्यापीठात प्लेसमेंट ड्राईव्ह राबविल्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त झाला. विद्यापीठ लॉ कॉलेजचे एकत्रिकरण होऊन 'स्कुल ऑफ लॉ' अस्तित्वात आले. शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय येथे तत्कालीन सरन्यायाधिश श्री. भूषण गवई यांच्या हस्ते भारतातील पहिल्या संविधान पार्कचे उद्घाटन थाटात झाले. वर्षाचा शेवट पाणी परिषदेने झाला.

प्रस्तुत अहवालात आपल्या पूर्वोक्त परिपाठीप्रमाणे विद्यापीठाच्या बृहत व विविध शाखा प्रशाखांची विस्तृत विवरणासह तथ्यात्मक माहिती देण्यात आली आहे. सदर अहवालात विविध माहितीची प्रकरणश: रचना करण्यात आली असून ती पुढीलप्रमाणे आहे.

प्रकरण १ . विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे : अहवालाच्या पहिल्या प्रकरणात विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे यात समाविष्ट व्यक्तिंबाबतची माहिती उद्धृत केली आहे.

प्रकरण २ . दीक्षांत समारंभ : विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ हा विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांची फलश्रुती दर्शविणारा महत्त्वपूर्ण कार्यक्रम असतो. कार्यक्रमाला येणारे प्रमुख पाहुणे आणि त्यांनी मार्गदर्शनपर भाषणे तरुण विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच असते. विद्यार्थ्यांसाठी आपल्या शैक्षणिक उपलब्धतेबद्दल अभिमानाने बाळगण्याचा हा दिवस असतो. अहवालात समाविष्ट महाराष्ट्राचे मा. राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन ह्यांचे दीक्षांत भाषण व मा. प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे ह्यांचे प्रास्ताविक व स्वागतपर भाषण वाचकांसाठी उपयुक्त होतील.

प्रकरण ३ . विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संचालित महाविद्यालये : विद्यापीठाचा शैक्षणिक भार उचलणे आणि विद्यापीठाचे ध्येय व उद्दिष्टे गाठण्यासाठी विद्यापीठातील सर्व विभाग मोलाची भूमिका बजावित असतात. येथे कार्यरत विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकाच्या अध्ययन, अध्यापन व संशोधन कार्यामुळे विद्यापीठाचा नावलौकिक वाढतो. विविध विभागांनी वर्षभर राबविलेल्या विविध कार्यक्रमाबाबतची यथायोग्य माहिती तिसऱ्या प्रकरणाच्या माध्यमातून वाचकांना होऊ शकेल.

प्रकरण ४ . विद्यापीठाचे इतर विभाग : ग्रंथालय, वसतिगृहे, उद्यान इत्यादिनी आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध करून विद्यापीठात शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यात मोलाची कामगिरी बजाविली आहे. आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाने अनेक समाजाभिमुख उपक्रम राबविले आहेत. अनेक अल्पकालीन अभ्यासक्रम या विभागामार्फत राबविण्यात येतात. उद्यमशीलता आणि कौशल्यविकास यावर नव्या शैक्षणिक धोरणाचा व शासनाचा भर आहे. त्याअनुषंगाने विभागाने अनेक अभ्यासक्रमाची आखणी करून संलग्नित महाविद्यालयाच्या मदतीने अभ्यासक्रम राबविले आहेत. प्रकरण चारच्या माध्यमातून या विविध विभागाच्या यशोगाथा व योगदान वाचकांना प्राप्त होऊ शकेल.

प्रकरण ५. विद्यापीठ विकास योजना : विद्यापीठातील संशोधन कार्याला पूरक असा हा विभाग आहे. प्राध्यापकांनी राबविलेल्या विविध प्रकल्पांचा संपूर्ण लेखाजोखा हा विभाग ठेवतो. संशोधन प्रकल्पाशिवाय चर्चासत्रे, परिषदा ह्यामध्ये सहभागी होणाऱ्या प्राध्यापकांना वित्तीय सहायता प्राप्त करून देणे किंवा विविध संस्थांशी समन्वय साधून संशोधन कार्य सुकर करण्यात या विभागाचा महत्त्वपूर्ण योगदान आहे. ह्यामुळे विद्यापीठाची पत वाढविण्यास मदतच होते. विद्यापीठात सादर झालेले शोधप्रबंध ग्रंथरुपात प्रकाशित करण्यासाठी संशोधकांना अनुदानदेखील देण्यात येते. पाचव्या प्रकरणातून या संदर्भातील माहितीचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण ६. विद्यापीठातील स्पृहणीय उपक्रम : विद्यापीठाला सातत्याने समाजातील दानदात्यांनी भरभरून आर्थिक मदत करून व्याख्यानमालांचे आयोजन करण्यास प्रोत्साहित केले आहे. या व्याख्यानांचा लाभ शिक्षक आणि विद्यार्थ्यांव्यतिरिक्त समाजातील विविध घटकांना होतो. विद्यार्थ्यांना या व्याख्यानमालेच्या माध्यमातून नवनवीन माहिती मिळावी व विविध विषयांवर त्यांना चिंतन मंथन करता यावे, याकरिता विद्यापीठाद्वारे असे अनेक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती वाचकांना प्रकरण सहाच्या माध्यमातून होऊ शकेल.

प्रकरण ७ . विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये : शंभरी पार केलेल्या विद्यापीठात संलग्नित महाविद्यालयांची संख्या सुद्धा अफाट आहे. या संलग्नित महाविद्यालयाच्या उपलब्धतेमुळेही विद्यापीठाचा दर्जा उंचावत असतो. त्यामुळे या महाविद्यालयांनी हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती वाचकांपर्यंत संक्षिप्त स्वरुपात का होईना पोहचावी म्हणून प्रकरण सातवे तसेच परिशिष्टे, सांख्यिकी सारण्या माहिती स्वरूपात देण्यात आलेल्या आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानवविज्ञान विद्याशाखा आणि आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अशा वेगवेगळ्या विद्याशाखांतील विविध विषयांच्या लाखो विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे, सर्वांच्या सहकार्याने व सामंजस्याने ते यशस्वीपणे पेलण्यात विद्यापीठाला यश आले आहे. यासाठी विद्यापीठातील पदाधिकारी व प्राध्यापक यांनी अविरत प्रयत्न केले आहेत.

विद्यापीठाने राबविलेल्या अनेक उपक्रमांचा पुरावा छायाचित्रांच्या माध्यमातून प्राप्त होऊ शकेल दीर्घकाळपर्यंत हा विद्यापीठाचा चित्ररूप ठेवाच असतो. दीक्षांत समारंभ, वर्धापन दिन, समाजप्रबोधन व्याख्यानमाला यासोबतच विविध कार्यशाळा, चर्चासत्रे, सामंजस्य करार आदी ऐतिहासिक क्षणांना टिपणारी छायाचित्रे प्रस्तुत अहवालात प्रदर्शित करण्यात आली आहे. या सर्व अद्यावत माहितीचा उपयोग आपल्या विद्यार्थ्यांपासून ते पालकांपर्यंत सर्वच विद्यापीठ घटकांना होत असतो.

प्रस्तुत अहवालाचा एक विशेष म्हणजे ह्यात विद्यापीठाचा ११२ वा दीक्षांत समारंभातील मान्यवर पाहुण्यांची भाषणे, ह्या समारंभाची क्षणचित्रे आणि अन्य माहिती संकलीत करण्यात आली आहे. त्यातून आपल्याला आपल्या विद्यापीठाची गौरवमयी व समृद्ध परंपरा अधिक युगानुकुल आणि अधिक सुदृढ झालेली दिसते.

हा अहवाल तयार करण्याकरिता अर्तगत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) विभागाचे संचालक डॉ. नंदकिशोर करडे, सांख्यिकी शाखेतील त्यांचे सहकारी सौ. विद्या फटिंग, श्री. अनिकेत गभने यांनी एकवटून व अतिशय झटून अहवालकार्य पूर्णत्वास नेले. तसेच विद्यापीठाचे सर्व पदव्युत्तर विभाग, प्रशासकीय विभाग, संलग्नित महाविद्यालये, वार्षिक अहवाल समितीचे सर्व सन्माननीय सदस्य, संपादक मंडळ, विद्यापीठाचे प्रकाशन अधिकारी (अति.कार्य) श्री. प्रवीण गोतमारे तसेच त्यांचे सहकारी श्री. प्रेमानंद खरड, श्री. सुभाष मालापुरे, श्री. धर्मपाल धाबर्डे ह्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. अत्यंत देखणे व अर्थपूर्ण मुखपृष्ठ साकारणारे कलावंत श्री. अभय कोंडेवार या सर्व कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

अहवालाच्या स्वरूपात सहजता व नेटकेपण आणण्याचे कसब अनुभवी संपादन डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी आत्मसात केल्याने विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे संपादनकार्य सुकर झाले.त्यांच्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच सन्माननीय कुलगुरू, प्र.कुलगुरू आणि कुलसचिव ह्यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले आहे. त्याकरिता त्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रस्तुत अहवालाच्या माहिती संकलनात आणि संपादनात सहकार्य करणाऱ्या अहवाल समितीतील सर्व सदस्यांचे मी साभार अभिनंदन करतो आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हया २०२४–२०२५ च्या अहवाल पुस्तिकेचे सर्व विद्यापीठ क्षेत्रीय घटक उत्साहाने स्वागत करतील असा विश्वास व्यक्त करतो.

डॉ. शामराव कोरेटी
अध्यक्ष
वार्षिक अहवाल समिती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ कार्यक्षेत्र

Jurisdiction of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

नागपूर–वर्धा–भंडारा व गोंदिया जिल्हा

Nagpur, Wardha, Bhandara & Gondia District

2024-2025

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ कार्यक्षेत्र
Jurisdiction of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

जळगांव जिल्हा (Jalgaon District)

2024-2025

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ : एक दृष्टिक्षेप

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची स्थापना ८ ऑगस्ट, १९२३ रोजी झाली. आपले विद्यापीठ मध्य भारतातील सर्वांत जुने विद्यापीठ आहे. केवळ कला, विज्ञान, विधी आणि शिक्षण या चार विद्याशाखा नागपूर, जबलपूर आणि अमरावती येथील सहा महाविद्यालये व त्यात शिकणारे ९१७ विद्यार्थी यांच्यापासून हे विद्यापीठ सुरू झाले. विद्यापीठ मोठ्या निष्ठापूर्वक उच्च शिक्षण प्रसाराचे कार्य करीत आहे. या विद्यापीठाचा आजचा विशाल विस्तार सर्वांना स्तिमित करणारा आहे.

या विद्यापीठातून सागर, जबलपूर, अमरावती, गडचिरोली इत्यादी विद्यापीठे वेगळी झाल्यावर त्याचा भौगोलिक विस्तार कमी झाला असला तरी पूर्व विदर्भातील या विद्यापीठात ५१५ संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठाचे ४० पदव्युत्तर शैक्षणिक विभाग आणि ३ संचालित महाविद्यालये यामधून दरवर्षी जवळपास ४ लक्ष विद्यार्थी आजमितीला शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यापीठात जवळजवळ सर्व प्रकारचे व्यावसायिक व पारंपरिक शिक्षण माफक शैक्षणिक शुल्क आकारून प्रदान केले जाते.

आपल्या विद्यापीठाला उच्च दर्जाची शैक्षणिक परंपरा ज्याप्रमाणे प्राप्त झाली आहे. त्याप्रमाणे राष्ट्रीय व सामाजिक कार्याचीही मौलिक परंपरा लाभली आहे. राष्ट्रीय चळवळीच्या मुख्य प्रवाहात विद्यापीठाने निरंतर योगदान दिले आहे. १९३०-३२ च्या दरम्यान असहकारिता आंदोलन सुरू असताना विद्यापीठाचे विधी महाविद्यालय जवळजवळ दोन महिने बंद होते. *'वंदे मातरम्'* चळवळीत भाग घेण्याची शिक्षा म्हणून काढून टाकलेल्या उस्मानिया विद्यापीठाच्या जवळजवळ १५० विद्यार्थ्यांना विशेष वर्गात दाखल करून त्यांचे शैक्षणिक नुकसान आपल्या विद्यापीठाने टाळले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात दीक्षांत समारंभात निर्भयपणे आपल्या तत्कालीन राष्ट्रीय नेत्यांना दीक्षांत समारंभाची भाषणे देण्याकरिता विद्यापीठाने सन्मानपूर्वक निमंत्रित केले होते.

आपल्या विद्यापीठाचे मुख्य ग्रंथालय व विद्यापीठ परिसरातील ग्रंथालय ह्यांचे पूर्णपणे संगणकीकरण झालेले असून विद्यापीठ परिसरातील ग्रंथालयात, सुसज्ज अशी आंतरजाल प्रयोगशाळा तयार करण्यात आली आहे. तिच्यात १०० संगणक असून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या ग्रंथालय सेवा या प्रयोगशाळेद्वारा प्राप्त होऊ शकतात. विद्यापीठाच्या ग्रंथालयात आजमितीला ४,२१,०२१ ग्रंथ, १४,३१३ हस्तलिखिते, १८,८१७ पीएच. डी. चे शोधप्रबंध, १३४४ ई-बुक व ३६,९३५ नियतकालिकांचे बांधीव खंड आहेत.

प्रत्येक ज्ञानशाखेतील शिक्षणाची ध्येये आणि उद्दिष्टे निश्चित करून अध्ययनाचा अनुभव देणारे आदर्श अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केले आहेत. तसेच विद्यापीठाच्या व्यापक विकासासाठी काही नव्या विभागांची, केंद्रांची आणि अभ्यासक्रमांची निर्मिती विद्यापीठाने केली आहे. सत्र २०११-१२ पासून मॉलिक्युलर बॉयोलॉजी अँण्ड जेनेटिक इंजिनिअरिंग, वाणिज्य, पदव्युत्तर बुद्धिस्ट स्टडीज आणि पदव्युत्तर जनसंवाद हे विभाग, २०१२ - २०१३ पासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा व उर्दू विभाग हे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. अगदी अलीकडे समाजकार्य आणि भूगोल या विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक मदतीतून, डिसेंबर, २०१९ पासून विद्यापीठात भगवान श्रीचक्रधर स्वामी अध्यासन सुरू झाले आहे.

सन २००५ ला विद्यापीठाला 'राष्ट्रसंताचे नाव' प्राप्त झाल्यापासून एक वेगळीच झळाळी या विद्यापीठाला प्राप्त झाली आहे. आपले विद्यापीठ सुरुवातीपासूनच राष्ट्रीय आणि सामाजिक बांधीलकी जपणारे विद्यापीठ आहे. वंदनीय महाराजांचे नाव विद्यापीठाला मिळ्यापासून वेगासमोर असणाऱ्या राष्ट्रीय आणि सामाजिक उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी विद्यापीठ सतत जागरूक असले. महाराजांच्या मनात असलेल्या समाजाभिमुख नवभारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यापीठ बचनबद्ध आहे. महाराजांच्या कार्याची प्रेरणा सातत्याने विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून विद्यापीठ परिसरात महाराजांचा पुतळा स्थानापन्न करण्यात आला आहे. महाराजांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनातर्फे कुशलतापूर्वक सुरू आहे. स्नातकोत्तर पातळीवरील 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा' हा अभ्यासक्रम पुढील कालखंडात निश्चितच लक्षणीय ठरणार आहे. विद्यापीठात अलीकडे भगवान चक्रधर स्वामी अध्यासन सुरू झाले असून पुढील कालखंडात हे अध्यासन अधिकाधिक विकसित होत जाणार आहे. विद्यापीठाच्या डॉ. वि. भि. कोलते ग्रंथालय परिसरामध्ये 'आंतरराष्ट्रीय बौद्ध अध्ययन केंद्रा'ची भव्य व प्रशस्त वास्तू आकारास आलेली असून हे आंतरराष्ट्रीय बौद्ध अध्ययन केंद्र आगामी काळात मध्यभारतातील एक दर्जेदार व ख्यातिप्राप्त अध्ययन केंद्र ठरणार आहे.

काही वर्षांमध्ये 'रोबोटिक टेक्नॉलॉजी' ह्या अभिनव अभ्यासक्रमाला सुरुवात झाली. त्याचप्रमाणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये 'फॉरेन्सिक सायन्स' हा पदवी अभ्यासक्रम सुरू केला आहे. नागपूरजवळच उभारण्यात येत असलेल्या मिहान प्रकल्पाकरिता नवीन अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. विदेशी विद्यापीठाच्या सहकार्याने ड्युएल डिग्री, उद्योगसंस्थांच्या आणि तज्ज्ञांच्या मदतीने विशिष्ट विषयांचे अभ्यासक्रम, उच्चस्तरीय प्रशिक्षण आणि संशोधन यासंदर्भात

विद्यापीठ प्रयत्नशील आहे. टेक्नॉलॉजी पार्क फॉर टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट अॅन्ड ट्रान्सफर इनोव्हेशन अॅण्ड इन्क्युबेशन सेंटर, ह्युमन रिसोर्स ट्रेनिंग इत्यादी प्रकल्प उद्योजकांच्या सहकार्याने राबविण्याचा आणि नावीन्यपूर्ण असा एम. टेक. पाच. डी. प्रोग्राम सुरू करून विद्यार्थ्यांना विशिष्ट क्षेत्रात आधुनिक संशोधन करून उत्तम करिअर करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. अलीकडेच विद्यापीठ परिसरात 'सेंटर फॉर डिफेंस स्टडीज' या नावीन्यपूर्ण केंद्राची स्थापना केली गेली. या केंद्राच्या रूपातून विद्यार्थ्यांकरिता देशाच्या सुरक्षाविषयक अभ्यासाचे एक नवे दालन खुले केले गेले आहे.

अलीकडील काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात बरेच नवीन उपक्रम पूर्ण झाले असून या उपक्रमांमुळे विद्यापीठ विशेष गतिमान झाले आहे. विद्यापीठाला 'नॅक' द्वारे 'अ' दर्जाचे मानांकन प्राप्त झाल्यामुळे विद्यापीठातील विविध कामांना मूर्त रूप येत चालले आहे. विद्यापीठाने 'इनोव्हेशन आणि इंक्युबेशन सेंटर' सुरू करून त्याआधारे अल्पावधीत उच्च वाढीचा दर प्राप्त केला आहे. 'केंद्रीय ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट सेल' सुरू करण्यात आले आहे आणि त्या माध्यमातून विद्यापीठात तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्चस्तरीय प्रशिक्षणाची व रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या 'केंद्रीय ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट सेल' च्या द्वारे सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट असिस्टंटची सोय झालेली आहे. यामधून विविध विद्यार्थ्यांना नोकरी, प्रशिक्षण व इंटर्नशिप मोठ्या प्रमाणात मिळाली आहे. कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्याच्या उद्देशाने 'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग' प्रभावी करण्यात आला आहे. या विभागाच्या माध्यमातून जीवन शिक्षण अभियान, निरंतर शिक्षण अभियान व कौशल्याधिष्ठित अभियान यांच्या अंतर्गत विविध अभ्यासक्रम कुशलतापूर्वक राबविण्यात येत आहेत. विद्यापीठातील शैक्षणिक विभाग स्वायत्त झाले आहेत. विभागांना शैक्षणिक स्वायत्तता प्राप्त झाल्यामुळे अभ्यासक्रमांना अधिक गुणवत्तापूर्ण करण्याची संधी विभागांना प्राप्त झाली आहे. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' लागू करण्याच्या दृष्टीतून विद्यापीठाने अतिशय तत्परतेने पावले उचलली आहेत आणि या नवीन शैक्षणिक धोरणाची तत्परतेने अंमलबजावणी केली आहे. महाराष्ट्र शासनाने या एल. आय. टी. ला स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा बहाल केला असून त्याआधारे एल. आय. टी. हे स्वतंत्र विद्यापीठ निर्माण झाले आहे. संशोधनातील ज्ञानाच्या संधी आणि विकास साधण्याकरिता संशोधन आणि उद्योजकता यांची सांगड घालणे आवश्यक आहे, त्याकरिता विद्यापीठामध्ये टेक्नॉलॉजी पार्क अंतर्गत विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. विद्यापीठामध्ये उपलब्ध असलेले शैक्षणिक तंत्रज्ञान व संशोधनाच्या सोयी उद्योजकांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येत आहे.

तीन वर्षांपूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषदेमार्फत आमंत्रित समितीने विद्यापीठाला भेट दिली. या समितीने 'नॅक'चे पुनर्मूल्यांकन करून विद्यापीठाला 'अ' दर्जा प्रदान केला आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाने अध्ययावत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अवलंबिले आहे.

वर्ष २०२३ हे आपल्या विद्यापीठाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असे मानावे लागते. हे वर्ष विद्यापीठाचे शताब्दी वर्ष होते. विद्यादानाची परंपरा सदोदित चालविणाऱ्या आपल्या विद्यापीठाने दिनांक ०४ ऑगस्ट, २०२२ ला शंभराव्या वर्षात पदार्पण केले. तेव्हापासून आजतागायत विद्यापीठाचे शताब्दी पर्व मोठ्या उत्साहात व देखण्या स्वरूपात साजरे केले गेले. दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३ रोजी विद्यापीठाने शंभर वर्षे पूर्ण केली. विद्यापीठाच्या शताब्दी पर्वानिमित्त दि. ०४ ऑगस्ट, २०२२ पासून विद्यापीठात व विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील महाविद्यालयात विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. ०४ ऑगस्ट, २०२२ रोजी आयोजित 'शताब्दी महोत्सव' उद्घाटन समारंभात मा. राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी व जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर उपस्थित होते. विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवांतर्गत विविध प्रकल्प, परिषदा व उपक्रम यशस्वीपणे राबवले गेले. दि. ०४ ऑगस्ट, २०२३ ला विद्यापीठाच्या शताब्दी वर्षाची पूर्ती झाली. या शताब्दी महोत्सवानिमित्त दि. ०४ ऑगस्ट, २०२३ रोजी आयोजित कार्यक्रमात भारताचे माननीय उपराष्ट्रपती श्री. जगदीप धनखड, मा. राज्यपाल श्री. रमेश बैस, केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी व उपमुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडणवीस उपस्थित होते.

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त मागील एक वर्षापासून घेण्यात आलेले नावीन्यपूर्ण कार्यक्रम व उपक्रम समाजमनावर ठसा उमटविणारे ठरले. विद्यापीठाच्या शताब्दी वर्षात विविध कंपन्यांशी सामंजस्य करार करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रातील नोकऱ्यांना नजरेसमोर ठेवून फोर्ड कंपनीसोबत करार करण्यात आला. 'सेफ' चे प्रशिक्षण सुरू करण्यात आले. विविध कंपन्यांशी व संस्थांशी करण्यात आलेले सामंजस्य करार विद्यार्थ्यांच्या रोजगारासाठी, प्रशिक्षणासाठी, कौशल्यविकासासाठी व व्यवसायासाठी महत्त्वपूर्ण ठरणारे आहेत. विद्यापीठाने शताब्दी वर्षात Reaching to Unreached हा महत्त्वाकांक्षी उद्देश बाळगून विविध उपक्रम राबविले आहेत. याअंतर्गत विद्यापीठ परिक्षेत्रातील ग्रामीण क्षेत्राशी व आदिवासी भागाशी नाळ जोडण्याचा प्रयत्न विद्यापीठ सातत्याने करत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शताब्दी महोत्सव व्याख्यानमालांच्या अंतर्गत विद्यापीठात विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत व त्याअंतर्गत समाजजागरण करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या शताब्दी वर्षात दिनांक ३ ते ७ जानेवारी, २०२३ या कालावधीत '१०८ वी इंडियन सायन्स काँग्रेस' यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. आपल्या विद्यापीठाने इंडियन सायन्स काँग्रेसचे केलेले आयोजन ही विद्यापीठाच्या इतिहासातील अविस्मरणीय घटना मानावी लागते. या कार्यक्रमाचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी आभासी पद्धतीने उपस्थित राहून केले. विद्यापीठाने आयोजित केलेल्या या इंडियन सायन्स काँग्रेसचा लाभ हजारो विद्यार्थ्यांनी व शेकडो अभ्यासकांनी घेतला. दिनांक २० ते २२ जानेवारी, २०२३ या कालावधीत विद्यापीठात '७२ वी इंडियन फार्मास्युटिकल काँग्रेस' आयोजित करण्यात आली. या

इंडियन फार्मास्युटिकल काँग्रेसचे उद्घाटन केंद्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांच्या हस्ते झाले. या परिषदेत औषधिशास्त्रविषयक संशोधन आणि तत्संबंधित जनजागृती सर्वांकरिता अतिशय लाभकारक ठरली.

शिक्षणाचा प्रसार करताना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, स्वयंरोजगार माहिती, क्रीडा प्रशिक्षण इत्यादी माध्यमांतून विद्यापीठात भरीवपणे कार्य करण्यात येत आहे. विद्यापीठाचे विद्यार्थी विविध क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक यश प्राप्त करीत आहेत. विद्यापीठीय अभ्यासक्रमांबरोबरच विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यापीठाचा क्रीडा विभाग यांचेकडून होणारे कार्य प्रशंसनीय स्वरूपाचे आहे. राष्ट्रीय पातळीवरील आंतर-विद्यापीठ क्रीडा स्पर्धांतील, राज्यस्तरीय आंतर-विद्यापीठ क्रीडा स्पर्धांतील तसेच क्रीडा महोत्सवांतील विविध खेळांत विद्यापीठाच्या चमूंनी व खेळाडूंनी सामूहिक व वैयक्तिक पातळीवर नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता विविध प्रकारच्या योजना प्रभावीपणे राबविल्या. विद्यार्थी विकास विभागाची 'कमवा व शिका योजना' ही गरजू विद्यार्थ्यांसाठी मोठी लाभकारक ठरली. आपल्या विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत विविध प्रकारची प्रशिक्षण शिबिरे व सेवा शिबिरे यशस्वीपणे राबवली गेली. या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणाला विकसित करण्यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला सामाजिक व शैक्षणिक दृष्टीतून विकसित करण्यामध्ये महत्त्वपूर्ण ठरले आहेत.

वर्ष २०२४ मध्ये विद्यापीठात अनेक महत्त्वपूर्ण कार्यक्रम घेण्यात आलेत तसेच संस्मरणीय उपक्रम राबवण्यात आले. क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थी कल्याण, सामाजिक जागृती, विद्यार्थी प्रबोधन, रोजगार निर्मिती, संशोधन, पेटंट निर्मिती इत्यादी विविध क्षेत्रात विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक यांनी चौफेर स्वरूपाची कामगिरी बजावली.

दिनांक १६ डिसेंबर, २०२४ ला विद्यापीठाचा ११२ वा दीक्षांत समारंभ नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेजच्या ऑडिटोरियम हॉलमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल व विद्यापीठांचे कुलपती श्री. सी. पी. राधाकृष्णन यांनी भूषवले. या समारंभात विद्यापीठाचे माननीय कुलगुरू (प्रभारी) डॉ. प्रशांत बोकारे व माननीय प्र-कुलगुरू प्रा. राजेन्द्र काकडे (Officiating) यांची उपस्थिती होती. विद्यापीठाकरिता २०२५ हे वर्ष विविध कार्यक्रमांच्या व उपक्रमांच्या दृष्टीने संस्मरणीय ठरले. दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचा शताब्दी महोत्सव उद्घाटन समारंभ महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, केंद्रीय महामार्ग व रस्ते वाहतूक मंत्री श्री. नितीनजी गडकरी, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. विकास शिरपूरकर, राज्यमंत्री ॲडव्होकेट आशिष जयस्वाल, राज्यमंत्री श्री. इंद्रनील नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि नागपूर चलचित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात दिनांक ९ जानेवारी ते १२ जानेवारी, २०२५ या दरम्यान चार दिवसीय नागपूर फिल्म फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले. नागपूर विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने दिनांक १० फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत आंतर-महाविद्यालयीन सांस्कृतिक युवक महोत्सव 'युवा रंग - २०२५' नाविन्यपूर्ण कार्यक्रमांसह संपन्न झाला. २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संशोधन गटाचा दिल्ली येथे राष्ट्रीय वैज्ञानिक कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. केंद्र सरकारच्या विद्यापीठ संशोधन आणि वैज्ञानिक उत्कृष्टता प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत संशोधन प्रकल्पांसाठी नागपूर विद्यापीठाला ११.४२ कोटी रुपये प्राप्त झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला प्रगत राष्ट्रीय संशोधन फाउंडेशन, प्रगत आंतर-विद्याशाखीय भागीदारी संशोधन या कार्यक्रमांतर्गत नव्वद सहा कोटी रुपयांपेक्षा अधिक संशोधन निधी मंजूर झाला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ च्या परिसरात संविधान प्रास्ताविका पार्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. भूषण गवई, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांच्या हस्ते दिनांक २८ जून २०२५ रोजी झाले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सव वर्षाच्या निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ मुलींचे वसतिगृह गांधी विचारधारा विभाग व गांधी भवन या संपूर्ण परिसरास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर परिसर असा नामकरण करण्याचा सोहळा दिनांक ३१ मे, २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या माननीय न्यायमूर्ती श्रीमती मुकुलिका जवळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जनकल्याणकारी समिती, नागपूर यांच्या संयुक्त विभागाने ०७, ०८, ०९ जून, २०२५ रोजी विदर्भ पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले. शैक्षणिक क्षेत्र आणि उद्योग यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने इंडस्ट्री इंटिग्रेटेड बी. कॉम पदवी अभ्यासक्रम नव्याने यावर्षी सुरू केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शैक्षणिक परिसरात रोजगाराभिमुख शिक्षणाला गतिमान करण्याच्या दृष्टीने बी.एससी. (सायबर सायन्स) आणि बी. एससी. (ड्रोन टेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना विद्यार्थी विकास रोजगार प्रशिक्षण तसेच इंटर्नशिपच्या संधी याबाबत माहिती देण्याकरिता विद्यार्थी कल्याण योजनांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध व्हावी, याकरिता माननीय कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी

खोंडे चवरे (भा.प्र.से.) यांच्या संकल्पनेतून विद्यार्थी विकास विभागाच्या सहकार्याने वैशिष्ट्यपूर्ण असे मोबाईल ॲप तयार करण्यात आले. महिला सशक्तिकरणाच्या उद्देशाने शासनाने सुरू केलेले 'स्वयंसिद्धा अभियान' विद्यापीठात उत्साहपूर्वक राबवण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता ऑस्ट्रेलियातील विविध विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत संयुक्त पदवी मिळवण्याची संधी प्राप्त करण्याच्या हेतूने नागपूर विद्यापीठ आणि ऑस्ट्रेलियातील विद्यापीठे यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या अनुषंगाने ऑस्ट्रेलियन कॉन्सिलिएट प्रतिनिधिनी विद्यापीठाला २५ जुलै, २०२५ रोजी भेट दिली. दिनांक ११ ऑक्टोबर, २०२५ रोजी ४ विद्यापीठामध्ये 'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे' या विद्यापीठ गीताचे प्रचंड मोठ्या संख्येने सामूहिकपणे गायन करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड करीत वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना विद्यापीठाने आदरांजली व्यक्त केली. विद्यापीठाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना वाहिलेली ही आदरांजली गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड सह एकूण चार विश्वविक्रमांची ऐतिहासिक नोंद करणारी ठरली. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीनजी गडकरी आणि राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री ॲड्वोकेट आशिष जयस्वाल, माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोंडे चवरे (भा.प्र.से.) यांच्या प्रमुख उपस्थितीत साकारलेला हा विश्वविक्रम अविस्मरणीय स्वरूपाचा ठरला. नॅशनल बुक ट्रस्टच्या वतीने नागपूर येथे २२ ते ३० नोव्हेंबर, २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील नागपूर पुस्तक महोत्सवाच्या आयोजनात विद्यापीठाचा नॉलेज पार्टनर म्हणून सक्रीय सहभाग राहिला.

निरंतर ध्येयाकडे वाटचाल करणाऱ्या आपल्या या विद्यापीठाच्या संदर्भात पाहिली जाणारी अनेक स्वप्ने आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने नजीकच्या भविष्यात पूर्ण होतील व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे नाव भारतातील एक श्रेष्ठ विद्यापीठ म्हणून गौरवाने घेतले जाईल असा आमचा प्रगाढ विश्वास आहे.

***

छत्रपती श्री शिवाजी महाराज

Chhatrapati Shri Shivaji Maharaj

प्रकरण पहिले
विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे

अहवालकाळातील विद्यापीठाच्या प्राधिकरणे व मंडळे तसेच त्यात वेळोवेळी झालेले बदल याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व अन्य प्राधिकरणे/समिती सदस्यांची यादी

१. अधिसभा

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २८(२) नुसार

पदसिद्ध अध्यक्ष व सदस्य :

कुलपती : महाराष्ट्राचे राज्यपाल

मा. श्री. रमेश बैस (दि. ३०/७/२०२४ पर्यंत)

श्री. सी. पी. राधाकृष्णन

(दि. ३१/७/२०२४ पासून)

कुलगुरू :

डॉ. सुभाष आर. चौधरी

(दि. ०४/७/२०२४ पर्यंत)

डॉ. प्रशांत बोकारे (अतिरिक्त प्रभार)

(दि. ०५/७/२०२४ ते १२/३/२०२५ पर्यंत)

डॉ. (श्रीमती) माधवी खोडे चवरे, (भा. प्र. से.)

(अतिरिक्त प्रभार) (दि. १३/३/२०२५ पासून)

प्र–कुलगुरू :

डॉ. संजय दुधे (दि. २६/९/२०२४ पर्यंत)

रिक्त

(दि. २६/९/२०२४ ते ३०/१०/२०२४ पर्यंत)

डॉ. राजेंद्र काकडे (अतिरिक्त प्रभार)

(दि. ३१/१०/२०२४ ते १३/३/२०२५ पर्यंत)

रिक्त

(दि. १३/३/२०२५ ते २०/४/२०२५ पर्यंत)

डॉ. सुभाष कोंडावार (अतिरिक्त प्रभार)

(दि. २१/४/२०२५ पासून)

अधिष्ठाता :

१. डॉ. प्रशांत माहेश्वरी

अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

(दि. १५/६/२०२५ पर्यंत)

डॉ. उमेश पलीकुंडवार (अतिरिक्त प्रभार)

अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

(दि. १६/६/२०२५ पासून)

२. डॉ. संजय कवीश्वर

अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

(दि. १५/६/२०२५ पर्यंत)

डॉ. (श्रीमती) मेधा कानेटकर (अतिरिक्त प्रभार)

अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

(दि. १६/६/२०२५ पासून)

३. डॉ. शामराव कोरेटी (अतिरिक्त प्रभार)

अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा

(दि. १५/६/२०२५ पर्यंत)

डॉ. शामराव कोरेटी (अतिरिक्त प्रभार)

अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा

(दि. १६/६/२०२५ पासून)

४. डॉ. प्रशांत कडू

अधिष्ठाता, आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

(दि. १५/६/२०२५ पर्यंत)

डॉ. (श्रीमती) राजश्री वैष्णव (अतिरिक्त प्रभार)

अधिष्ठाता, आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

(दि. १६/६/२०२५ पासून)

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ :

डॉ. प्रफुल्ल साबळे (दि. १२/९/२०२४ पर्यंत)

डॉ. संजय कवीश्वर

(दि. १२/९/२०२४ ते ०१/५/२०२५ पर्यंत)

श्री. मनिष झोडपे (दि. ०२/५/२०२५ पासून)

वित्त व लेखा अधिकारी : श्री. हरीश पालीवाल

विद्यापीठाच्या उपपरिसरांचे संचालक : रिक्त

संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य :

डॉ. राजेश सिंह (दि. ०८/९/२०२४ पर्यंत)

डॉ. निशिकांत राऊत (अतिरिक्त प्रभार)

(दि. ९/९/२०२४ पासून)

सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य :

डॉ. संतोष चव्हाण

सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य :

डॉ. सचिन सोलंकी (दि. १५/१०/२०२४ पर्यंत)

डॉ. मनोजकुमार डायगव्हाणे (दि. १५/१०/२०२४ पासून)

संचालक, ज्ञानस्रोत केंद्र : डॉ. विजय खंडाळ

संचालक, विद्यार्थी विकास मंडळ :

डॉ. राजेश सिंह (अतिरिक्त प्रभार)

(दि. ०८/९/२०२४ पर्यंत)

डॉ. विजय खंडाळ (अतिरिक्त प्रभार)

(दि. ०९/९/२०२४ पासून)

संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण :

डॉ. शरद सूर्यवंशी (दि. ०५/७/२०२४ पर्यंत)

डॉ. (श्रीमती) विशाखा जोशी (अतिरिक्त प्रभार) (दि. ०५/७/२०२४ पासून)

संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ :

डॉ. निशिकांत राऊत (अतिरिक्त प्रभार) (दि. १०/१०/२०२४ पर्यंत)

डॉ. समित माहोरे (अतिरिक्त प्रभार) (दि. ११/१०/२०२४ पासून)

प्राचार्य गटाचे १० प्रतिनिधी : (खुला प्रवर्ग)

१. डॉ. निलकंठ यादोराव लंजे
२१.	ललित कला विभाग	३	२	—	८	—	—	—	—	१	—	—	—	—	—	—	—	—
२२.	भूशास्त्र विभाग	९	—	—	७	१	१	—	—	—	—	—	२२	२	—	—	१	३
२३	गणित विभाग	२	१	१	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—
२४.	भौतिकशास्त्र विभाग	२	४	१	—	४४	११	—	१	१	—	४	१	१	२८	३०	१	२
२५.	प्राणिशास्त्र विभाग	१	४	—	२५	—	१	७	—	१	—	१	—	—	१	—	—	—
२६.	रसायनशास्त्र विभाग	—	—	—	१०	—	४०	—	—	—	२	७	२०	२१	३	—	—	१
२७.	वनस्पतिशास्त्र विभाग	१	३	१	३	—	१	—	—	—	१	—	—	—	—	१	—	—
२८.	विद्युत परमाणुशास्त्र आणि संगणक विज्ञान विभाग	—	—	—	२	—	३	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—
२९.	गृहविज्ञान विभाग	—	२	—	२	२	—	२	—	२	—	४	—	२	—	—	—	—
३०.	रेशिम उद्योग आणि जैव संसाधन संशोधन विभाग	२	—	—	२	—	—	२	—	—	१	१	—	—	—	१	—	—
३१.	औषधिनिर्माणशास्त्र विभाग	३	४	—	—	—	१३	—	१	२	३	—	२	—	—	—	—	१
३२.	वाणिज्य विभाग	३	१	—	३	—	—	१	—	—	—	—	—	—	—	—	—	—
३३.	पदव्युत्तर विधी विभाग	१	४	—	३	—	१	—	—	—	—	—	—	—	—	—	—	१
३४.	ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग	१	४	—	५	—	१	—	१	२	१	—	—	—	—	१	—	—
३५.	पदव्युत्तर शिक्षण विभाग	५	५	१	१०	१	१३	१	१	१	४	१	१	१	२	—	१	—
३६.	पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग	—	११	—	—	—	२	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—
३७.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कुल ऑफ लॉ, मुख्य शाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर	६	४	—	११	८	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—	१
३८.	बॅरि. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर	—	२२	८	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—
	एकूण :	६२	१२२	३०	१७२	६९	९३	१६	१९	१९	४७	२७	४६	२८	३६	३६	३	१३

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ दैनंदिनी – २०२५ चे विमोचन करताना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र–कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. अजय अग्रवाल, डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. सुभाष कोडापार, प्रकाशन अधिकारी श्री. प्रविण गोतमारे व विद्यापीठाचे शिक्षकेतर कर्मचारी.

During the distribution of the University Diary–2025 of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Officiating Vice-Chancellor Dr. Prashant Bokare, Pro Vice-Chancellor Dr. Rajendra Kakde, Registrar Dr. Raju Hiwase, Dr. Shailendra Lende, Dr. Subhash Kondawar, Publication Officer Shri Pravin Gotmare and University teaching and Non-teaching staff were present.

पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे डिजिटल स्वरूपातील प्रवेश अर्ज व माहिती पुस्तिका २०२५–२०२६ यांचे विमोचन करताना प्र–कुलगुरू डॉ. सुभाष कोडापार व विद्यापीठाचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी.

During the release of the Post-graduate Admission Application and Information Brochure 2025-2026, Pro Vice-Chancellor Dr. Subhash Kondawar along with University teaching and non-teaching staff.

उद्यान विभागाद्वारे महात्मा जोतिबा फुले परिसरामध्ये विविध ठिकाणी ३०० वृक्षांच्या लागवडीची सुरुवात करण्यात आली. त्याप्रसंगी उपस्थित प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भा.प्र.से.), कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. संजय ढोबळे, उद्यान विभागाचे अधीक्षक श्री. प्रविण गोतमारे व विद्यापीठाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीगण.

Initiation of plantation of 300 saplings at various locations in the Mahatma Jyotiba Phule Campus by the Garden Department, with Vice-Chancellor Dr. Madhavi Khode Chaware (In-charge), Registrar Dr. Raju Hiwase, Dr. Sanjay Dhoble, Garden Superintendent Shri Pravin Gotmare, teaching staff, non-teaching staff, and students present.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाद्वारे आयोजित वक्तृत्व स्पर्धा आणि १८ तास अभ्यास अभियान कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. रमेश शंभरकर. व्यासपीठावर डॉ. मोहन वानखेडे व डॉ. अविनाश फुलझेले.

Dr. Ramesh Shambharkar guiding participants during the elocution competition and 18-hour study campaign organized by the Dr. Babasaheb Ambedkar Thought Department; with Dr. Mohan Wankhede and Dr. Avinash Fulzele on the dais.

ललितकला विभागाद्वारे आयोजित 'एकत्वम– विविधतेत एकता' या सांस्कृतिक कार्यक्रमात ग्रंथालय आणि माहिती विज्ञान विभागाच्या डॉ. शालिनी लिहीतकर यांचा सत्कार करताना विभागप्रमुख डॉ. संयुक्ता थोरात. शेजारी प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, प्रमुख अतिथी श्री. तेजिंदर सिंग रावल आणि डॉ. स्मिता आचार्य.

Head of the Department Dr. Sanyukta Thorat felicitating Dr. Shalini Lihitkar of the Department of Library and Information Science during the cultural programme "Ekattva – Diversity in Unity" organized by the Department of Fine Arts with Pro Vice-Chancellor Dr. Rajendra Kakade, Chief Guest Shri. Tejinder Singh Rawal and Dr. Smita Acharya.

ललितकला विभागाद्वारे आयोजित 'Cultural Diversity and Sensitivity' या अभियानाच्या अंतर्गत नृत्य सादर करताना ललितकला विभागातील विद्यार्थिनी.

Students of the Department of Fine Arts presenting a dance performance under the campaign "Cultural Diversity and Sensitivity" organized by the Department of Fine Arts.

उद्यान विभागाद्वारे महात्मा जोतिबा फुले परिसरामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. त्याप्रसंगी प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चावरे (भा.प्र.से.) वृक्षांना पाणी देताना. सोबत कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. संजय ढोबाले, उद्यान विभागाचे अधीक्षक श्री. प्रविण गोतमारे, विद्यापीठाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीगण.

Tree plantation at various locations in the Mahatma Jotiba Phule Campus by the Garden Department; Vice-Chancellor Dr. Madhavi Khode Chaware (In-charge) watering the saplings; with Registrar Dr. Raju Hiwase, Dr. Sanjay Dhobale, Garden Superintendent Shri Pravin Gotmare, teaching staff, non-teaching staff and students.

संविधान प्रस्तावित पार्क, स्कुल ऑफ लॉ, डॉ. लक्ष्मीनारायण परिसर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे नवीन तयार करण्यात आलेले लॅन्डस्केप उद्यानात लावलेल्या रंगीत कारंज्याचे विहंगम दृश्य.

View of the newly developed Landscape Garden at Constitution Proposal Park, School of Law, Dr. Laxminarayan Campus, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर अध्यासन विभागाद्वारे आयोजित 'पुणे करार' या विषयावर विचार मांडताना डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट, मधूचे माजी कुलगुरू डॉ. सी. डी. नाईक. व्यासपीठावर उपस्थित विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले.

Dr. C. D. Naik, former Vice-Chancellor of Dr. Ambedkar Institute, presenting his views on the topic "Pune Pact" during a programme organized by the Dr. Babasaheb Ambedkar Studies Department; with Head of the Department Dr. Avinash Fulzele present on the dais.

विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर अध्यासन विभागाद्वारे आयोजित '७५ वा भारतीय संविधान दिन' हया विषयावर विचार मांडताना डॉ. अनिल बनकर, व्यासपीठावर उपस्थित विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले.

Dr. Anil Bankar presenting his views on the topic "75th India Dr. Babasaheb Ambedkar Studies Department; with Head of the Department Dr. Avinash Fulzele present on the dais.

विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर अध्यासन विभागाद्वारे आयोजित 'डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विकास विषयक आशयित परिसंवाद' या कार्यक्रमाअंतर्गत आपले विचार मांडतांना अनुक्रमे डॉ. विकास जांभुळकर, डॉ. संदीप तुडूरवार आणि डॉ. श्रीनिवास खांदेवाले व व्यासपीठावर उपस्थित विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले.

Dr. Vikas Jambhulkar, Dr. Sandeep Tudurwar, and Dr. Shrinivas Khandewale presenting their views during the panel discussion on "Dr. Ambedkar's Economic Development Perspective" organized by the Dr. Babasaheb Ambedkar Studies Department; with Head of the Department Dr. Avinash Fulzele present.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारे आयोजित आंतर–महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी २०२४ या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रभारी अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी दीप प्रज्वलित करताना. शेजारी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. विजय खंडाळ व डॉ. सोपानदेव पिसे.

Dr. Shyamrao Koreti, Dean lighting the ceremonial lamp during the inauguration of the Inter-University Cultural Competition Selection Trials 2024 organized by the University Student Development Department; with Student Development Officer Dr. Vijay Khandal and Dr. Sopandev Pise present.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारे आयोजित महाराष्ट्र राज्य आंतर–महाविद्यालयीन संशोधन विद्यार्थी परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजी विद्यापीठ लोणेरेचे मा. कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्याकडून पुरस्कार स्विकारतांना प्रथम पारितोषिक विजेती कु. समिक्षा वैद्य. शेजारी डॉ. निलेश आवटे व डॉ. संजय ढोबळे.

During the Maharashtra State Inter-University Research Students' Conference organized by the University Student Development Department, the first prize in the poster presentation competition was awarded to a research student Ms. Samiksha Vaidya, from Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere, by Hon. Vice-Chancellor Dr. Karbhari Kale; with Dr. Nilesh Awate and Dr. Sanjay Dhobale present.

युवारंग – २०२५ च्या समारोपीय कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी दीप प्रज्वलित करतांना प्र–कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे. शेजारी श्री. अंशुमन विचारे (मराठी सिनेअभिनेता), डॉ. समय बनसोड, डॉ. देवेंद्र भोंगाडे, श्री. विष्णु चांदने व कु. पायल किन्नाके.

Inauguration of the ceremonial lamp during the inaugural function of Yuvaarang – 2025 by Pro-Vice-Chancellor Dr. Rajendra Kakade; with Shri Anshuman Vichare (Marathi cine actor), Dr. Samay Bansod, Dr. Devendra Bhongade, Shri Vishnu Chandane and Ku. Payal Kinake present.

युवारंग – २०२५ च्या समारोपीय कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आपले विचार व्यक्त करतांना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे. व्यासपीठावर उपस्थित प्र–कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, श्री. अंशुमन विचारे (मराठी सिनेअभिनेता), डॉ. समय बनसोड, डॉ. देवेंद्र भोंगाडे, श्री. विष्णु चांदने, कु. पायल किन्नाके, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. विजय खंडाळ.

Vice-Chancellor Dr. Prashant Bokare expressing his views during the inauguration of Yuvaarang – 2025; with Pro Vice-Chancellor Dr. Rajendra Kakade, Registrar Dr. Raju Hiwase, Shri Anshuman Vichare (Marathi cine actor), Dr. Samay Bansod, Dr. Devendra Bhongade, Shri Vishnu Chandane, Ku. Payal Kinake, and Student Development Officer Dr. Vijay Khandal present.

युवारंग – २०२५ च्या समारोपीय कार्यक्रमात सर्पक लावणी आणि लोक कला नृत्य यांची चमू या कलाप्रकारात सादरीकरण करताना.

Students presenting energetic Lavani and folk dance performances during the cultural segment of Yuvaarang – 2025.

तंत्रज्ञान व उर्जा पार्क समितीचे संचालक डॉ. प्रकाश इटनकर आणि त्याचे सहकारी यांनी आयआयटी, मद्रास या संशोधन केंद्राला भेट दिल्याबाबतचे छायाचित्र.

Photograph of the visit by Dr. Prakash Itankar, Director of the Technology and Energy Park Committee, along with his associates, to the IIT Madras, Research Centre.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे स्वास्थ्य केंद्रामार्फत घेण्यात आलेल्या शिबिरामध्ये उपस्थित डॉ. सरोज शामकुवर, डॉ. पल्लवी भगत, डॉ. सुहास राऊत, डॉ. मनिषा देशपांडे आणि त्याची चमू.

Participation of Dr. Saroj Shamkuwar, Dr. Pallavi Bhagat, Dr. Suhas Raut, Dr. Manisha Deshpande and their team in the health camp organized through the University Health Centre, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, where 325 patients were examined.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारे आयोजित नागपूर फिल्म फेस्टिवल–२०२५ चे उद्घाटनप्रसंगी दीप प्रज्वलित करताना फिल्म अभिनेता श्री. गजेंद्र चौहान, शेजारी प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे व इतर मान्यवर.

Film actor Shri Gajendra Chauhan lighting the ceremonial lamp during the inauguration of Nagpur Film Festival – 2025 organized by the University Student Development Department; with Vice-Chancellor Dr. Prashant Bokare and other dignitaries present.

नागपूर फिल्म फेस्टिवल – २०२५ चे उद्घाटनप्रसंगी आपले अध्यक्षीय भाषण करताना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे. व्यासपीठावर उपस्थित फिल्म अभिनेता श्री. गजेंद्र चौहान व इतर मान्यवर.

Vice-Chancellor Dr. Prashant Bokare delivering the presidential address during the inauguration of Nagpur Film Festival–2025; with

नागपूर फिल्म फेस्टिवल – २०२५ निमित्त दाखवण्यात आलेल्या रेलीमध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीगण.

Teachers, non-teaching staff, and students present during the screening of films selected for Nagpur Film Festival – 2025.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारे आयोजित संविधान दिनानिमित्त आपले विचार व्यक्त करताना नागपूरचे डॉ. सच्चिदानंद फुलेकर. व्यासपीठावर उपस्थित कुलसचिव डॉ. राजू हिवसे, प्रभारी अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. विजय खंडाळ.

Dr. Sacchidanand Fulekar expressing his views on Constitution Day during the programme organized by the University Student Development Department; with Registrar Dr. Raju Hiwase, Dean Dr. Shyamrao Koreti, and Student Development Officer Dr. Vijay Khandal present.

आंतर-महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी २०२४ या स्पर्धेत वक्तृत्व स्पर्धेत सादरीकरण करताना तसेच शास्त्रीय नृत्य स्पर्धेत सादरीकरण करताना विद्यार्थिनी.

Students presenting performances in the elocution competition as well as the classical dance competition during the Inter-University Cultural Competition Selection Trials 2024.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारे धोटे बंधू विज्ञान महाविद्यालय, गोंदिया येथे निवड चाचणी अविष्कार-२०२५ चे उद्घाटन करताना विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. विजय खंडाळ, डॉ. अंजन नायडू, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. देवेंद्र भोंगाडे व डॉ. संजय ढोबळे.

Inauguration of the Selection Trials of 'Avishkaar'-2025 at Dhote Bandhu Science College, Gondia, by Student Development Officer Dr. Vijay Khandal; with Dr. Anjan Naidu, Management Council Member Dr. Devendra Bhongade and Dr. Sanjay Dhobale present.

खेलो इंडियासाठी अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ फेन्सिंग महिला स्पर्धेत पात्र विद्यार्थिनी.

All India Inter University Fencing Women Tournament Team Qualify for Khelo India

खेलो इंडियासाठी अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ मल्लखांब महिला संघामध्ये पात्र विद्यार्थिनी आणि शिक्षकगण.

All India Inter University Malkhamb Women Team Team Qualify for Khelo India

खेलो इंडियासाठी अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ योगासन महिला संघामध्ये पात्र विद्यार्थिनी आणि शिक्षक.

For Khelo India, the eligible girl students and teacher for All India Inter-University Yogasana Women's Team

अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ कॅनोइंग आणि कायकिंग आणि ड्रॅगन बोट स्पर्धेत कास्यपदक पटकवणारे विद्यार्थी.

Students winning Bronze Medal in All India Inter-University Canoeing, Kayaking and Dragon Boat competition.

क्रिडा महोत्सव २०२५ मध्ये पदके प्राप्त झालेले विद्यार्थी, विद्यार्थिनी. तसेच प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, डॉ. समय बनसोड, डॉ. माधवी मार्डीकर, डॉ. विशाखा जोशी, डॉ. रविशंकर मोर, डॉ. विजय खंडाळ, शिक्षकगण व इतर.

Students winning Medals in the Sports Festival 2025, along with In-charge Vice-Chancellor Dr. Prashant Bokare, Dr. Samay Bansod, Dr. Madhavi Mardikar, Dr. Vishakha Joshi, Dr. Ravishankar Mor, Dr. Vijay Khandal, teaching staff and others.

खेलो इंडियासाठी अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ कॅनोइंग आणि कायकिंग स्पर्धेत दुसरे स्थान पटकविणाऱ्या विद्यार्थिनी.

Girls students who secured second place in All India Inter-University Canoeing and Kayaking competition for Khelo India.

■ प्रकरण चौथे
विद्यापीठाचे इतर विभाग

डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते ज्ञानस्त्रोत केंद्र :

संचालक : डॉ. विजय खंडाळ

ज्ञानस्त्रोत केंद्राची (पूर्वी विद्यापीठ ग्रंथालय म्हणून ओळखले जाणारे) स्थापना सन १९२३ मध्ये नागपूर विद्यापीठाच्या (सध्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ म्हणून ओळखले जाणारे) स्थापनेसोबतच करण्यात आली. सदर ज्ञानस्त्रोत केंद्राची सुरुवात काही पुस्तकांच्या संग्रहासह व स्वत:ची कोणतीही इमारत नसताना झालेली असून आज एका शतकानंतर एक सशक्त केंद्र म्हणून ज्ञानस्त्रोत केंद्राची ओळख आहे. सध्या ज्ञानस्त्रोत केंद्राच्या दोन स्वंतत्र विशाल इमारती असून एक डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते ज्ञानस्त्रोत केंद्र, रामदासपेठ, नागपूर भागात स्थित आहे आणि दुसरे ज्ञानस्त्रोत केंद्र, विद्यापीठ परिसर हे महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, अमरावती रोड, नागपूर येथे स्थित आहे.

आपल्या उपभोक्त्यांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी तत्कालीन विद्यापीठ ग्रंथालयाने १९९५ मध्ये संगणकीकरणाला सुरुवात केली. आज ज्ञानस्त्रोत केंद्र पूर्णत: Automated असून सर्व दैनंदिन कार्य संगणकीकृत झाले आहे आणि त्यावर आधारित अनेक संगणकीकृत सेवा सुरू केल्या आहेत. आधुनिक हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर तंत्रज्ञानाचा वापर करून उपभोक्तांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करण्यात ज्ञानस्त्रोत केंद्र नेहमी तत्पर असते. ज्ञानस्त्रोत केंद्राने सुमारे ४ लाख ग्रंथसूची रेकॉर्डसह (Bibliographical Record) Data base तयार केले आहेत. यामध्ये NKN शी Connectivity आहे आणि 1 GBPS इंटरनेट लिंक उपलब्ध आहे. सुमारे ५ कि. मी. अंतरावर असलेल्या दोन ज्ञानस्त्रोत केंद्राच्या इमारती वायरलेस नेटवर्क वापरुन जोडल्या गेल्या आहेत. तसेच १०० Mbps ची इंटरनेट लीज लाईन (Leased Line) सुद्धा वापरली जाते. ज्ञानस्त्रोत केंद्रातील उपभोक्त्यांना विविध सेवा वापरण्यासाठी शंभराहून अधिक संगणक उपलब्ध आहेत. डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते ज्ञानस्त्रोत केंद्र आणि विद्यापीठ परिसर या दोन्ही वाचनकक्ष वर्षभर रविवार आणि सुट्ट्यांच्या दिवशी २४ X ७ तास सुरू राहते. ज्ञानस्त्रोत केंद्रामध्ये जवळपास ३०० आसनक्षमता असलेले वाचनकक्षाची सुविधा उपलब्ध आहे.

शैक्षणिक विभागातील ग्रंथालये :

विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्राच्या व्यतिरिक्त विद्यापीठाच्या २८ शैक्षणिक विभागांमध्ये ग्रंथालये आहेत. या विभागांच्या ग्रंथालयाद्वारे शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता घरी नेण्याकरिता ग्रंथ देवाणघेवाण करण्यात येते.

दिव्यांग कक्ष (Enabling Unit) :

दिव्यांग विद्यार्थ्यांना सेवा देण्याकरिता ज्ञानस्त्रोत केंद्र, रामदासपेठ आणि विद्यापीठ परिसर या दोन्ही ठिकाणी Enabling Unit ची स्थापना करण्यात आली आहे जेणेकरून दिव्यांगांना जास्तीत जास्त सेवा मिलेल. दिव्यांगांना सर्व प्रकारच्या IT Services मिलाव्या म्हणून यासंदर्भात 'उपकरणे आणि सॉफ्टवेअर' खरेदी करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त 'सुगम्य पुस्तकालय' न्यू दिल्ली येथील संस्थेसोबत रजिस्ट्रेशन करून दिव्यांगांना अधिकाअधिक सेवा देण्यात येतात.

विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्राचा ग्रंथसंग्रह :

ग्रंथालयाच्या रेकॉर्डप्रमाणे ३० जून, २०२५ पर्यंत असलेला एकूण ग्रंथसंग्रह ४,२९,०२१ एवढा आहे. ग्रंथालयामध्ये एकूण शोधप्रबंध (Theses) १८,८१७, नियतकालिकेचे बांधीव खंड ३६,९३५, हस्तलिखिते १४,३१३ असून उपरोक्त ग्रंथसंग्रह विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्र, रामदासपेठ व विद्यापीठ परिसर आणि विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांच्या ग्रंथालयांमध्ये विखुरलेला आहे. ज्ञानस्त्रोत केंद्रातून माहिती तंत्रज्ञान संबंधित सेवा ग्रंथालयाच्या सभासदांना आणि विद्यापीठातील संशोधकांना दिल्या जातात. उच्चतर शिक्षण विभाग, भारत सरकार यांच्या ONOS (One Nation One Subscription) या नव्या केंद्रीय योजनेअंतर्गत १३००० पेक्षा जास्त e-Resources शिक्षक, संशोधक, विद्यार्थी यांना ONOS च्या Link द्वारे पुरविण्यात येतात. आर्थिक वर्ष २०२४–२५ या कालावधीत सर्व साधारण निधीतून ग्रंथ व ई–बुक्स् खरेदी करण्याकरिता रु. ४६,५८,०१८/– खर्च करण्यात आले. त्या अनुदानातून २,७०० पुस्तके, (ई–बुक्स् समाविष्ट–८९) खरेदी करण्यात आले. याव्यतिरिक्त प्रकल्प पुस्तकांच्या अनुदानातून रु. १६,५५१/– चे २४ प्रकल्प पुस्तके खरेदी करण्यात आली. रु. ४,५४,९१४/– चे नियतकालिके खरेदी करण्याकरिता खर्च करण्यात आले असून व त्या अनुदानातून एकूण ६९ प्रिंट जर्नल, ४२ वर्तमानपत्रे खरेदी करण्यात आली. तसेच ध–५(५७) मधून (विद्यापीठ साधारण निधी) व्ययशिर्षातून ०४ ई–डेटाबेसेस (SCOPUS, EBSCO, ASU, CMIE, Manupatra) करिता रु. ५१,०८,३५१/– खर्च करण्यात आले.

ज्ञानस्त्रोत केंद्राद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा :

ज्ञानस्त्रोत केंद्राद्वारे उपभोक्त्यांना विविध सेवा प्रदान केल्या जातात, ज्ञानस्त्रोत केंद्रातील सेवा दोन मोठ्या प्रकारात वर्गीकृत केल्या आहेत.

१. पारंपरिक सेवा **(Traditional Services)** :

24 X 7 वाचन कक्ष, दैनंदिन ग्रंथ देवाण–घेवाण सेवा, संदर्भ सेवा, ग्रंथसूचीविषयक सेवा (Bibliographical Service), वर्तमान जागरुकता सेवा (Current Awareness Service), निवडक प्रसार सेवा (Selective Dissemination Service), दस्तऐवज वितरण सेवा (Document Delivery Service), आंतर–ग्रंथालय सेवा (Inter Library Loan), नवीन पुस्तकांचे प्रदर्शन (New Arrival Book Display), प्रिन्ट जर्नल्सच्या नवीन अंकांचे प्रदर्शन (Display of Current Issues of Print Journals), दैनिक वृत्तपत्रे (Daily Newspapers), वृत्तपत्रे कात्रण सेवा, प्रतिलिपी सेवा (Reprography Service), स्पर्धा परीक्षा ग्रंथसंग्रह, प्रबंध–संग्रह, हस्तलिखित सेवा, नियतकालिकांचे बांधीव खंड आणि दिव्यागांसाठी व्हिल चेअर व रॅम्प.

२. **IT आधारित सेवा (IT based Services) :**

Internet Access, Access to Full text e-Books, Access to Full text e-Journals, Access to Full text e-Database, वाय. फाय झोन, RFID आधारित Issue/Return, सेल्फ चेकआउट किओस्क (Self Checkout Kisok), पुस्तक ड्रॉप बॉक्स (Book Drop Box), एस.एम.एस./ईमेल सूचना सेवा (SMS/ E-Mail/Alert Service), OPAC/WebOPAC सेवा, Remote Login, साहित्यिक चोरी तपासणे (Plagiarism Checking) आणि LAD Notice/Display.

अहवाल कालावधीत ज्ञानस्त्रोत केंद्रामध्ये आयोजित कार्यक्रम :

दिनांक ९ ऑगस्ट, २०२४ रोजी विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्रात ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्ताने 'ग्रंथपाल दिवस' साजरा करण्यात आला.

दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला.

दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने 'वाचन प्रेरणा दिवस' साजरा करण्यात आला.

दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी 'राष्ट्रीय युवा दिन' च्या निमित्ताने स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली.

दिनांक १९ फेब्रुवारी, २०२५ ला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

दिनांक १४ एप्रिल, २०२५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती

दिनांक २२ जून, २०२५ रोजी डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते जयंती ज्ञानस्त्रोत केंद्र, रामदासपेठ येथे साजरी करण्यात आली.

विद्यापीठ मुलींचे वसतिगृह :

वरिष्ठ अधीक्षिका: प्राध्यापिका डॉ. रिता वडेटवार
(प्रभारी कार्यभार)

अधीक्षिका : कु. सरोज लांजेवार (कंत्राटी)

दि. ०७/२/२०२५ रोजी महिला वसतिगृहात मुलींचा निरोप समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विद्यापीठाचे प्र–कुलगरु. डॉ. राजेंद्र काकडे, डॉ. प्रफुल्ल साबळे, श्री. नितीन विश्वकार महिला वसतिगृहाच्या वरिष्ठ अधीक्षिका डॉ. रिता वडेटवार, अधीक्षिका कु. सरोज लांजेवार व मुलींच्या उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला.

दि. ३१/०५/२०२५ रोजी विद्यापीठ मुलींच्या वसतिगृहाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर परिसर असे नाव देण्यात आले. या नामकरण सोहळ्याला लाभलेले उद्घाटक मा. न्यायमूर्ती श्रीमती मुकुलिका जवलकर (मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर), कार्यक्रमाला लाभलेले अध्यक्ष मा. कार्यकारी कुलगुरु डॉ. माधवी खोडे चवरे (भा.प्र.से) कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. सौ. कांचनताई नितीनजी गडकरी, मा सौ. सीमा दिनेश कश्यप, मा. श्री. वामन तुर्के तसेच विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

मुलींच्या विकासासाठी विविध वर्कशॉप, सेमिनार वसतिगृहामध्ये घेतले जातात. मुलींच्या आरोग्य तपासणीसाठी प्रत्येक हफ्त्याला विद्यापीठाच्या डॉ. सरोज शामकुवर ह्या महिला वसतिगृहातील मुलींना भेट देऊन त्यांच्या आरोग्याविषयी तपासणी करून समस्या सोडवीत असतात. मुलींना वसतिगृहात विविध सोयी – सुविधा पुरविल्या जातात. त्यामध्ये चोवीस तास थंड व गरम पाणी, Invertor, Computer Lab, Internet आणि चोवीस तास वायफायची सुविधा, न्यूज पेपर (इंग्रजी व मराठी), रोजगार संदर्भ पेपर, रीडिंगरूममध्ये व टी. व्ही हॉल मध्ये झोपण्यासाठी कुलरची व्यवस्था, CCTV Camera, फस्ट एड बॉक्स, मुलींसाठी फ्रीज, टी. व्ही, कार्यक्रमासाठी डी. जे. तसेच स्नानगृह स्वच्छ करण्यासाठी साफसफाई कर्मचारी आहे. वसतिगृह हे एकदम स्वच्छ असते. मुलींसाठी तक्रारपेटी व नोटीस बोर्ड आणि भोजनालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. मुलींच्या वसतिगृहामध्ये बगीच्याची व्यवस्था करण्यात आली. निसर्गरम्य वातावरण वसतिगृहाला लाभलेले आहे. मुलींच्या खिडक्यांना मच्छरांच्या संरक्षणासाठी Mosquite Net तसेच पिण्याचे शुद्ध पाणीसुद्धा उपलब्ध आहे.

विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह :

अधीक्षक : डॉ. हितेश दडमल (अति. कार्य.)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे चालविल्या जाणारे विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह हे सर्वात मोठे वसतिगृह असून ह्यात ३८० विद्यार्थ्यांची राहण्याची सोय उपलब्ध आहे.

या वसतिगृहात एकूण सहा निवासी भाग (Block) असून एक मुख्य इमारत आहे. ज्यामध्ये एकूण ११० खोल्या असून प्रत्येकी २ विद्यार्थी राहतील अशी व्यवस्था आहे. देशातील विविध शाखेच्या विद्यार्थ्यांना या वसतिगृहात प्रवेश दिला जातो. सर्व विद्यार्थी वसतिगृहाद्वारे आयोजित कार्यक्रमात सहभागी होत असतात. येथील विद्यार्थी शांततामय व आनंददायी वातावरणात राहतात. वसतिगृहात स्वच्छता कार्यक्रम असो की, नियोजित व्याख्यान असो, विद्यार्थी त्यात उत्साहाने सहभागी होतात.

वसतिगृहात १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन, २६ जानेवारी गणराज्यदिन व २६ नोव्हेंबर संविधानदिन दरवर्षी साजरे केले जातात. याशिवाय संत सेवालाल जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व गणेश उत्सव दरवर्षी साजरा केल्या जातो. शिवाय विद्यार्थ्यांच्या सामान्य बैठकीसुद्धा वेळोवेळी घेतल्या जातात. अनेक प्रकारच्या कार्यक्रमात आमच्या वसतिगृहाचे विद्यार्थी सहभाग नोंदवित असतात.

स्नातकोत्तर व औषधिशास्त्र विद्यार्थी वसतिगृह :

अधीक्षक : डॉ. सं. ही. इन्दुरवाडे (अति. कार्य.)

विशेष माहिती :

वसतिगृहामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे –

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग व ध्यान सत्रांचे आयोजन करण्यात आले.

डॉ. एस. एच. इंदूरवाडे यांनी १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी राष्ट्रीय ध्वज फडकविला. वार्डन यांनी वसतिगृहातील अधिकारी व सुरक्षा कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांद्वारे गणेश उत्सव सात दिवसांचा साजरा करण्यात आला.

दि. २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती निमित्त वसतिगृह स्वच्छ करण्यात आले व स्वत:चे कार्य स्वत: करण्याची शपथ घेण्यात आली.

दि. १८ जानेवारी २०२५ रोजी आरोग्य व स्वास्थ्य उपक्रम कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी मोफत आरोग्य तपासणी शिबिर तसेच मानसिक आरोग्य जनजागृती व ताण–तणाव व्यवस्थापन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व विकास व करिअर मार्गदर्शन यावर सत्रे आयोजित करण्यात आली. तसेच डिजिटल साक्षरता कार्यशाळा (ए. आय. साधनांचा वापर, ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म्स, आर्थिक साक्षरता ॲप्स व उद्योजकतेवरील मार्गदर्शन व स्टार्ट–अप कल्पना स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

दि. १९ फेब्रुवारी रोजी वसतिगृह विद्यार्थी व अधिकाऱ्यांद्वारे शिवजयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

उद्यान विभाग :

अधीक्षक : श्री. प्रवीण गोतमारे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉ, डी लक्ष्मीनारायण परिसर येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या संविधान प्रस्ताविका पार्कमध्ये लॅन्डस्केप उद्यान, पॉप–अप स्प्रिंकलर यंत्रणा, रंगीत कारंजा इत्यादीचे निर्मितीकरण करून परिसर सुशोभित करण्यात आला.

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परीसरात २५०० विविध वृक्षांची रस्त्याच्या दुतर्फा व सुरक्षा भिंतीलगत लागवड करण्यात आलेल्या. Peltophorum pterocarpum, Azadirechta indica, (Neem), cassia pistula (Amaltas), Karanj, Syzygium cumini (Jamun), Artocarpus heterophyllus (Jack fruit), Terminalia cattapa (Indian almond), etc. तसेच प्रशासकीय भवन समोरील उद्यानाची, प्लॅन्टर, मुख्य प्रवेशद्वारासमोरील दोन्ही बाजूला तयार करण्यात आलेल्या लॅन्डस्केपींगची व रस्ता दुभाजकावर विविध प्रकारची शोभिवंत फुलझाडांची वार्षिक देखभाल करण्यात आली.

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर येथील रुसा इमारतीसमोर तयार करण्यात आलेले लॅन्डस्केप उद्यान व मानसशास्त्र विभाग ते रुसा इमारतीपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा लागवड करण्यात आलेल्या ११० शोभिवंत (अंमलतास) वृक्षांची वार्षिक देखभाल करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सेरीकल्चर व बायोरिसोर्स मॅनेजमेंट रिसर्च अंबा विहार, दक्षिण अंबाझरी रोड या परिसरात तयार करण्यात आलेल्या नवीन लॅन्डस्केप उद्यानाची वार्षिक देखभाल करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या लक्ष्मीनारायण तंत्रसंस्था परिसरातील परीक्षा भवन इमारती समोरील उद्यानाची वार्षिक देखभाल करण्यात आली.

विद्यापीठाच्या डी. लक्ष्मीनारायण परिसर येथील विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह समोरील उद्यान व सुभेदार हॉल समोरील फुटबॉल मैदानावर हिरवळ व लॅन्डस्केपची वार्षिक देखभाल करण्यात आली.

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर कॅम्पस येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुतळा सभोवताल तयार करण्यात आलेले नवीन लॅन्डस्केप उद्यान, ज्ञानस्त्रोत केंद्र समोरील लॅन्डस्केप उद्यान, रेणुवीय जीवशास्त्र आणि अणुवंशकीय अभियांत्रिकी विभाग, यु. जी. सी. ॲकेडेमीक स्टॉफ कॉलेज इमारती समोरील लॅन्डस्केप उद्यान, गणित विभागासमोरील परिसरात व गृहविज्ञान विभागामध्ये तयार करण्यात आलेल्या नवीन लॅन्डस्केप उद्यान तसेच मुख्य प्रवेशद्वार समोरील दोन्ही बाजूला तयार करण्यात आलेले एकूण २२ लॅन्डस्केपिंग उद्यानाची वार्षिक देखभाल

करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, सिव्हील लाईन येथील उद्यानाची वार्षिक देखभाल करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक विद्यापीठ परिसर कॅम्पस अमरावती रोड, जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसर, विद्यापीठ अतिथीगृह, डी. लक्ष्मीनारायण परिसर, संपूर्ण वसतिगृह परिसर, यु. जी. सी. ॲकेडेमीक स्टॉफ कॉलेज परिसर, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, भाऊसाहेब कोलते ग्रंथालय परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग परिसर, परीक्षा भवन परिसर तसेच विद्यापीठाचा विविध परिसर येथील २,१३,५०८.३० वर्गमीटर क्षेत्रफळ (५२.७७ एकर) मोकळ्या जागेत पावसाळ्यात वाढलेल्या जंगली गवत व बुशेसची मशिनद्वारे कापणी करून परिसर स्वच्छ करण्यात आले.

विद्यापीठाच्या विविध कार्यक्रमाकरिता व समारंभाच्या उद्घाटनाप्रसंगी सभागृहाचे सुशोभिकरण करण्याकरिता शोभिवंत झाडांच्या कुंड्यांची व फुलांची सजावट करण्यात आली.

विद्यापीठाच्या विविध परिसरात नैसर्गिक उन्मलून पडलेल्या झाडांची नियमानुसार विल्हेवाट करण्यात आली.

उद्यान विभागाची विशेष उपलब्धी व उपक्रम :

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील राष्ट्रीय महामार्ग विभाग नागपूर यांच्याद्वारे २५०० फुलांच्या सावलीच्या झाडांची लागवड करून ३ वर्ष देखभालीसहित पूर्तता करण्यात आली.

विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय परिसरामध्ये लागवड करण्यात आलेल्या ५,००० वृक्षांची नागपूर महानगरपालिकेतर्फे संगोपनासह वार्षिक देखभाल करण्यात आली. उद्यान विभागाद्वारे संपूर्ण विविध प्रशंसनीय प्रस्ताव/कार्यक्रम/नवीन योजनांचे वेळोवेळी कार्य परिपालित करण्यात येतात.

मुद्रण व प्रकाशन विभाग :

प्रकाशन अधिकारी : श्री. प्रवीण गोतमारे (अति. कार्य.)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील मुद्रण व प्रकाशन विभागामध्ये विद्यापीठ मार्गदर्शिका–२०२४, वर्धापनदिन व विविध समारंभाच्या निमंत्रण पत्रिका, विद्यापीठ दैनंदिनी २०२५, विद्यापीठाचा ११२ वा दिक्षांत समारंभाची निमंत्रण पत्रिका, पदके व पारितोषिके यादी, पीएच. डी. यादी, पीएच. डी. पदवी प्रमाणपत्र इत्यादी छपाई करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील मुद्रण व प्रकाशन विभागामध्ये वार्षिक अहवाल २०२३–२४, अर्थसंकल्प २०२५–२६, विद्यार्थी विकास विभागाचा वार्षिक अहवाल २०२४–२५, ज्ञानस्त्रोत केंद्राचा वार्षिक अहवाल, तक्रार निवारण समितीचा अहवाल, विद्यापीठाद्वारे बृहत आराखडा २०२४–२५, गरुड झेप पुस्तिका चाररंगी छपाई करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा विज्ञान खंड–१७ प्रकाशित करण्यात आला.

राष्ट्रसंताची जनजागृती चलवल ग्रंथ व वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवनदर्शन ग्रंथ विद्यापीठाने शताब्दी महोत्सव पर्वावर दिनांक ४ ऑगस्ट २०२४ रोजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी प्रकाशित करण्यात आले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे ई–मासिक विद्यासंवाद प्रत्येक महिन्याला डिजिटल स्वरूपात प्रकाशित करण्यात आले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील मुद्रण व प्रकाशन विभागाद्वारे पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश अर्ज व माहिती पुस्तिका २०२५–२०२६ डिजीटल स्वरूपात प्रकाशनार्थ बाबतची संपूर्ण प्रक्रीया पूर्ण करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने शतकपूर्ती वर्ष पूर्ण केल्याने विद्यापीठाचा इतिहास हा ग्रंथ दिनांक २४ मार्च २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मुद्रण व प्रकाशन विभागातर्फे दैनंदिन व्यवस्थापन परिषद, अधिसभा, विद्यापरिषद सभेसंबंधीची तसेच कार्यालयीन आवश्यक दस्ताऐवज, परीक्षा विभागातील परीक्षेसंबंधी सर्व स्वरूपाची कामे, परीक्षा मूल्यांकनसंबंधी कामे व विद्यापीठाचे शैक्षणिक विभागाकरिता टी. सी. बुक, आय कार्ड, प्रवेश फॉर्म, नोंदणी पुस्तिका, लेटर हेड, बील बुक असे विविध प्रकारची छपाई संबंधीची कामे करण्यात आली.

मुद्रण व प्रकाशन विभागामध्ये विविध संशोधन प्रकाशने विक्रीकरिता उपलब्ध आहे तसेच विद्यापीठातील संपूर्ण विविध प्रशंसनीय प्रस्ताव/कार्यक्रम/नवीन योजनांचे वेळोवेळी कार्य परिपालित करण्यात येतात.

मागासवर्ग विशेष कक्ष :

उपकुलसचिव : श्री. उमेश उईके (अति. कार्य.)

बिंदू नामावलीची प्राथमिक तपासणी व प्रमाणीकरण :

शिक्षक व शिक्षकेतर संवर्गाची बिंदू नामावली तयार करण्यासाठी व आरक्षण धोरण अंमलात आणण्यासाठी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांना विद्यापीठाच्या मागासवर्ग विशेष कक्षाद्वारे मार्गदर्शन केल्या जाते.

शासन निर्णय/परिपत्रक दि. २९.३.१९९७, १८.१०.१९९७, ५.११.२००९, २९.५.२०१७, १४.१.२०१६, २३.९.२०१६, २५.२.२०२२, ११.४.२०२२, २७.२.२०२४ आणि ६.३.२०२४

नुसार विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गाचे तसेच विद्यापीठातील कार्यरत वर्ग–३ व वर्ग–४ संवर्गाच्या बिंदू नामावलीची प्राथमिक तपासणी आणि प्रमाणीकरण या विभागाद्वारे करण्यात येते व त्यास मा. सहायक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयाद्वारे अंतिम मान्यता घेण्यात येते.

शासन निर्णय/सांख्यिकीय माहिती :

विविध पदांचे आरक्षण निर्धारण, त्यानुसार सरळसेवा/पदोन्नती पदभरती, अनुशेष व प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयातून संकलीत करण्यात येते. संकलीत केलेली माहिती शासनाने आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या मागणीप्रमाणे पाठविण्यात येते. तसेच या विभागास आरक्षण धोरणासंदर्भात प्राप्त झालेले शासन निर्णय व परिपत्रक पुढील कार्यवाहीस्तव संलग्नित महाविद्यालयांना वेळोवेळी पाठविण्यात येतात.

शिक्षकपदांची शैक्षणिक पात्रता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची नोंदणी : शिक्षक पदांसाठी नेट/सेट पात्रता धारक उमेदवारांची नोंदणी या कक्षाद्वारे करण्यात येते. संलग्नित महाविद्यालयांच्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर नेट/सेट पात्रता धारक उमेदवारांची यादी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तक्रार निवारण :

मागासवर्गीय कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या प्राप्त तक्रारींची दखल विभागाद्वारे घेतल्या जाते. प्राप्त तक्रारीवर संबंधित महाविद्यालयांकडून विस्तृत अहवाल/अभिप्राय मागविण्यात आलेला असून प्राप्त अहवालाची प्रत तक्रारकर्त्यास पुरवून संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागण्याकरिता जाण्याविषयी कलविण्यात येते.

सल्लागार समिती :

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मा. कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत सल्लागार समितीची वार्षिक अहवाल काळात एकही सभा संपन्न झाली नाही.

विद्यापीठ मार्गदर्शिका (मागासवर्गीयांच्या उपयोगाकरिता):

'विद्यापीठ मार्गदर्शिका' (मागासवर्गीयांच्या उपयोगाकरिता) व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार, मागासवर्ग विशेष कक्षाद्वारे दरवर्षी प्रकाशित करण्यात येऊन सदर पुस्तिकेचे विमोचन विद्यापीठाच्या वर्धापनदिनी दि. ४ ऑगस्ट रोजी करण्यात येते. तसेच 'धम्मचक्र प्रवर्तन दिनी' दीक्षाभूमीवर सदर पुस्तिकेचे निःशुल्क वितरण करण्यात येते. तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठाद्वारे संचालित महाविद्यालये आणि शैक्षणिक विभाग, राज्यातील अकृषी विद्यापीठे, व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य आणि विद्यापीठाचे अधिकारी यांना सदर पुस्तिकेच्या प्रती देण्यात येतात.

विद्यापीठ आंतर–महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा :

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभागातील सांख्यिकी शाखेअंतर्गत आंतर–महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा कार्यक्रम घेण्यात येतो. सत्र २०२३–२०२४ विद्यापीठांतर्गत आंतर–महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेत एकूण २७ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. परीक्षण समितीच्या तज्ज्ञ सदस्यांनी त्यापैकी प्रथम ३ वार्षिकांकांची प्राप्त गुणाधारित निवड केली. तद्वतच सहा अन्य महाविद्यालयांची जिल्हानिहाय उत्तेजनार्थ पारितोषिकांसाठी निवड केली. प्रथम तीन पुरस्कारप्राप्त महाविद्यालये अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत :

प्रथम : हिस्लॉप कॉलेज, टेम्पल रोड, सिव्हील लाईन, नागपूर (The Hislopian वार्षिकांक)

द्वितीय : कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर (कमलगंधा वार्षिकांक)

तृतीय : संताजी महाविद्यालय, वर्धा रोड, नागपूर (Utkarsh वार्षिकांक)

जिल्हानिहाय उत्तेजनार्थ पुरस्कारप्राप्त वार्षिकांक पुढीलप्रमाणे :

नागपूर जिल्हा : सेठ केसरीमल पोरवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कामठी, जि. नागपूर (केसरी वार्षिकांक)

भंडारा जिल्हा : समर्थ महाविद्यालय, लाखनी, जि. भंडारा (अर्चना वार्षिकांक)

गोंदिया जिल्हा : धोटे बंधू सायन्स कॉलेज, गोंदिया (उडान वार्षिकांक)

वर्धा जिल्हा : गोविंदराम सेकसरिया वाणिज्य महाविद्यालय, वर्धा (अर्धसंदेश वार्षिकांक). या सर्व पुरस्कार प्राप्त महाविद्यालयांना विद्यापीठाच्या शिक्षक दिन समारंभात चषक देऊन गौरविण्यात आले.

डॉ. नेल्सन मंडेला विदेशी विद्यार्थी वसतिगृह :

अधीक्षक – डॉ. विकास के. जांभुळकर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे संचालीत डॉ. नेल्सन मंडेला विदेशी वसतिगृह मा. कुलगुरू निवास स्थानाजवळ स्थानांतर झाले आहे. नवीन इमारत विद्यार्थ्यांसाठी पुरेशी पडत नाही. मागील वर्षापर्यंत जवळपास १६ विद्यार्थी राहात होते. नवीन इमारतीत सध्या १० विद्यार्थी प्रवेशित आहेत. सध्या कोणीही विदेशी विद्यार्थी प्रवेशित नाहीत.

सत्र २०२४–२५ मध्ये वरील वसतिगृहाचा वापर विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांना निवासासाठी (Ph.D.) विद्यार्थी संशोधक प्राध्यापकांना तात्पुरते राहण्यासाठी, ॲकेडमीक स्टाफ कॉलेजमध्ये येणाऱ्या प्रशिक्षणार्थींना निवासासाठी, विद्यापीठातील विविध विभागाद्वारे आयोजित सेमीनार व कॉन्फरेंससाठी येणाऱ्या शिक्षकांना राहण्यासाठी सोय उपलब्ध करण्यात येत होती. आता नवीन इमारतीत हे शक्य नाही. विद्यार्थ्यांनाच जागा अपुरी पडत

आहे. सत्र २०२१–२२ पासून वरील वसतिगृह पीएच. डी. संशोधक विद्यार्थ्यांना देण्याचे प्रशासनाने ठरवले आहे.

वसतिगृहात महापुरुषांच्या जयंत्या व तसेच इतर कार्यक्रम पार पाडले जातात. डॉ. नेल्सन मंडेला जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पाडला जातो.

तसेच रक्तदान शिबिर, विविध विषयातील मान्यवरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शक कार्यक्रम पार पाडले जातात. विद्यापीठाचे वैद्यकीय अधिकारी विद्यार्थ्यांच्या नियमित तपासणीसाठी येतात. विद्यार्थ्यांचे वैद्यकीय समोपदर्शन करण्यात येते व आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येते.

१५ ऑगष्ट तसेच २६ जानेवारी व इतर राष्ट्रीय सण मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येतात.

विदेशी विद्यार्थी सल्लागार केंद्र :

सल्लागार – डॉ. विकास के. जांभुलकर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे संचालित विदेशी विद्यार्थी सल्लागार केंद्रात या सत्रामध्ये (२०२४–२५) एकूण ४ विद्यार्थ्यांनी (अप्रवासी) प्रवेशाकरिता अर्ज सादर केला होता. पडताळणीनंतर वरील विद्यार्थ्यांनी विद्यापीठाद्वारे संलग्नीत महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे.

विदेशी विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश देतांना त्यांच्या कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी केली जाते. योग्य ते शुल्क आकारुन तद्नंतरच प्रवेश निश्चित केला जातो. तसेच विदेशी विद्यार्थ्यांना प्रवेशाबाबत संपूर्ण मार्गदर्शन करण्यात येते.

तक्रार निवारण समिती कक्ष :

तक्रार निवारण समितीसमोर दाखल झालेल्या एकूण याचिका १०, अंतिम निकाली लागलेल्या एकूण तक्रार याचिका ०५, तक्रार निवारण समितीसमोर प्रलंबित असलेल्या याचिका ०५.

न्यायालयीन शाखा :

न्यायालयात व विद्यापीठ न्यायाधीकरणासमोर दाखल झालेल्या एकूण याचिका १०१, न्यायालयात व विद्यापीठ न्यायाधीकरणात अंतिम निकाली लागलेल्या याचिका १०, न्यायालयात व विद्यापीठ न्यायाधीकरणासमोर असलेल्या न्यायप्रविष्ठ याचिका १०१.

विद्यापीठ स्वास्थ्य केंद्र :

अहवालवर्षात या केंद्रात एकूण १६५ रुग्णांवर उपचार, मुलींचे वसतिगृह १५२ विद्यार्थिनींवर उपचार, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची तपासणी २५,६११, नवनियुक्त कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी, विद्यापीठात विविध कार्यक्रमांमध्ये वैद्यकीय सेवा, केंद्रामध्ये सामान्य आरोग्य तपासणी, दंत तपासणी, फिजिओथेरपी, कान, नाक, घसा तपासणी, रक्त तपासणी शिबिर घेण्यात आले.

वैद्यकीय तपासणी अहवाल :

अ	विद्यार्थी	'अ' वर्ग	'ब' वर्ग	'क' वर्ग
	नागपुरातील	१०१९	८६०	२४५
	नागपूर बाहेरील	२७९९	७५०२	१४४
	एकूण विद्यार्थी	३८१८	८३६२	३८९
ब	विद्यार्थिनी	'अ' वर्ग	'ब' वर्ग	'क' वर्ग
	नागपुरातील	२६९९	१५३५	६१८
	नागपूर बाहेरील	५९४७	१९५३	३९०
	एकूण विद्यार्थिनी	८६४६	३४८८	१००८

बहुसुविधा संगणक केंद्र :

(Established Under RUSA)

अधिष्ठाता : डॉ. प्रशांत ब्रजमोहन माहेश्वरी

रुसा योजनेअंतर्गत विद्यापीठात एक बहुसुविधा संगणक केंद्र स्थापित केले आहे. विद्यापीठ परिसर येथे हे केंद्र अस्थायीपणे ग्रामगीता भवनमध्ये आहे. विद्यापीठाचे विद्यार्थी, शिक्षक आणि प्रशासन यांना ICT संबधित सुविधा प्रदान करण्याचे MFCC चे लक्ष्य आहे.

केंद्रामध्ये खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत.

E-Classroom (Lab - 1) :

ही लॅब राष्ट्रीय ज्ञान नेटवर्कवर (NKN) सुमारे ३५ संगणकांसह सुसज्ज आहे. ऑनलाइन व्याख्यान आणि demonstration सुलभ करण्यासाठी डिजिटल पोडीयम आणि इलेक्ट्रॉनिक स्क्रीन देखील उपलब्ध आहे. NMEICT च्या अंतर्गत परिसर ग्रंथालयात स्थापित 1 GBPS लिंकशी जोडलेली ही लॅब विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म भरणे, ऑनलाईन नोट्स घेणे इत्यादी सुविधा प्रदान करते. स्कॅनिंग आणि मुद्रण सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे.

Internet आणि दस्तावेज प्रक्रिया सेवा (LAB - 2) :

ह्या लॅबमध्ये प्रत्येक संगणकावर MS OFFICE सुविधेसह ४० संगणक, स्कॅनर आणि प्रिंटर आहेत. विद्यार्थी हाय स्पीड इंटरनेट एक्सेस करतात व त्यांच्या नोट्स, अर्ज–फॉर्म, अहवाल इत्यादी तयार करतात आणि आवश्यक फाईल्सच्या प्रिंटआऊट देखील घेतात. स्कॅनिंग सुविधा देखील उपलब्ध आहे.

Video Conferencing Room (LAB - 3) :

या लॅबमध्ये NICSI कडून स्थापित व्हिडियो कॉन्फरन्सिग सुविधा देण्यात येते. ही सुविधा पूर्णत: कार्यरत आहे आणि विद्यापीठ प्राधिकरणांनी वापरली आहे.

या केंद्राद्वारे उपलब्ध केलेल्या सुविधांबद्दल त्यांना माहिती देऊन शिक्षण विभागाच्या सर्व विभागप्रमुखांना एक परिपत्रक देण्यात आले होते. कोणतेही विभागप्रमुख, शिक्षक किंवा

विद्यापीठातील अधिकारी त्यांच्या कोणत्याही शैक्षणिक आणि प्रशासकीय endeavours यापैकी कोणत्याही लॅबमध्ये घेऊ शकतात.

केंद्राद्वारे प्रदान केलेल्या सेवांबद्दल तपशीलवार अहवाल आणि केंद्राद्वारे चालविल्या जाणारे प्रशासकीय कार्य खाली सादर केले आहे.

केंद्राद्वारे प्रदान केलेल्या सेवा :

विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी E-Suvidha Facilities कार्यालय म्हणून काम करते. या विद्यापीठाच्या Placement & Training चे संपूर्ण Interviews Online or Offline या कार्यालयामार्फत सुरू असते. विविध विभागांचे Online किंवा संगणकावर सेमीनार बहुसुविधा संगणक केंद्र येथे आयोजित केल्या जाते.

रुसा बहु–सुविधा केंद्र :

संयोजक : डॉ. उमेश अ. पलिकुंडवार

रुसा केंद्राची मुख्य उद्दिष्टे माणजे विद्यार्थी संशोधक आणि शास्त्रज्ञ यांना उच्च दर्जाच्या संशोधन उपक्रमांमध्ये सहयोग आणि गुंतण्यासाठी एक उत्कृष्ट वातावरण प्रदान करणे, इच्छुक संशोधकांना वाजवी दरात अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध करून देणे आणि महसूल निर्मितीद्वारे केंद्र टिकवून ठेवणे हे आहे. रुसा केंद्राने या सत्रात एकूण महसूल रु ४,२९,९३०/– प्राप्त केले आहे.

भारत सरकारच्या राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानांतर्गत (RUSA 1-0) १.५ कोटी रुपयांचे अनुदान आणि नागपूर विद्यापीठाच्या साधारण निधी मधून लक्षणीय अनुदानाचा उपयोग रुसा मल्टीफॅसिलिटी सेंटरची पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आणि सुशोभिकरणासाठी करण्यात आला. रुसा सेंटरमध्ये X.R.D., G.C.-M.S., T.G.A./D.T.A., L.C.-M.S. आणि F.T.I.R. इत्यादी उपकरणे सुसज्ज आहे हि उपकरणे मटेरियल सायन्स, फार्मास्यूटिकल सायन्स, लाइफ सायन्स, केमिकल सायन्स, बायोकेमिकल सायन्स, मायक्रोबायोलॉजी, वनस्पतिशास्त्र इत्यादींच्या संशोधनासाठी आवश्यक आहेत. हे केंद्र विद्यापीठातील शिक्षक, संशोधक विद्यार्थी, संलग्न महाविद्यालयातील संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील लोकांसाठी माफक दरात सुविधा पुरवत आहे. आम्हाला मिळालेले नमुने केवल नागपूर विभागातीलच नाहीत तर मुंबई, कोईम्बतूर, जबलपूर, चंदीगड इत्यादी सहभारतातील विविध ठिकाणाहून विश्लेषणासाठी आले आहेत. नमुना वैशिष्टयांसोबतच, रुसा केंद्राने शेवटच्या सत्रात या अत्याधुनिक उपकरणांवर हॅंड्स–ऑन प्रशिक्षण कार्यक्रम आणि जागरूकता सत्र देखिल आयोजित केले.

भारत सरकारच्या राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानांतर्गत (PM-USHA) १० कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले. हे अनुदान Confocal Microscope, Ultracentrifuge आणि Transmission Electron Microscope (TEM) सारखी नवीन उपकरणे खरेदी करण्यासाठी मंजूर करण्यात आले Confocal Microscope आणि Ultracentrifuge स्थापित करण्यात आले आहेत आणि त्यांच्या सुविधा लवकरच कार्यान्वित होतील. याव्यतिरिक्त, TEM पुढील महिन्यात येण्याची अपेक्षा आहे. रुसा मल्टीफॅसिलिटी सेटरच्या नवीन इमारतीमध्ये विभाजन कार्य, मॉड्युलर फर्निचरची स्थापना आणि विद्युतीकरण कार्य पूर्ण झाले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग - मालविया मिशन शिक्षण प्रशिक्षण केंद्र:

संचालक : डॉ. सी. जी. देठे

यूजीसी– मालविया मिशन शिक्षण प्रशिक्षण केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांसाठी निरनिराळ्या विषयांच्या उजळणी वर्गांचे व उद्बोधन वर्गांचे आणि कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत असून प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी विविध तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात येते.

विद्यापीठ अनुदान आयोगअंतर्गत आयोजित कार्यक्रमांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

उद्बोधन वर्ग :

अ. क्र.	वर्गाचे नाव	कालावधी	प्रशिक्षणार्थिंची संख्या
	एनईपी २०२० उद्बोधन संवेदनग्रहण वर्ग :		
१.	जुलै अ	०१.०७.२०२४ ते १५.०७.२०२४	५८
२.	ऑगस्ट अ	०१.०८.२०२४ ते १५.०८.२०२४	५३
३.	ऑक्टोबर अ	०१.१०.२०२४ ते १५.१०.२०२४	६०
४.	नोव्हेंबर ब	१६.११.२०२४ ते ३०.११.२०२४	५८
५.	डिसेंबर अ	०१.१२.२०२४ ते १५.१२.२०२४	११५
६.	डिसेंबर ब	१६.१२.२०२४ ते ३०.१२.२०२४	६५
७.	जानेवारी अ	०१.०१.२०२५ ते १५.०१.२०२५	५३

अ. क्र.	वर्गाचे नाव	कालावधी	प्रशिक्षणार्थिंची संख्या
८.	जानेवारी ब	१६.०१.२०२५ ते ३०.०१.२०२५	९०
९.	फेब्रुवारी अ	०१.०२.२०२५ ते १५.०२.२०२५	५९
१०.	फेब्रुवारी ब	१६.०२.२०२५ ते २८.०२.२०२५	९६
११.	मार्च अ	०१.०३.२०२५ ते १५.०३.२०२५	१२७
१२.	मार्च ब	१६.०३.२०२५ ते ३०.०३.२०२५	७०
१३.	एप्रिल अ	०१.०४.२०२५ ते १५.०४.२०२५	१८७
१४.	एप्रिल ब	१६.०४.२०२५ ते ३०.०४.२०२५	८६
१५.	मे अ	०१.०५.२०२५ ते १५.०५.२०२५	१३६
१६.	जून अ	०१.०६.२०२५ ते १५.०६.२०२५	६१
१७.	जून ब	१६.०६.२०२५ ते ३०.०६.२०२५	७७
		एकूण प्रशिक्षणार्थींची संख्या	१८३७
	उद्‌बोधन वर्ग :		
१.	१२ वा फॅकल्टी इंडक्शन प्रोग्राम	०७.०८.२०२४ ते ०६.०९.२०२४	५९
२.	१३ वा फॅकल्टी इंडक्शन प्रोग्राम	०२.०१.२०२५ ते ३०.०१.२०२५	८७
३.	१४ वा फॅकल्टी इंडक्शन प्रोग्राम	०२.०६.२०२५ ते २८.०६.२०२५	१२५
		एकूण प्रशिक्षणार्थींची संख्या	२७१
	उजळणी वर्ग :		
१.	मूलभूत विज्ञान रिफ्रेशर कोर्स	०७.१०.२०२४ ते १९.१०.२०२४	८०
२.	इंग्रजी रिफ्रेशर कोर्स	०७.१०.२०२४ ते १९.१०.२०२४	५१
३.	मराठीतील रिफ्रेशर कोर्स	०७.१०.२०२४ ते १९.१०.२०२४	३५
४.	भारतीय ज्ञान परंपरा रिफ्रेशर कोर्स	०३.०२.२०२५ ते १५.०२.२०२५	६६
५.	योग रिफ्रेशर कोर्स	०३.०२.२०२५ ते १५.०२.२०२५	५३
६.	व्यवसाय अभ्यास रिफ्रेशर कोर्स	०९.०६.२०२५ ते २१.०६.२०२५	५७
		एकूण प्रशिक्षणार्थींची संख्या	३४२
	अल्पकालीन वर्ग :		
१.	जेंडर सेन्सिटायझेशनवर अल्पकालीन अभ्यासक्रम	२३.०९.२०२४ ते २८.०९.२०२४	५०
२.	समाजिक विज्ञानातील संशोधन पद्धतीसाठी शॉर्ट टर्म कोर्स	०३.०६.२०२४ ते ०८.०६.२०२४	४९
३.	विज्ञानातील संशोधन पद्धतीसाठी शॉर्ट टर्म कोर्स	०८.०७.२०२४ ते १३.०७.२०२४	३९
४.	नेतृत्व विकास शॉर्ट टर्म कोर्स	१६.१२.२०२४ ते २१.१२.२०२४	३८
५.	समाजिक विज्ञानातील व विज्ञानातील संशोधन पद्धतीसाठी शॉर्ट टर्म कोर्स	०५.०५.२०२५ ते १०.०५.२०२५	१३८
		एकूण प्रशिक्षणार्थींची संख्या	३१४

इतर उपक्रम :

अ. क्र.	वर्गाचे नाव	कालावधी	आयोजित अभ्यासक्रमाची संख्या
१.	प्री पीएच.डी. कोर्स वर्क	०९.१२.२०२४ ते २१.१२.२०२४	३०
२.	प्री पीएच.डी. कोर्स वर्क	२१.०४.२०२५ ते ०३.०५.२०२५	४१
		एकूण प्रशिक्षणार्थींची संख्या	७१

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग :

संचालक (प्रभारी) : डॉ. निशिकांत राऊत
(दि. १० ऑक्टोबर २०२४ पर्यंत)
संचालक (प्रभारी) : डॉ. समित माहोरे
(दि. ११ ऑक्टोबर २०२४ पासून)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये कलम ४६(१) नुसार आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ अस्तित्वात आले आहे. या मंडळातील नवीन तरतुदींनुसार प्रौढांकरिता तसेच ज्येष्ठ नागरिकांकरिता आजीवन अध्ययन, मूल्य शिक्षण व जीवन कौशल्य या क्षेत्रातील संशोधनास चालना देण्याकरिता विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यासाठी विविध अध्ययन, संशोधन व विकास परिसंस्था आणि विविध प्रादेशिक व राष्ट्रीय संस्था तद्वतच शासकीय अभिकरणे यांच्यात सहकार्याच्या दृष्टीने धोरणात्मक व कार्यात्मक आदान प्रदान करणे अपेक्षित आहे. नवीन कायद्याची अंमलबजावणी सुरू असून मा. कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली आजीवन अध्ययन व विस्तार विभाग विविध उपक्रम कार्यान्वित करीत आहेत. विभागाद्वारे चालविण्यात येणारे सर्व अभ्यासक्रम सत्र २०२१–२२ पासून क्रेडीट बेस्ड करण्यात आले.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाला सत्र २०२४–२०२५ या सत्रात अभ्याक्रमासंबंधीचे सर्व शुल्कातून रुपये ३२,२१,७५७/– (रुपये बत्तीस लक्ष एकेवीस हजार सातशे सत्तावन फक्त) इतकी रक्कम प्राप्त झाली. २०२४–२५ पासून प्रथम विद्यापीठ कायद्याच्या कलम ११२ चा वापर करून खाजगी कौशल्य शिक्षण प्रदातांना मान्यता प्रदान केली. अहवाल कालावधीत आयोजित विभिन्न उपक्रम खालीलप्रमाणे आहेत.

कौशल्यविकास प्रशिक्षण अभ्यासक्रम:

निरंतर शिक्षण योजनेअंतर्गत स्वयंनिर्वाहित प्रमाणपत्र अभ्यासक्रम :

विभागाद्वारे विविध स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयांमध्ये निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांतर्गत अल्पकालीन अभ्यासक्रम चालविण्यात येतात. अहवाल कालावधीत एकूण २४ संस्था/महाविद्यालयांमध्ये ३८ अभ्यासक्रम चालविण्यात आले असून ६६९ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे.

Details of Courses Sanctioned under Continuing Education Program 2024-2025		
No. of the College/Institute	No. of Courses	No. of Students
24	38	669

जीवन शिक्षण अभियानांतर्गत अल्पकालीन प्रशिक्षण अभ्यासक्रम :

विभागाद्वारे विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये जीवन शिक्षण अभ्यासक्रमांतर्गत अल्पकालीन अभ्यासक्रम चालविण्यात येतात. अहवाल कालावधीत एकूण ३५ महाविद्यालयांमध्ये १३६ अभ्यासक्रम चालविण्यात आले असून ३२८४ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे.

Details of Courses Sanctioned under Jeevan Shikshan Abhiyan 2024-2025		
No. of the College	No. of the Courses	No. of Students
35	136	3284

Skill Based Programme :

विभागाद्वारे विविध स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयांमध्ये Skill Based Programme अंतर्गत अभ्यासक्रम चालविण्यात येतात. अहवाल कालावधीत एकूण १ संस्था/महाविद्यालयांमध्ये ४ अभ्यासक्रम चालविण्यात आले आहे.

Sanction Courses Under Recognition to Skill Based Programmes (2024-2025)		
No. of the College	No. of the Course	No. of Students
1	04	NIL

अभ्यासक्रम समिती भेटी : विभागाद्वारे विविध स्वयंसेवी संस्था व महाविद्यालयांमध्ये चालविण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र अभ्सासक्रमांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी मा. कुलगुरुंनी मान्यता दिलेल्या तज्ञांची समिती प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केल्यानंतर अभ्यासक्रमांना मंजुरी देण्यात येते. सत्र २०२४–२०२५ मध्ये २५ स्वयंसेवी संस्था व महाविद्यालयांना भेटी देण्यात आल्या.

अभ्यासक्रम समिती भेटी : Direction 37 of 2022 नुसार आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे Skill Based Programmes ला मान्यता प्रदान करण्याकरिता प्रस्ताव प्राप्त झालेत. त्या प्रस्तावांना मान्यता प्रदान करण्याकरिता अभ्यासक्रमांशी संबंधित अधिष्ठाता अभ्यासक्रमांच्या प्रस्तावांची प्राथमिक तपासणी करण्याकरिता ०१ संस्थेला प्रत्यक्ष भेट देवून अभ्यासक्रमांना मंजुरी प्रदान केली.

उन्नती, सहयोग, सक्षम व संस्कार प्रकल्प :

विभागाद्वारे विविध महाविद्यालयांमध्ये 'आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र' स्थापन केले जातात. या केंद्रांतर्गत विभागाचे चतुर्विध प्रकल्प कार्यान्वित केले जातात मा. कुलगुरुंनी सर्व अभ्यासक्रम क्रेडीट बेस्ड झाल्याने याही प्रकल्पांना मार्क्स न देता ग्रेड देण्यासाठी मंजुरी देवून उन्नती, सहयोग, सक्षम व संस्कार प्रकल्पाची मार्गदर्शिका मंजूर केली आहे.

सत्र २०२४–२५ या सत्रात खालीलप्रमाणे महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता.

Semester I			
No. of College Participated	Total Student	Boys	Girls
56	5037	2100	2937
Semester II			
29	3656	1678	1978

अहवाल कालावधीत विभागाद्वारे ५ सभा आयोजित करण्यात आल्या.

विभागाद्वारे अहवाल कालावधीत घेण्यात आलेल्या परीक्षा :

विभागाद्वारे विविध स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयांमध्ये निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांतर्गत अल्पकालीन अभ्यासक्रम चालविण्यात येतात. या अभ्यासक्रमांची परीक्षा विभागाद्वारे Online/Offline पद्धतीने घेण्यात येतात. विभागाद्वारेच निकाल जाहीर करून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येतात.

Offline Examinations	No. of students	Online Examinations CEP/Skill Based	No. of students
17	309	35	1774

तंत्रज्ञान आणि ऊर्जा पार्क :

संचालक : डॉ. प्रकाश इटनकर

वर्ष २०२४–२५ हे वर्ष फलदायी ठरले जे या प्रकल्पाची संकल्पना आणि त्यानंतर योग्य उद्दिष्टे आणि उद्दिष्टे देण्याच्या दृष्टीने विभागाने केलेल्या जमिनीवर आधारित होते. यासह, आम्ही आनंदाने अद्यतनित करतो की प्रकल्प मंजूर झाला आहे आणि त्याची मंजुरी मिळाली आहे. रु. ४४.१२४३ कोटी, जे सरकारच्या आदेशाद्वारे विद्यापीठाला सूचित केले गेले आहे. Sankirn-2022/72/Vushu-2, दिनांक २९ नोव्हेंबर २०२३. त्याची प्रत यासोबत सामायिक केली आहे.

आमच्या मागील अहवालाच्या अनुषंगाने, माजी माननीय कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी मंजूर केलेल्या आणि नामांकित तंत्रज्ञान आणि ऊर्जा पार्क समितीने आय. आय. टी. मद्रास संशोधन केंद्राला भेट दिली. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. अजय अग्रवाल, पीडब्ल्यूडी अभियंता श्री. अतुल गोटे आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे तंत्रज्ञान आणि ऊर्जा पार्क संचालक डॉ. प्रकाश इटनकर हे समिती सदस्य होते. ज्यांनी ६ डिसेंबर २०२४ रोजी भेट दिली. आय. आय. टी. मद्रासच्या बांधकाम, पायाभूत सुविधा तयार करण्यात सहभागी असलेल्या एजन्सी आणि लोकांची ओलख पटवणे, आय. आय. टी. मद्रासने वापरलेले आर्थिक नियोजन आणि संसाधने समजून घेण्यासाठी संस्थात्मक संरचनेचा अभ्यास करणे, त्याची प्रशासकीय रचना समजून घेणे आणि आय. आय. टी. मद्रास आणि त्याच्या संशोधन केंद्रातील सहयोगी व्यवस्था समजून घेणे यावर या भेटीचा भर होता.

समितीने आरटीएम नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुंना त्यांची शिफारस सादर केली ज्यामध्ये तंत्रज्ञान आणि ऊर्जा पार्कसाठी ओलखल्या जाणाऱ्या आणि वाटप केलेल्या जागेच्या मध्यभागी तंत्रज्ञान आणि ऊर्जा पार्कची फेज १ इमारत बांधण्याचा प्रस्ताव आहे.

अशी शिफारस करण्यात आली की त्याचा डिझाइन भाग सक्षम, अनुभवी आणि प्रसिद्ध वास्तुविशारदांनी करावा ज्यांना अद्वितीय इमारती बनवण्याचा आवश्यक अनुभव आहे. कलम ८ आणि कलम २५ अ कंपनी म्हणून तंत्रज्ञान आणि ऊर्जा पार्क स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली तसेच पुढील १० ते १५ वर्षांसाठी आर्थिक सल्लागार मंडळ आणि मास्टर प्लॅन तयार करण्याची शिफारस करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात तंत्रज्ञान आणि ऊर्जा पार्क बांधण्यासाठी, अशा नाविन्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण अभियांत्रिकी प्रकल्पांचा आवश्यक अनुभव असलेल्या योग्य वास्तुविशारदाची नियुक्ती करण्याचा विचार करण्यात आला. या संदर्भात प्रगती झाली आहे आणि मेसर्स अमृता टर्नकी प्रोफेशनल प्रायव्हेट लिमिटेड नागपूरला मान्यता प्राप्त वास्तुविशारद म्हणून ओलखले गेले आहे आणि या कंपनीला अधिकृतपणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या तज्ञ वास्तुविशारदांच्या पॅनेलमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे आणि ११/६/२०२५ रोजी पीडब्ल्यूडीचे मुख्य अभियंता नागपूर यांना माहिती पत्र देण्यात आले आहे.

पुढे सुश्री अमृता टर्नकी प्रोफेशनल प्रायव्हेट लिमिटेडचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासोबत सामंजस्य करार होईल आणि परस्पर करारानंतर प्रस्तावित इमारतीचे आरेखन पीडब्ल्यूडीकडे मंजुरीसाठी पाठवले जातील, त्यानंतर तंत्रज्ञान आणि ऊर्जा पार्कच्या बांधकामाचे काम लवकरच सुरू होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन विभाग :

संचालक : डॉ. अविनाश फुलझेले

महापरिनिर्वाण दिन : दि. ६ डिसेंबर, २०२४ रोजी नागपूर विद्यापीठात आयोजित व्याख्यानात डॉ. विद्या चौरपगार यांनी हिंदू कोड बिलाच्या प्रश्नावर डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या राजीनाम्याचा उल्लेख करून त्यांच्या स्त्रीहक्कांप्रती असलेल्या दृढ प्रतिबद्धतेवर प्रकाश टाकला. डॉ. अविनाश फुलझेले यांनी विशेषत: दलित महिलांसाठी असलेल्या आंबेडकरांच्या समावेशक स्त्रीवादी दृष्टिकोनाचा उल्लेख केला. या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सपना रावले यांनी आणि आभार प्रदर्शन अशोक जामगडे यांनी केले

चर्चासत्र बहिष्कृत हितकारिणी सभा शताब्दी :

दि. २० सप्टेंबर, २०२४ रोजी नागपूर विद्यापीठात बहिष्कृत हितकारिणी सभेच्या शताब्दीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. मधुकर कासारे यांनी डॉ. आंबेडकरांनी १९२४ साली स्थापन केलेल्या या संस्थेच्या सामाजिक उत्थानातील ऐतिहासिक भूमिकेवर भर दिला. या सभेचे अध्यक्षस्थान डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषवले. विविध वक्त्यांनी आंबेडकरांनी सुरू केलेल्या वसतिगृहे, ग्रंथालये व बहिष्कृत भारत या वृत्तपत्राच्या स्थापनेचा उल्लेख करून त्यांच्या

कार्यावर प्रकाश टाकला. प्रा. अशोक गोडघाटे यांनी जातीय गुलामीच्या प्रश्नावर भाष्य केले. मिलिंद कीर्ती, डॉ. संजय शेंडे आणि डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांच्या सत्रांमधून आंबेडकरांच्या कार्याचा दीर्घकालीन प्रभाव अधोरेखित करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण उमरे तर आभार प्रदर्शन दिलीप लेहगावकर यांनी केले.

डॉ. आंबेडकर स्मृती व्याख्यान :

दि. २३ सप्टेंबर, २०२४ रोजी आय. आय. टी. दिल्लीचे डॉ. यशपाल जोगदंड यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात जात आणि अस्पृश्यतेचे मानसशास्त्र या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी जात ही एक घातक मानसिकता असून ती मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम करणारी असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी मानसशास्त्राच्या माध्यमातून भेदभावविरोधी संघर्षाची गरज मांडली. अध्यक्षीय भाषणात डॉ. अविनाश फुलझेले यांनी जातिव्यवस्थेच्या विचारसरणीत परिवर्तनाची आवश्यकता अधोरेखित केली या कार्यक्रमास विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. १३ ऑक्टोबर, २०२४ रोजी साउथ कॅरोलिना स्कूल ऑफ लॉ येथील प्राध्यापक डॉ. केविन ब्राऊन यांनी 'आफ्रिकन–अमेरिकन वंशभेद आणि भारतातील जातीय भेदभाव' यावरील व्याख्यानात दोन्ही समाजातील अन्यायपूर्ण अनुभवांतील साम्य अधोरेखित केले. त्यांनी अमेरिकेमध्ये वंशभेदासोबतच वाढणाऱ्या जातीयतेचा आणि कॅलिफोर्नियामध्ये प्रस्तावित असलेल्या ॲटीकास्ट कायद्याचा उल्लेख केला. डॉ. अविनाश फुलझेले यांनी डॉ. आंबेडकरांचे अस्पृश्यता विरोधी कार्य आणि आंतरराष्ट्रीय नागरी हक्क चलवलीमधील त्याचे प्रतिबिंब यावर भाष्य केले. या कार्यक्रमात डॉ. आंबेडकरांचा ब्लॅक चलवलीवरील प्रभाव, तसेच डब्लू. ई. बी. ड्युओ बॉयस यांच्याशी झालेला पत्रव्यवहार यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. गौतम कांबले यांनी केली. तर सूत्रसंचालन विजय बडोदेकर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक विचार परिसंवाद :

दि. २१ डिसेंबर, २०२४ रोजी डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विकासविषयक आधारित परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादात डॉ. प्रशांत कडू, डॉ. युगुल रायालू, डॉ. संदीप तुंडूरवार आणि डॉ. विकास जांभुळकर यासारख्या प्रख्यात शैक्षणिक व्यक्तींनी सत्रांचे नेतृत्व केले. नदीजोड प्रकल्प, नियोजित अर्थव्यवस्था, गरिबी निर्मूलन आणि आर्थिक न्याय हे या परिसंवादातील प्रमुख विषय होते. परिसंवादाचा समारोप डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांच्या 'औपनिवेशिक आर्थिक धोरण' भाषणाने झाला.

जनजागृती/विस्तार/शिक्षण/अध्यापन कार्यक्रम :

दि. २९ जानेवारी, २०२४ रोजी डॉ. सुनिता सावरकर यांनी आंबेडकरी चलवलीत ढोर–चांभार महिलांच्या अत्यंत महत्त्वपूर्ण पण दुर्लक्षित योगदानावर व्याख्यान दिले. त्यांनी गुणाबाई गाडेकर आणि अनुसया शिवतरकर यासारख्या नेत्या महिलांचा उल्लेख करून त्यांच्या त्यागमय योगदानावर प्रकाश टाकला. डॉ. अविनाश फुलझेले यांनी दलित समाजांमध्ये ऐक्य आणि ऐकोपा वाढवण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमात इतिहास पुन:प्राप्त करण्याची आणि सामूहिक ऐक्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

पुणे कराराचे महत्व :

दि. २९ जानेवारी, २०२४ डॉ. सी. डी. नाईक यांनी पुणे कराराला एक ऐतिहासिक टप्पा म्हणून संबोधले आणि तो विविध समुदायातील तणाव दूर करणारा व भारतीय संविधानाच्या विकासावर प्रभाव टाकणारा महत्त्वपूर्ण करार असल्याचे सांगितले. डॉ. आंबेडकर चेअरच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात समतेच्या मूल्यांची आणि एकात्मतेच्या विचारांची आजही असलेली प्रासंगिकता अधोरेखित करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अविनाश फुलझेले होते. भीमराव फुसे यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार प्रदर्शन वंदना बुरडकर यांनी केले.

७५ वा भारतीय संविधान दिन समारंभ :

दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी ७५ व्या संविधान दिनानिमित्त नागपूर विद्यापीठात डॉ. अनिल बनकर यांचे व्याख्यान झाले. त्यांनी भारतीय समाजात संविधानिक मूल्यांचे दृढ रोपन होण्याची आवश्यकता अधोरेखित केली. भारताच्या धर्मनिरपेक्ष चौकटीचे विशेषत्व सांगतांना, त्यांनी एकधर्मी सत्तावादाच्या संभाव्य धोका यावरही इशारा दिला. भारतीय आणि अमेरिकन संविधानाची तुलना करतांना त्यांनी भारतीय संविधानाच्या समावेशकतेचे व समानतेच्या बांधिलकीचे कौतुक केले. या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषवले. बंधुता व लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग या कार्यक्रमात दिसून आला.

संविधान जनजागृती मोहीम :

दि. ७ ऑक्टोबर, २०२४ रोजी 'आजचा भारत आणि भारतीय संविधान' या विषयावर व्याख्यान श्री. भैय्याजी पांढरीपांडे राष्ट्रीय सामाजिक कार्य संस्था, नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेअरच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. प्रा. डॉ. मनोहर नाईक यांनी भारताच्या विविधतेचे आणि विकासाचे रक्षण करणाऱ्या घटक म्हणून संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुनील कोडापे होते. त्यांनी दैनंदिन जीवनात संविधानिक मूल्यांची जपणूक

करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. रेखा जगनाडे आणि डॉ. पवन येवतकर यांनी कार्यक्रमाचे समन्वयन केले. या कार्यक्रमात शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त दिसून आला.

नशा मुक्त भारत अभियान आणि 'स्वच्छ भारत दिन' साजरा – विषय : 'वर्तनात्मक स्वच्छता– सांस्कृतिक स्वच्छता':

दि. १९ सप्टेंबर, २०२४ रोजी डॉ. आंबेडकर चेअरच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' मोहिमेअंतर्गत स्वच्छ भारत मिशनच्या १० वर्षपूर्तीनिमित्त ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली. १ ऑक्टोबर रोजी विशेष कार्यक्रम घेण्यात आला. ज्यात स्वच्छतेची प्रतिज्ञा, वृक्षारोपन व स्वच्छता कर्मचाऱ्यांचा गौरव समाविष्ट होता. त्यामध्ये नागरिकांचा सक्रीय सहभाग या उपक्रमात नोंदवण्यात आला.

९८ व्या महाड सत्याग्रह स्मृतिदिनानिमित्त संवाद:

दि. २० मार्च, २०२५ रोजी ९८ व्या महाड सत्याग्रह स्मृती दिनानिमित्त आयोजित संवाद सत्रात डॉ. भीमराव गोटे यांनी या ऐतिहासिक घटनेचे आजच्या सामाजिक–आर्थिक संदर्भातील सातत्यपूर्ण महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी महाडच्या घटनापलिकडे पाहणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या व्यापक दृष्टिकोनावर भर दिला. जो एक न्यायपूर्ण आणि बौद्ध समाज निर्माण करण्याच्या दिशेने होता. डॉ. गोटे यांनी खाजगीकरण, रोजगार, संकुचन आणि शिक्षणातील अडथळे याविषयी इशारा दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषवले आणि आंबेडकरांच्या तत्त्वांचे पुन:स्मरण घडवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीपकुमार लेहगावकर यांनी तर आभार प्रदर्शन ॲड. वनिता मेश्राम यांनी केले.

'कौशल्य, व्यावसायिक व उच्च शिक्षण' विषयक आंतर–चेअर कार्यक्रम :

दि. ३१ जानेवारी, २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, पुणे येथे सिम्बायोसिसमधील आंबेडकर चेअर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील डॉ. आंबेडकर चेअर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर–चेअर सहयोग कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. स्वाती मुजूमदार आणि प्रा. एस. के. धोराट यासारख्या नामवंत अभ्यासकांनी सामाजिक न्यायाच्या चौकटीत कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. सत्रांमध्ये व्यवसायाभिमुख प्रशिक्षण, उच्च शिक्षण आणि समावेशक अध्यापन पद्धती या विषयांवर चर्चा करण्यात आली. मुख्य वक्त्यांनी ज्ञान व रोजगार यामधील दरी भरून काढण्याची गरज अधोरेखित केली. विशेषत: वंचित समुदायासाठी प्रा. नीता इनामदार यांनी आंबेडकरी मूल्यांशी सुसंगत मुक्तीपर शिक्षणाची गरज मांडली. कार्यशाळेचा समारोप अभ्यासपूर्ण चर्चा, शिफारशी आणि डॉ. हेमांगी कडलक यांच्या आभार प्रदर्शनासह झाला. ज्यात सामाजिकदृष्ट्या जागरूक व कौशल्याधिष्ठित शिक्षणव्यवस्थेची निकड अधोरेखित करण्यात आली.

वक्तृत्व स्पर्धा व १८ तास अभ्यास अभियान :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर विचार विभागातर्फे वक्तृत्व स्पर्धा आणि १८ तास अभ्यास अभियान आयोजित करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेत चौदा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी गोलमेज परिषदांतील आणि संविधान सभा कार्यातील आंबेडकरांच्या भूमिकेवर भाष्य केले. राजेंद्र कांबळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. अभ्यास मॅरेथॉनमध्ये एकूण बहात्तर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शांत आणि सुसज्य परिसरात भोजन व अल्पोपहाराच्या सुविधेसह हा उपक्रम पार पडला. डॉ. आंबेडकरांच्या कठोर अभ्यासशैलीने प्रेरित होऊन विद्यार्थ्यांनी आपल्या वाचन क्षमतेचा आत्मपरिक्षणात्मक अनुभव घेतला. अनेक वरिष्ठ विद्यार्थ्यांनीही हे १८ तासाचे आव्हान पूर्ण केले व त्यानंतर आपल्या अनुभवातून समाधान व्यक्त केले

प्रशिक्षण, आंतरवासिता व रोजगार विभाग :

प्रशिक्षण व रोजगार विभाग हा विद्यापीठाचा एक महत्त्वाचा विभाग आहे. जो शैक्षणिक अभ्यासक्रम व उद्योगातील गरजा यामध्ये दुवा साधतो. हे सेल विद्यापीठाचा सर्व मान्यताप्राप्त आणि चालविलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण, आंतरवासिता आणि नोकरीची संधी उपलब्ध करून देतो.

प्रशिक्षण व रोजगार विभागाची मुख्य कामे :

१. अप्टिट्यूट, टेक्निकल आणि सॉफ्ट स्किलचे प्रशिक्षण देणे.
२. इंटर्नशिप (आंतरवासिता), फिल्ड प्रोजेक्ट आणि ऑन–जॉब ट्रेनिंग यांचे समन्वय.
३. कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह व जॉब फेअर आयोजित करणे.
४. उद्योगांशी संपर्क वाढवणे आणि भरवसा असलेले संबंध ठेवणे.

Training Report :

Academic Year	2024-25		Total
Types of Training	Soft skill	Technical Skill	
No. Student Benefitted	1271	300	4471
Institute Benefitted	24	04	93

Placement Report:

Colleges	Academic Session 2024-25
PGTD Campus	74
Affiliated College	698

Our Major Recruiters:

Company Name	Company Name	Company Name	Company Name
TCS Mihan, NGP	Teleperformance Shuttle Ltd.	Navbharat/ Navrashtra	Inventys Reaserch Lab Nagpur
HCL, Nagpur	Ultra Tech Cement Gujrat	CEAT Tyres(N/B)	ABP Maza Mumbai
Azim Premji Foundation	Job Fair with skill Deptt, Wardha/Nagpur	RAN Chemical Nagpur	Maharshi Vidhya Mandir (Bhandara)
Hexaware Software Solution, Mihan	Reliable Analytical Lab, Mumbai	JUST Dial	Meghe SOS
Bajaj Allinz Ltd.	Reliance Jio	XDUCE Ahamadabad	Legal Force
Magic Stone LLP Pune	Lupin Pharma Mihan	Accenture Technology	India Mart
Triangle Solution Pune	Macleods Pharmaceutical Limited	Infosys Technology	GMRIC Gujrat
Derinomics Financial Consultant	CMPKY	MECL	AIR
Neco casting	Param Skill	Axis Bank	PRB Infra Project

Job Fair in Association with Skill Development, Employment & Entrepreneurship Divisional Commissionerate, Nagpur

2024	3 December 2024 (Only for Girls)	Convocation Hall, RTMNU	15	135
2025	30 January 2025	Convocation Hall, RTMNU	12	130
	5 June 2025	Convocation Hall, RTMNU	17	268
	22 July 2025	J. M. Patel College, Bhandara	18	411
Ramp Workshop in Association MCED	8 October 2025	Convocation Hall, RTMNU	173 Employer Participated for improving Performance of MSME	

विद्यार्थी विकास विभाग :

संचालक : डॉ. विजय खंडाळ

शैक्षणिक सत्र २०२४–२०२५ मध्ये मा. कुलगुरूंच्या नेतृत्वात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम–५६ नुसार विद्यार्थी विकास विभागाने बहुविध कार्यक्रम आणि योजना राबविल्या.

उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार २०२२–२०२३ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ निवड समितीद्वारे खालील विद्यार्थ्यांची या पुरस्काराकरिता निवड करण्यात आली. सदर पुरस्कार दि. ४/८/२०२४ ला वर्धापनदिन समारोहात मा. कुलगुरूंच्या शुभहस्ते सन्मानपूर्वक विजेत्या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला.

'उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार' च्या पुरस्कृत विद्यार्थ्यांची नावे :

१. श्री. नितीन विनोद मरसकोल्हे, ललीतकला विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कु. अश्लेषा राजेश खते, सांख्यिकी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

'उत्कृष्ट सांस्कृतिक उपक्रमपट्टू पुरस्कार' च्या पुरस्कृत विद्यार्थ्यांची नावे :

१. श्री. ब्रायन बेनहूर डोंगरदिवे, हिस्लॉप कॉलेज, नागपूर
२. कु. तेजस्विनी सुनील खोडतकर, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

'उत्कृष्ट राष्ट्रीय छात्रसेना कॅडेट पुरस्कार' च्या पुरस्कृत विद्यार्थ्यांची नावे :

१. श्री. प्रथमेश शरदराव चौधरी, जी. एस. कॉमर्स कॉलेज, वर्धा
२. कु. तन्नू सुमेश शर्मा, हिस्लॉप कॉलेज, नागपूर

आंतर–महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी २०२४ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा सांस्कृतिक संघ निवड करण्याकरिता सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणीचे आयोजन दीक्षांत सभागृहात दिनांक १९ ते २१ सप्टेंबर, २०२४ दरम्यान करण्यात आले होते. निवड चाचणी दरम्यान ७७ महाविद्यालयातील ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. निवड चाचणी दरम्यान निवड झालेल्या ४५ स्पर्धकांचा सांस्कृतिक संघ तयार करण्यात आला.

माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा : माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा इंग्रजी ही स्पर्धा दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेमध्ये नागपूर विद्यापीठाच्या वतीने हिस्लॉप कॉलेज, नागपूरची विद्यार्थिनी कु. मेहंदी खातून शेख हिने सहभाग नोंदवून द्वितीय पुरस्काराची मानकरी ठरली.

'मोहजाल' ड्रग्स एडिक्शनवर जनजागृतीपर डान्स, ड्रामा व नाटक :

दिनांक २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी मा. कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांचे मान्यतेनुसार कुलसचिव डॉ. राजू हिवसे,

डॉ. संजय कविश्वर, अधिष्ठाता तसेच संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडल व डॉ. विजय खंडाळ, संचालक, विद्यार्थी विकास विभाग व इतर मान्यवरांच्या व विद्यापीठाच्या विभागातील व संलग्नित व संचालीत महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत गुरूनानक भवन येथे राधिका क्रिएशन्स नागपूर यांच्या चमुने युवा पिढीवर ड्रग्स एडिक्शनचा होणारा विपरीत परिणामापासून विद्यार्थ्यांना जागरूक करण्याच्या दृष्टिने "मोहजाल" ड्रग्स एडिक्शनवर जनजागृतीपर डान्स, ड्रामा व नाटकाचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य आंतर–विद्यापीठ इंद्रधनुष्य सांस्कृतिक युवा महोत्सव :

२० वा महाराष्ट्र राज्य आंतर–विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव 'इंद्रधनुष्य' चे आयोजन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे दिनांक ७ ते ११ नोव्हेंबर २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आला. या महोत्सवात महाराष्ट्रातील एकूण २६ विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदविला. या युवा महोत्सवात नागपूर विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूने सहभाग घेवून विविध स्पर्धांमध्ये आपले विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत.

इंद्रधनुष्य २०२४–२५ या आंतर–विद्यापीठीय नागपूर विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूंनी विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करून खालील पारितोषिके प्राप्त केली.

प्रथम पारितोषिक : क्लासीकल डान्स, डिबेट, क्वीझ

द्वितीय पारितोषिक : ग्रुप साँग इंडियन, स्पॉट पेंटिंग

तृतीय पारितोषिक : एलोक्युशन, स्कीट, फोटोग्राफी

चॅम्पीयन ट्रॉफी : साहित्यिक या कला प्रकारात

संविधान दिन :

दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी संविधान दिन मा. डॉ. शामराव कोरेटी, अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेत प्रमुख अतिथी मा. डॉ. सच्चिदानंद फुलेकर, नागपूर, मा. कुलसचिव डॉ. राजू हिवसे, संचालक डॉ. विजय खंडाळ व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत दीक्षांत सभागृहात कार्यक्रम पार पडला.

आविष्कार निवड चाचणी :

राज्य व राष्ट्रीय स्तरावरील संशोधनामध्ये वाव मिळविण्यासाठी अनेक संशोधन स्पर्धेत सहभाग घेण्याकरिता विद्यापीठाची चमू जात असते. यावर्षी निवड चाचणी आविष्कार–२०२५ करिता जिल्हास्तरीय निवड चाचणी गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील महाविद्यालयांकरिता धोटे बंधू विज्ञान महाविद्यालय, गोंदिया येथे दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी आयोजित करण्यात आली व नागपूर व वर्धा जिल्ह्यातील महाविद्यालयांकरिता श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, सक्करदरा रोड, नागपूर येथे दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजी व या जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धेत एकूण ३९७ विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभाग घेतला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कार्यशाळेचे आयोजन व अंतिम निवड चाचणीचे आयोजन दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय, डिगडोह हिल्स, हिंगणा रोड, नागपूर येथे करण्यात आले.

नागपूर फिल्म फेस्टीवल २०२५:

स्वामी विवेकानंद व मा. साहेब जिजाऊ यांच्या जयंती दिनासोबत पुण्यश्लोक देवी अहिल्यामाता होळकर यांचे ३५० वे जयंती वर्ष, भगवान बिरसा मुंडाजी यांचे १५० वे जयंती वर्ष, महर्षी दयानंद सरस्वतीजी यांचे २०० वे जयंती वर्ष, भारतीय संविधानाचे ७५ वे गौरवपूर्ण वर्ष व वीर बाल दिवसापासून प्रेरित होऊन नागपूर चलचित्र फाउंडेशन व नागपूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०९ ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय परिसरामध्ये नागपूर फिल्म फेस्टिवल २०२५ चे उद्घाटन डॉ. प्रशांत बोकारे, प्रभारी कुलगुरू यांचे हस्ते डॉ. रवींद्र सिंगल, पुलिस आयुक्त, नागपूर यांचे उपस्थितीत पार पडले. या चार दिवसीय महोत्सवात चित्रपट सृष्टीतील अतुल पांडे (निर्देशक), मिलिंद लेले (निर्देशक), गजेंद्र चौहान (अभिनेता), क्रांती रेडकर (फिल्म निर्देशक व अभिनेत्री), समीर सतिजा (फिल्म लेखक), योगेश सोमन (अभिनेता व लेखक), अजय पुरकर (अभिनेता), विजय दयाल (साउंड इंजिनिअर), गंधार मोकाशी (साउंड इंजिनिअर), दिग्पाल लांजेकर (फिल्म निर्देशक), प्रवीण तरडे (फिल्म निर्देशक) व इतर दिग्गज अभिनेते, दिग्दर्शक व निर्माते सहभागी झाले होते. या सर्व अनुभवी कलावंतांचे विविध विषयांवर मास्टर क्लास झाले. या फिल्म फेस्टिवलमध्ये संपूर्ण भारतातून ३५० शॉर्ट फिल्म्स २२ भाषेमधून व ६५ शहरांमधून प्राप्त झाले. या शॉर्ट फिल्म्सच्या विभिन्न प्रकारामधून परिक्षकांद्वारे निवड करून १४३ फिल्म्स प्रदर्शित करण्यात आले. विभिन्न श्रेणीमध्ये ३४ फिल्म्सला पुरस्कार प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य आंतर–महाविद्यालयीन संशोधन विद्यार्थी परिषद "AVISHKAR":

महाराष्ट्र राज्य आंतर–विद्यापीठीय संशोधन विद्यार्थी परिषद "AVISHKAR 2024-25" चे आयोजन दि. १२ ते १५ जानेवारी, २०२५ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड येथे करण्यात आले होते. नागपूर विद्यापीठाच्या चमूने भरीव कामगिरी करून यश संपादन केले. या स्पर्धेत महाराष्ट्रातील बऱ्याच विद्यापीठांनी सहभाग घेतलेला होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची विद्यार्थिनी कु. समीक्षा वैद्य, श्रेणी व स्तर : औषधिनिर्माणशास्त्र (पदव्युत्तर विद्यार्थिनी) (P.G.) हिने उत्कृष्ट कामगिरी दाखवून प्रथम पारितोषिक प्राप्त केले.

पश्चिम क्षेत्रीय, आंतर–विद्यापीठ युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धा :

A.I.U. द्वारे पश्चिम क्षेत्रीय आंतर–विद्यापीठ युवा महोत्सव, गणपत विद्यापीठ महेसाणा, गुजरात येथे ४ ते ८ जानेवारी, २०२५ (SATRANG THE UNIFEST 2025) चे आयोजन करण्यात आले. पश्चिम क्षेत्रीय युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धेत ४५ विद्यापीठातील २१०० विद्यार्थी व संघ व्यवस्थापक यांनी सहभाग नोंदविला. नागपूर विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूने विविध स्पर्धांमध्ये भरीव कामगिरी करून यश संपादन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाने खालील कला प्रकारामध्ये पारितोषिक प्राप्त केले.

द्वितीय पारितोषिक : क्वीझ प्रोसेशन

तृतीय पारितोषिक : स्कीट, ग्रुप सॉंग इंडियन

चतुर्थ पारितोषिक : लाईट व्होकल, मिमिक्री

पाचवे पारितोषिक : क्लासिकल डान्स, इलोक्युशन, डिबेट

विद्यापीठस्तरीय आंतर–महाविद्यालय सांस्कृतिक स्पर्धा 'युवारंग–२०२५':

विभागाद्वारे गुरुनानक भवन सभागृहात दि. १० ते १३ फेब्रुवारी, २०२५ दरम्यान युवारंग या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यापीठांतर्गत येणाऱ्या १०५ महाविद्यालयातील एकूण २१०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांनी क्रमांक प्राप्त केले अशा विजेत्या कलाकारांना/स्पर्धकांना गुरुनानक भवन सभागृहात समारोपीय कार्यक्रमाच्या दिवशी दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी मा. कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांचे अध्यक्षतेत, प्र–कुलगुरू प्रा. राजेंद्र काकडे, डॉ. समय बनसोड, व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. देवेंद्र भोंगाडे, व्यवस्थापन परिषद सदस्य, श्री. विष्णू चांगदे, अधिसभा सदस्य, कु. पायल किन्नाके, विद्यार्थी प्रतिनिधी यांचे प्रमुख उपस्थितीत व मराठी सिने अभिनेता श्री. अंशुमन विचारे यांचे विशेष उपस्थितीत प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

आंतर–विद्यापीठीय राष्ट्रीय सांस्कृतिक युवा महोत्सव स्पर्धा :

AIU New Delhi व अमेठी विद्यापीठ, नोएडा, उत्तरप्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने अमेठी विद्यापीठ, नोएडा, उत्तरप्रदेश येथे ३ ते ७ मार्च, २०२५ ला झालेल्या आंतर–विद्यापीठीय राष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सव स्पर्धेत नागपूर विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूने विविध स्पर्धांमध्ये भरीव कामगिरी करून यश संपादन केले. या स्पर्धेत भारतातील १२६ विद्यापीठाने भाग घेतलेला होता. यामध्ये खालील स्पर्धेत आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी दाखवून पारितोषिक प्राप्त केले.

प्रथम पारितोषिक : Skit, Debate, Non-Percussion

द्वितीय पारितोषिक : College, Mimicry, Spot Photography

तृतीय पारितोषिक : Classical Dance, Western Vocal solo

A.I.U. National Women Student Parliament:

2nd A.I.U. National Women Student Parliament 2024-25 चे आयोजन सेंचुरीयन विद्यापीठ, पारलाखे मुंडी कॅम्पस, ओडीसा येथे दिनांक १ ते ५ एप्रिल २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. या राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद महोत्सवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या एकूण ०३ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

तक्रार निवारण कक्ष :

शैक्षणिक सत्रामध्ये एकूण २ सभा घेण्यात आली सदर सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या प्राप्त एकूण ४० तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग :

संचालक : डॉ. शरद सूर्यवंशी

आंतर–महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा :

विभागाचे वतीने ८५ (पुरुष/महिला) खेळांच्या आंतर–महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन नागपूर, वर्धा, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांच्या/ संस्थेच्या मैदानावर करण्यात आले.

निवड चाचणीचे आयोजन संघ निवड :

क्रीडा महोत्सव, पश्चिम क्षेत्रीय आणि अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ क्रीडा स्पर्धांसाठी आंतर–महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे समाप्तीनंतर निवड चाचणीचे आयोजन विभागातर्फे करण्यात आले. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडलाद्वारे गठीत निवड समिती सदस्यांनी या निवड चाचणीच्या आधारे विद्यापीठाचा संघ निवडला व निवड झालेल्या संघाचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले.

खेलो इंडिया विद्यापीठ खेळ :

विद्यापीठाच्या टिमने खेलो इंडिया आंतर विद्यापीठ योगासन महिला स्पर्धा इंडोअर स्टेडीयम चैनपुरा, जोधपूर, राजस्थान येथे ८ वे स्थान, मालखांम महिला स्पर्धा इंडोअर स्टेडीयम जयपूर, राजस्थान येथे ७ वे स्थान, जूडो पुरुष स्पर्धा, अटल बिहारी वाजपेयी इंडोअर स्टेडीयम उदयपूर येथे श्री. योगेश शहाणे यांनी तिसरे स्थान (कांस्यपदक ६० कि.ग्रॅ.), जलतरण पुरुष स्पर्धा, स्विमिंग कॉम्पलेक्स, सवाई मानसिंह स्टेडियम, जयपूर येथे श्री. यश गुल्हाने यांनी तिसरे स्थान (कांस्यपदक ५०मी. ब्रेस्टस्ट्रोक) आणि (रौप्यपदक १०० मी. ब्रेस्टस्ट्रोक), ॲथलेटिक्स् महिला स्पर्धा, ॲथलेटिक्स् ट्रॅक फिल्ड, सवाई मानसिंह स्टेडियम, जयपूर येथे कु. तेजस्विनी लामखाने हिने तिसरे स्थान (१०००० mitres Run) पटकाविले.

तसेच जोधपूर येथील टेबल टेनिस पुरुष स्पर्धेमध्ये सहभागी झाले. जयातपूरा आर्चरी रंज, जयपूर राजस्थान येथे कु. ओजस्वी सालवे हिने आर्चरी महिला स्पर्धेत सहभाग घेतला.

अखिल भारतीय विद्यापीठ खेळ : (वैयक्तिक)

अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ फेंसिंग महिला स्पर्धेमध्ये जम्मू विद्यापीठ, जम्मू येथे कु. मंजिरी ताबे हिने तिसरे स्थान (कांस्यपदक), दक्षिण पश्चिम आंतर–विद्यापीठ महिला स्पर्धामध्ये LNCT विद्यापीठ, भोपाल मध्ये कु. दिक्षा हिने तिसरे स्थान (कांस्यपदक). अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ ॲथलेटिक्स महिला स्पर्धेमध्ये, KISS भुवनेश्वर येथे कु. नेहा डभाले पहिले स्थान (सुवर्णपदक). अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ बॉक्सिंग पुरुष स्पर्धा, गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा येथे श्री. अमित यांनी दुसरे स्थान (रौप्यपदक). अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ कॅनॉइंग कायकिंग महिला स्पर्धा चंदीगड विद्यापीठ, मोहाली कु. वैष्णवी अजबले आणि कु. सायली टेम्भुर्णे यांनी तिसरे स्थान (कांस्यपदक K-2 200 mtrs) पटकाविले.

अखिल भारतीय विद्यापीठ खेळ : (टिम इव्हेंट)

दि. १७ ते ११ मार्च, २०२५ रोजी चंदीगड विद्यापीठ, मोहाली येथे विद्यापीठाच्या कॅनॉइंग कायकिंग टिमने अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ कॅनॉइंग कायकिंग महिला स्पर्धेत दुसरे स्थान (कांस्यपदक Dragonboat 200 mtrs), तिसरे स्थान (कांस्यपदक Dragonboat 500 mtr) तिसरे स्थान (कांस्यपदक Dragonboat 1000 mtrs) पटकाविले.

दि. २४ आणि २५ एप्रिल, २०२५ रोजी श्री. जगदेशप्रसाद झाबरमल टिबरेवाला विद्यापीठ, झुंझुनू येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मिनी गोल्फ महिला स्पर्धामध्ये कु. रत्ना उके यांनी पहिले स्थान (सुवर्णपदक सिंगल फेअरवे इव्हेंट), कु. हर्षिका बोरकर आणि श्रुष्टी मेश्राम यांनी पहिले स्थान (सुवर्णपदक डबल फेअरवे इव्हेंट) आणि विद्यापीठाच्या मिनी गोल्फ महिला टिमने पहिले स्थान, कु. खुशी साहू यांनी दुसरे स्थान (रौप्यपदक सिंगल स्ट्रोक इव्हेंट), कु. इशिका हनवत आणि कु. कंचन दुबे यांनी पहिले स्थान (सुवर्णपदक दुहेरी स्ट्रोक इव्हेंट), श्री. साहिल सोनवले आणि कु. कारिना तुहवी यांनी पहिले स्थान (रौप्यपदक मिक्स डबल स्ट्रोक इव्हेंट) तसेच विद्यापीठाच्या मिनी गोल्फ पुरुष टिमने पहिले स्थान, श्री. सुरभ पिसे यांनी पहिले स्थान (सुवर्णपदक सिंगल फेअरवे इव्हेंट) पटकाविले.

पश्चिम क्षेत्रीय आंतर–विद्यापीठ गेम्स् :

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात विद्यापीठाच्या कबड्डी महिला टिमने तिसरे स्थान. अवधेश प्रताप सिंग विद्यापीठ, रिवा (सतना) येथे झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष टिमने दुसरे स्थान तसेच युनिव्हर्सिटी ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, जयपूर येथे हँडबॉल महिला टिमने तिसरे स्थान पटकाविले.

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ (क्रीडा महोत्सव–२०२४) गडचिरोली :

दिनांक १८ ते २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे संपन्न झालेल्या स्पर्धेत बास्केटबॉल महिला टिमने पहिले स्थान, बॅडमिंटन महिला टिमने दुसरे स्थान, टेबल टेनिस पुरुष टिमने तिसरे स्थान, चेस महिला टिमने तिसरे स्थान पटकाविले. कु. आर्य कोरे हिने दुसरे स्थान (४००–८०० मी Run), कु. तोजस्वी लामखाने दुसरे स्थान (५०००मी Run), कु. मिताली भोयर पहिले स्थान (१५००मी Run), कु. नेहा डभाले पहिले स्थान (४००मी Run), कु. आयेशा नासिम तिसरे स्थान (Discuss Throw), श्री. आदर्श भुरे तिसरे स्थान (१०० mtrs Run), श्री. गौरव खोदतकर पहिले स्थान (१५०० mtrs Run), श्री. आशुतोष बावणे तिसरे स्थान (८०० mtrs Run) तसेच श्री. सुमेध काके यांनी तिसरे स्थान (Long Jump) पटकाविले.

■■■

■ प्रकरण पाचवे
विद्यापीठ विकास योजना

दि. १.७.२०२४ ते ३०.६.२०२५ या कालावधीत महाविद्यालय विकास विभागाअंतर्गत खालील प्रकारची कामे करण्यात आलीत.

१. **महाविद्यालयांचे स्थायी संलग्नीकरण :**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या खालील महाविद्यालयाचे परिनियम क्र. १/२०१० व ७/२०१० आणि ५/२०१६ अंतर्गत स्थायी संलग्नीकरण मिळवण्याकरिता प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाले.
१) डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्लू. एस आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, कामठी रोड, नागपूर
२) श्री. संत गाडगे महाराज महाविद्यालय, टाकळी कारगो रोड, हिंगणा, जि. नागपूर

२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या खालील महाविद्यालयांनी परिनियम क्र. १/२०१० व ७/२०१० आणि ५/२०१६ अंतर्गत स्थायी संलग्निकरण प्रदान केले. याबाबतची माहिती निरंक आहे.

३. **विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याबाबत**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित खालील महाविद्यालयांनी स्वायत्तता देण्यासंबंधी यूजीसी नियम एकरूप परिनियम क्र. ३/२०२३ नुसार स्वायत्तता मिलविण्याकरिता प्रस्ताव सादर केले आहे. अशा महाविद्यालयांची यादी खालीलप्रमाणे असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
१) श्रीमती राधिकाताई पांडव कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, दिघोरी नाक्याजवळ, उमरेड रोड, नागपूर
२) अंत्योदया महाविद्यालय, देवग्राम, त. नरखेड, जि. नागपूर
३) गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, १४८–१४९, सालई–गोधनी, चिकना गावाजवळ, हुडकेश्वर रोड, नागपूर
४) आयडीयास इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन एज्युकेशन अॅन्ड आर्किटेक्चर स्टडीज, हुडकेश्वर रोड, आऊटर रिंग रोड, पिपळा, नागपूर

४. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित खालील महाविद्यालय/संस्थांना यूजीसी नियम एकरूप परिनियम क्र. ३/२०२३ नुसार विद्यापीठाकडून स्वायत्तता देण्यात आलेली आहे.**
१) सुर्योदया कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, विहीरगाव, उमरेड रोड, नागपूर
२) कविकुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड सायन्स, रामटेक, नागपूर
३) तिरपुडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एज्युकेशन, सदर, नागपूर
४) शासकीय इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स, सिव्हिल लाईन्स, नागपूर
५) प्रियदर्शिनी जे. एल. कॉलेज ऑफ फार्मसी, इलेक्ट्रॉनिक्स झोन बिल्डिंग, एम. आय. डी. सी., हिंगणा रोड, नागपूर.
६) प्रियदर्शिनी भगवती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, हरपूर नगर, उमरेड रोड, नागपूर
७) श्री. बिंझाणी सिटी कॉलेज, उमरेड रोड, नागपूर
८) श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी, कामठी, जि. नागपूर

५. **संलग्नित महाविद्यालयांना/संस्थांना उच्च अध्ययन व संशोधन कार्याकरिता मान्यता प्रदान करणे.**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत संलग्नित खालील महाविद्यालयांनी/संस्थांनी उच्च अध्ययन व संशोधन केंद्र मिळण्याकरिता निर्देश क्र. ११/२०२३ अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.
१) अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, मंगलवारी बाजार रोड, सदर, नागपूर
२) यशवंत महाविद्यालय, वर्धा

६. **संलग्नित महाविद्यालयांना/संस्थांना यूजीसी कायदा १९५६ अंतर्गत १२ बी मान्यता प्रदान केलेल्या महाविद्यालयांची यादी.**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालय/संस्था यांना उपरोक्त कालावधीत युजीसीच्या नियमानुसार १२ बी अंतर्गत मान्यता प्रदान करण्यात आली नाही.

७. **संलग्नित महाविद्यालयांना/संस्थांना 2 (F) मान्यता प्रदान करणे.**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत संलग्नित खालील महाविद्यालयांना/संस्थांना यूजीसीच्या नियमानुसार 2 (F) अंतर्गत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
१) अनुराग कॉलेज ऑफ फार्मसी, भंडारा रेल्वे स्टेशन रोड, वरठी, त. मोहाडी, जि. भंडारा

८. संलग्नित महाविद्यालयांना/संस्थांना उच्च अध्ययन व संशोधन कार्याकरिता मान्यता प्रदान करणे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत संलग्नित खालील महाविद्यालयांना/संस्थांना उच्च अध्ययन व संशोधन केंद्र म्हणून मान्यता प्रदान करण्याकरिता परिनियम क्र. ६/२०१५ व निर्देश क्र. ६/२०२१ आणि निर्देश क्र. २७/२०२१ आणि निर्देश क्र. ११/२०२३ आणि ३८/२०२४ अंतर्गत प्रस्ताव सादर केले होते. त्यानुसार मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

अनु. क्र.	महाविद्यालयांचे नावे	विषय/ विभाग
१)	वसंतराव नाईक शासकीय इन्स्टिट्यूट ऑफ आर्टस ॲन्ड सोशल सायन्स, नागपूर (नूतनीकरण)	इतिहास, अर्थशास्त्र, संस्कृत
२)	तुलशीरामजी गायकवाड पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, एनएच ७, मोहगाव, वर्धा रोड, नागपूर	सिव्हिल इंजिनिअरिंग
३)	सेवादल महिला महाविद्यालय, सक्करदरा चौक, उमरेड रोड, नागपूर (नूतनीकरण)	पर्यावरण सायन्स आणि प्राणिशास्त्र
४)	डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट स्टडीज ॲन्ड रिसर्च, दीक्षाभूमी, नागपूर (नूतनीकरण)	व्यवसाय प्रशासन, व्यवसाय व्यवस्थापन (एम. बी. ए.)
५)	जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सीआरपीएफ गेट नं. ३, डिगडोह हिल्स, हिंगणा रोड, नागपूर (नूतनीकरण)	१) कम्प्यूटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग २) इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग ३) इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग ४) मेकॅनिकल इंजिनिअरिंग
६)	तायवाडे कॉलेज, महादुला, कोराडी, जि. नागपूर (नूतनीकरण)	वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत विषय : वाणिज्य, व्यवसाय व्यवस्थापन, व्यवसाय अर्थशास्त्र, अकाऊंट व सांख्यिकी आणि इंग्लिश, मराठी, सूक्ष्मजीवशास्त्र, रसायनशास्त्र
७)	धोटे बंधू सायन्स कॉलेज, गोंदिया (नूतनीकरण)	वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र
८)	प्रियदर्शिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सी. आर. पी. एफ., कॅम्पस, हिंगणा रोड, नागपूर	कम्प्यूटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग
९)	डॉ. मधुकरराव वासनिक, पी. डब्ल्यू. एस. आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, कामठी रोड, नागपूर (नूतनीकरण)	वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत विषय : वाणिज्य, व्यवसाय व्यवस्थापन, व्यवसाय अर्थशास्त्र, अकाऊंट व सांख्यिकी आणि इंग्लिश, हिंदी, मराठी, अर्थशास्त्र
१०)	हिस्लॉप कॉलेज, टेम्पल रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर (नूतनीकरण)	प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, जीवरसायनशास्त्र, समाजशास्त्र आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत विषय : वाणिज्य, व्यवसाय व्यवस्थापन, व्यवसाय अर्थशास्त्र, अकाऊंट व सांख्यिकी
११)	कमला नेहरू महाविद्यालय, सक्करदरा चौक, नागपूर (नूतनीकरण)	इंग्लीश
१२)	सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ बिझिनेस मॅनेजमेन्ट रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेन्ट, पावनभूमी, सोमलवाडा, वर्धा रोड, नागपूर (नूतनीकरण)	व्यवसाय व्यवस्थापन
१३)	गुरूनानक कॉलेज ऑफ फार्मसी, मौजा नारी, नं. ८१/१, कामगार नगर, नारी, नागपूर (नूतनीकरण)	फार्मास्यूटीकल सायन्सेस
१४)	सेंट विसेन्ट पलोटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, गवसी मानापूर, वर्धा रोड, नागपूर	कम्प्यूटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग
१५)	श्री. मथुरादास मोहता कॉलेज ऑफ सायन्स, उमरेड रोड, नागपूर (नूतनीकरण)	भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र

■■■

नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ :

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम २०(१) नुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या मंडळाची कार्य दिनांक १.७.२०२४ ते ३०.६.२०२५ पर्यंत खालीलप्रमाणे दर्शविले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ५३(३) नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ

नवोपक्रमाच्या संकल्पनेचा प्रसार करण्यासाठी आणि ज्यामुळे अंतिमत: उपक्रम निर्मिती होते अशा नवसंशोधन प्रक्रियेद्वारे नवनवीन कल्पना, कार्यकारी प्रतिमानांमध्ये पोषक वातावरण निर्मिती करण्याकरिता व ती रुजवण्याकरिता एक नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ आहे.

नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यापीठात एक स्वतंत्र नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम केंद्र स्थापन करेल हे केंद्र, मंडळाकडून वेळोवेळी नेमून देण्यात येतील असे अधिकार वापरेल व अशी कर्तव्ये पार पाडेल.

अहवाल कालावधीत नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळाची ०१ नियमित सभा घेण्यात आली.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ :

उद्योग संस्था, विद्यापीठ व संशोधन केंद्र इतर संस्थेकडून आलेल्या सामंजस्य करारांचा (MOU) प्रस्तावांना छाननी करण्याकरिता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाने गठीत केलेल्या स्क्रिनिंग उपसमितीमध्ये सर्व विद्याशाखांच्या अधिष्ठाता व विषय तज्ज्ञ यांचा समावेश आहे. आलेल्या सामंजस्य करारांची छाननी करून संबंधित प्रस्तावाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ गठीत उपसमितीपुढे ठेवण्यात येते. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ उपसमितीत अध्यक्ष, प्र–कुलगुरू व तज्ज्ञ सदस्यांचा समावेश असतो. अहवाल कालावधीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाची ०१ नियमित सभा घेण्यात आली.

खालील औद्योगिक संस्था, विद्यापीठ व संशोधन संस्थेकडून आलेल्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे.

अ. क्र.	सामंजस्य करार
१.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि जगद्गुरू श्री देवनाथ इन्स्टिट्यूट ऑफ वैदिक सायन्स ॲन्ड रिसर्च, नागपूर.
२.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि टाटा कन्सल्टन्सी सर्विस लिमिटेड, मुंबई
३.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि कन्सर्वेटर ऑफ फॉरेस्ट ॲंड फिल्ड डायरेक्टर ताडोबा अंधेरी रिझर्व, चंद्रपूर
४.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गुजरात मिनरल रिसर्च इंडस्ट्री कन्सल्टन्सी सोसायटी, अहमदाबाद, गुजरात
५.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (वेस्टर्न रिझन), मुंबई
६.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि मिनरल एक्स्प्लोरेशन ॲन्ड कन्सल्टन्सी लिमिटेड, नागपूर
७.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि सेंट जॉन फिशर युनिव्हर्सिटी न्यूयॉर्क, यू. एस. ए.

अधिष्ठाता मंडळ

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १६ मध्ये अधिष्ठात्याचे अधिकार व कर्तव्ये नमूद केल्याप्रमाणे अध्यापनाचा व संशोधनाचा दर्जा, विद्याशाखेतील अध्यापकांचे प्रशिक्षण, विद्याविषयक विकास, शैक्षणिक गुणवत्ता राखणे यासंबंधात विद्यापरिषदेने मान्यता दिलेल्या कार्यक्रमाचे विद्याविषयक नियोजन, विद्याविषयक लेखाजोखा तसेच विद्याविषयक धोरणांची अंमलबजावणी ह्यांचे नियोजन करण्यास जबाबदार आहे. तसेच कलम ३६(१) विद्यापीठाच्या विद्याविषयक कामकाजांमध्ये समन्वय साधण्यासाठी, त्यांचे निरीक्षण करण्यासाठी व ते कार्यान्वित करण्यासाठी आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी अधिष्ठाता मंडळ आहे. विद्याविषयक संशोधन व विकास, उपक्रमशीलता, बौद्धिक संपदा हक्क, औद्योगिक नवसंशोधन व एकात्मिकृत नियोजनासाठी उद्योगांशी संबंध प्रस्थापित करणे या संबंधातील विद्यापीठ विकास योजना राबविण्यासाठी ते जबाबदार असेल आणि ते पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्याविषयक अध्ययनक्रम व संलग्न महाविद्यालयांचा विकास यांचेही हे मंडळ नियोजन करील. त्यांचे संनियंत्रण करून व त्यास मार्गदर्शन करील व त्यात समन्वय साधेल.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३७(१) नुसार अधिष्ठाता मंडलाचे अधिकार व कर्तव्ये यांचा समावेश असतो. त्याप्रमाणे हे मंडळ धोरणांची अंमलबजावणी व नियोजन करण्यास जबाबदार आहे. अधिष्ठाता मंडलाच्या नियमित सभा ३ व तातडीची सभा ११ अशा एकूण १४ सभा अहवाल कालावधीत घेण्यात आल्या.

संशोधन मंडळ

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५९(१) मध्ये दर्शविल्याप्रमाणे संशोधन कार्याची जोपासना करणे, त्यास चालना देणे व बलकटी आणणे यासाठी तसेच विद्यापीठ विभाग, महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यामधील संशोधन कार्यासाठी योजना तयार करणे, समन्वय प्रस्थापित करणे, पर्यवेक्षण करणे व वित्तीय व्यवस्था उभी करणे. यासाठी एक संशोधन मंडळ आहे. संशोधन मंडलाची नियमित सभा २ व तातडीची १ अशा एकूण ३ सभा अहवाल कालावधीत घेण्यात आल्या.

■■■

विद्यापीठ विकास योजना

राज्यशासन/पी. एम. उषा यांच्याकडून विद्यापीठास मंजुरीत विकास निधी

अहवाल कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त विविध इमारतीचे बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाकडून खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

	विवरणपत्र	रु. कोटी			
अ. क्र.	प्रकल्प	एकूण खर्च	सुधारीत खर्च	वितरीत निधी	विद्यापीठाला प्राप्त निधी
१.	टेक्नॉलॉजी ॲन्ड एनर्जी पार्क	३१.५८	४४१२.४३	२०.००	२०.००
२.	तांत्रिक कौशल्य विकास केंद्र	२६.९५	११७२.००	५.००	५.००
३.	जागतिक दर्जाचे आंतर क्रिडा संकुल	३०.२७	४४४१.३८	२०.००	२०.००
४.	प्राचिन इतिहास आणि पुरातत्त्व संग्रहालय	४.२७	८१७.७९	५.००	५.००
५.	आदिवासी इन्क्युबेशन आणि कौशल्य विकास केंद्र	१३.००	———	———	———
	एकूण	१०७.०७	१०८४३.६०	५०.००	५०.००

१) शासनाकडून रु. २० कोटी निधी विद्यापीठाला वितरीत करण्यात आले आहे. सदर रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाला जागतिक दर्जाचे आंतर क्रिडा संकुल उभारण्यासाठी ठेवीचे काम म्हणून वळते करण्यात आले आहे.

२) शासनाकडून रु. २० कोटी निधी विद्यापीठाला वितरीत करण्यात आले आहे. सदर रक्कम रू. २० कोटी सार्वजनिक बांधकाम विभागाला टेक्नॉलॉजी ॲन्ड एनर्जी पार्क इमारतीच्या बांधकाम करण्यासाठी ठेवीचे काम म्हणून वळते करण्यात आले आहे.

३) शासनाकडून रु. ५ कोटी निधी विद्यापीठाला वितरीत करण्यात आले आहे. सदर रक्कम रु. २० कोटी सार्वजनिक बांधकाम विभागाला प्राचिन इतिहास आणि पुरातत्त्व संग्रहालय इमारतीच्या बांधकाम करण्यासाठी ठेवीचे काम म्हणून वळते करण्यात आले आहे.

४) शासनाकडून रु. ५ कोटी निधी विद्यापीठाला वितरीत करण्यात आले आहे. सदर रक्कम रु. २० कोटी सार्वजनिक बांधकाम विभागाला तांत्रिक कौशल्य विकास केंद्राच्या इमारतीच्या बांधकाम करण्यासाठी ठेवीचे काम म्हणून वळते करण्यात आले आहे.

५) दिनांक १९/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या इमारत व बांधकाम समिती क्र. ४/२०२४ च्या बाब क्रमांक २० अन्वये दिनांक १३/०२/२०२५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बाब क्र. २४ अंतर्गत अनु. क्र. २० नुसार पी.एम. उषा अंतर्गत आदिवासी संस्कृती संग्रहालयाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यासाठी व ठेव राशी म्हणून रु. ४,४३,००,०००/— च्या १० टक्के राशी म्हणजे रु. ४४,३०,०००/— इतका निधी विद्यपीठाच्या साधारण निधितून सार्वजनिक बांधकाम विभागास जमा करण्यासाठी मान्यता दिली व त्यानुसार सदर रक्कम रु. ४४,३०,०००/— सार्वजनिक बांधकाम विभागाला आदिवासी संस्कृती संग्रहालयाचे बांधकाम करण्यासाठी ठेवीचे काम म्हणून वळते करण्यात आले आहे.

अहवालकाळात विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात आलेल्या साधारणनिधी अंतर्गत शिष्यवृत्ती/फेलोशिपचा तपशील :

खाता विवरण		स्कॉलरशिप नाव	लाभार्थी विद्यार्थी	रक्कम
१.	साधारण निधीतील व्ययशिर्ष भाग (१) (का–१)(अ) मधून	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ स्मृती संशोधन फेलोशिप सत्र २०२४–२०२५	१००	७२,००,०००/–
१ जुलै २०२४ मधील शिष्यवृत्ती/फेलोशिप १८ विद्यार्थी रु. ७२,००० प्रमाणे एकूण रक्कम – १२,९६,०००/–				
३० जून २०२५ मधील शिष्यवृत्ती/फेलोशिप ८२ विद्यार्थी रु. ७२,००० प्रमाणे एकूण रक्कम – ५९,०४,०००/–				

सत्र २०२४–२०२५ या कालावधीत संशोधन प्रकल्प व मंजूर झालेल्या योजना.

Sr. No.	Name of the Principal Investigator	Name of the Department	Funding Agencies	Sanction Letter No. and Date	Title of Project	Total Sanction Rs.	Grant Received Rs.
1.	Dr. Ravin M. Jugade Professor	Chemistry	Department of Science & Technology	F.No.SR/PURSE/2024/354 (G), dated 22/05/2025	"Promotion of University Research and Scientific Excellence (PURSE) Project."	11,10,84,000/-	8,00,00,000/- 52,10,200/-
2.	Dr. Omprakash P. Chimankar Professor	Physics	Department of Science & Technology	SR/FST/PS-II/2023/247 (C), dated 14/06/2024	"FIST Physical Sciences-Project"	2,23,00,000/-	=-
3.	Dr. Smita Acharya Professor	Physics	UGC-DAE Consortium for Scientific Research	Ref.CRS/2023-24/01/1023, dated 8/04/2025	"Mapping of Anti-Site Disoreering in La2FeMnO6 Double Perovskite System by EXAFS and XANES: to Predict its Functional Aspects"	2,43,240/-	2,43,240/-

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या योजनेअंतर्गत कार्यालयीन खर्च आणि कर्मचाऱ्यांचा पगारा–करिता युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना वेळोवेळी विद्यापीठाच्या साधारण निधीतून अग्रिम देण्यात येतो. सत्र २०२४–२५ या सत्रात खालील दर्शविल्याप्रमाणे तक्त्यातील स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आयोगाकडून मंजुरी पत्र प्राप्त झाले असून स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविल्यानुसार रिजर्व बँक ऑफ इंडिया, नवी दिल्लीच्या विद्यापीठाच्या खात्यात जमा झाले.

अ. क्र.	योजनेचे नाव	मंजुरी पत्र क्र. व दिनांक	रक्कम देणाऱ्या संस्थेचे नांव	आर.बी.आय. च्या खात्यात जमा झाले त्याचे खाते क्र.	रक्कम
१	२	३	४	५	६
१.	Financial assistance under the Scheme "Malaviya Mission – Teacher Training Programme"	F.No.40-39/2024 (HRDC/Salary) Dated 25 June, 2024	U.G.C., New Delhi	१०६७१३०११५१	30,40,000/-
२.	Financial assistance under the Scheme "Malaviya Mission – Teacher Training Programme"	F.No.40-39/2024 (HRDC/Salary) Dated 25 June, 2024	U.G.C., New Delhi	१०६७१३०११५१	6,40,000/-
३.	Financial assistance under the Scheme "Malaviya Mission – Teacher Training Programme"	F.No.40-39/2024 (HRDC/Salary) Dated 25 June, 2024	U.G.C., New Delhi	१०६७१३०११५१	3,20,000/-
				एकूण :	**40,00,000/-**

करिता उपरोक्तप्रमाणे स्तंभ क्र. ६ मधील एकूण बेरीज रु. ४०,००,०००/– (रुपये चाळीस लक्ष फक्त) साधारण निधीत आगम शिर्ष भाग–१ (अ–१) (१२) सा. क्र. ६२९ मध्ये रिजर्व बँक ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या विद्यापीठाचे खाते क्र. १०६७१३०११५१ मधून पी. एफ. एम. एस. प्रणालीद्वारे विद्यापीठाचे साधारण निधीचे खाते क्र. ००४ मध्ये वळते करण्यात आलेले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या योजनेअंतर्गत कार्यालयीन खर्च आणि कर्मचाऱ्यांच्या पगाराकरिता युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना वेळोवेळी विद्यापीठाच्या साधारण निधीतून अग्रिम देण्यात येतो. सत्र २०२४–२०२५ या सत्रात खालील दर्शविल्याप्रमाणे तक्त्यातील स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आयोगाकडून मंजुरी पत्र प्राप्त झाले असून स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविल्यानुसार रिजर्व बँक ऑफ इंडिया, नवी दिल्लीच्या विद्यापीठाच्या खात्यात जमा झाले आहे.

अ. क्र.	योजनेचे नाव	मंजुरी पत्र क्र. व दिनांक	रक्कम देणाऱ्या संस्थेचे नांव	आर. बी. आय. च्या खात्यात जमा झाले त्याचे खाते क्र.	रक्कम
१	२	३	४	५	६
१.	Financial assistance under the Scheme "Malaviya Mission – Teacher Training Programme"	F.No.39-39/2023 (HRDC) Dated 22 July, 2024	U.G.C., New Delhi	१०६७१३०११५१	58,29,332/-
२.	Financial assistance under the Scheme "Malaviya Mission – Teacher Training Programme"	F.No.39-39/2023 (HRDC) Dated 22 July, 2024	U.G.C., New Delhi	१०६७१३०११५१	12,27,228/-
३.	Financial assistance under the Scheme "Malaviya Mission – Teacher Training Programme"	F.No.39-39/2023 (HRDC) Dated 22 July, 2024	U.G.C., New Delhi	१०६७१३०११५१	6,13,614/-
				एकूण :	**76,70,174/-**

करिता उपरोक्तप्रमाणे स्तंभ क्र. ६ मधील एकूण बेरीज रु. ७६,७०,१७४/– (रुपये छाहात्तर लक्ष सत्तर हजार एकशे चौऱ्यात्तर फक्त) साधारण निधीत आगम शिर्ष भाग–१ (अ–१) (१२) सा. क्र. ६२९ मध्ये रिजर्व बँक ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या विद्यापीठाचे खाते क्र. १०६७१३०११५१ मधून पी. एफ. एम. एस. प्रणालीद्वारे विद्यापीठाचे साधारण निधीचे खाते क्र. ००४ मध्ये वळते करण्यात आलेले आहे.

मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी खालीलप्रमाणे ८ ते ११ असे एकूण ४ बॅच, शॉर्ट टर्म कोर्स तसेच टी. डी. एस. चे देयके सादर केली होती.

Batch-8	७०६५०/–	Batch-11	७२०००/–
Batch-9	७२०००/–	Short Term Course	५४०००/–
Batch-10	७२०००/–	TDS @ 10% Batch 9th 9th 10th and Short Term Course	३७८५०/–
		Total-	३,७८,५००/–

उपरोक्तप्रमाणे बॅच–८, बॅच–९, बॅच–१०, बॅच–११ व शॉर्ट टर्म कोर्सचे रक्कम रु. ३,४०,६५०/– रिसोर्स पर्सनला शोधन करण्यात आले व रु. ३७,८५०/– हे टी.डी. एस. कपातीसाठी मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या खात्यात वळते करण्यात आले.

मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी खालीलप्रमाणे देयके सादर केली होती.

M/s Ratan Chandak and Co., Nagpur	१३,५७०/–
Director, MMTTC, RTM Nagpur University (for Telephone and other day to day Miscellaneous Expenses	२४,२८०/–
Total-	३७,८५०/–

उपरोक्त मे. रतन चांडक ॲन्ड कंपनीचे रक्कम रु. १३,५७०/– शोधन करण्यात आले व रु. २४,२८०/– हे दुरध्वनी देयक व इतर आनुषंगिक खर्चासाठी मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या खात्यात वळते करण्यात आले.

मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी खालीलप्रमाणे १२ आणि १३ असे एकूण २ बॅच, शॉर्ट टर्म कोर्स तसेच मे. काले कन्सल्टन्सी, नागपूर आणि टी. डी. एस. चे देयके सादर केलेली होती.

Batch-12	७२०००/–
Batch-13	७२०००/–
Short Term Course	५४०००/–
TDS @ 10% Batch 9th 10th and Short Term Course	२२२९०/–
M/s Kale Consultancy	१४२१०/–
Total-	२,३४,५००/–

उपरोक्त बॅच–१२, बॅच–१३ व शॉर्ट टर्म कोर्सचे रक्कम रु. १,९८,०००/– रिसोर्स पर्सनला आणि मे. काले कन्सल्टन्सी, नागपूर यांना रु. १४,२१०/– चे शोधन करण्यात आले व रु.२२,२९०/– हे टी. डी. एस. कपातीसाठी मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या खात्यात वळते करण्यात आले.

मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी केंद्रात दि. ३१/०७/२०२३ ते दि. ०५/०८/२०२३ या कालावधीत Six days short term course for Training of Teachers on Indian Knowledge System (IKS) Training Programme आयोजित करण्यात आला होता. त्यात, देशभरातील एकूण १५७ जणांचा सहभाग होता. त्यासाठी आयोगाकडून एकूण रक्कम रु. २०,००,०००/– अग्रिम मंजूर करण्यात आला होता. कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर आयोगास त्याचे रक्कम रु. २१,२९,५७८.३२/– चे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आले होते त्यानुसार अतिरिक्त खर्च झालेले रक्कम रु. १,२९,५७८/– चे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मंजुरी पत्र क्र. F.No.5-7/2023(HRDC/IKS) Pt.file Dt.04 June, 2024 प्राप्त झाले होते.

उपरोक्तप्रमाणे मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या खात्यात रक्कम रु. १,२९,५७८/– वळते करण्यात आले.

मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी खालीलप्रमाणे बॅच–१४, १२ वा एफ. आय. पी. प्रोग्राम मे. कार्पेट हाऊस यांचे देयक, सीटिंग चार्जेस ऑफ लोकल मेंबर अॅन्ड अदर मिस्लेनियस एक्स्पेंस आणि टी. डी. एस. चे देयके सादर केलेली होती.

Batch-14	६७५००/–
12th FIP Programme	२११५००/–
TDS @ 10% (Res. Persons) and 2% (Bill)	३११३४/–
M/s Carpet house	६५६६/–
Sitting Charges of Local members and other Miscellaneous expenses	२४३००/–
Total-	३४१०००/–

उपरोक्त बॅच–१४ चे रक्कम रु. ६७,५००/– व १२ वा एफ .आय. पी. प्रोग्राम चे रक्कम रु. २,११,५००/– आणि मे. कार्पेट हाऊस, नागपूर यांचे रक्कम रु. ६,५६६/– असे एकूण रक्कम रु. २,८५,५६६/– चे शोधन करण्यात आले आणि रु. ३१,१३४/– हे टी. डी. एस. कपातीसाठी व सीटिंग चार्जेस व किरकोळ खर्चाचे रु. २४,३००/– असे एकूण रक्कम रु. ५५,४३४/– मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या खात्यात वळते करण्यात आले.

मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी खालीलप्रमाणे शॉर्ट टर्म कोर्स ऑन जेंडर सेंसीटायझेशन आणि किरकोळ खर्च व टी. डी. एस. चे देयके सादर केलेली आहे.

Short Term Course on Gender Sensitization	६७५००/–
TDS @ 10% Resource Persons	७५००/–
Miscellaneous expenses	७५००/–
Total-	८२,५००/–

उपरोक्त शॉर्ट टर्म कोर्स ऑन जेंडर सेंसीटायझेशनचे रक्कम रु. ६७,५००/– रिसोर्स पर्सनला शोधन करण्यात आले आणि रु.७,५००/– हे टी. डी .एस. कपातीसाठी व किरकोळ खर्चासाठी रक्कम रु. ७,५००/– असे एकूण रक्कम रु. १५,०००/– मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या खात्यात वळते करण्यात आले.

विद्यापीठ अनुदान आयोग आणि मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने SWAYAM योजने अंतर्गत SWAYAM Courses MHRD National Reseurce Centre for Refresher Course in Disaster Management at UGC-HRDC of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur मंजूर करण्यात आलेले होते. या योजनेअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून रु. १९,७०,०००/– प्राप्त झाले होते. या प्राप्त अनुदानामधून रु. १२,३८,५५६/– खर्ची झाल्याने त्याचे Utilization Certificate and Income expenditure certificate दि. १७/१०/२०२४ ला विद्यापीठ अनुदान आयोगास पाठविण्यात आलेले आहे. आता विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र क्र. F.No.11-1(9)-2018(HRDC/NRC) Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University Dated October, 2024 अन्वये उर्वरित रक्कम रु.७,३१,४४४/– व्याजासह खालीलप्रमाणे स्तंभ क्र. ५ नुसार दिलेल्या बँकेच्या विवरणानुसार परतावा करण्यास आदेशित केले होते त्यानुसार खालीलप्रमाणे तक्ता सादर करण्यात येत आहे.

	Amount Refund Rs.7,31,444/-	Interest 4 years 9 Months 24 Days @ 3.30% p.a. Rs.1,16,263/-	Total	Bank Details	
				Name of Bank	Canara Bank University Grants Commission, New Delhi-110002.
				Type of Account	Saving
				IFSC Code	CNRB 0008627
				MICR Code	110015170
				Holder of Account	Secretary, University Grants Commission, Bahadur Shah New Delhi-110002
(1)	(2)	(3)	(4)	(5)	
General-76%	5,55,897/-	88,360/-	6,44,257/-	A/c No.8627101002122 (Gen.-76%)	
SC-16%	1,17,031/-	18,602/-	1,35,633/-	A/c No.8627101002123 (SC-16%)	
ST-8%	58,516/-	9,301/-	67,817/-	A/c No.8627101002124 (ST-8%)	
Total-	7,31,444/-	1,16,263/-	**8,47,707/-**		

करिता उपरोक्तप्रमाणे स्तंभ क्र. ४ व ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे A/c No.8627101002122 (Gen.-76%) रु. ६,४४,२५७/-, A/c No.8627101002123 (SC-16%) रु. १,३५,६३३/- आणि A/c No.8627101002124 (ST-8%) रु. ६७,८१७/- असे एकूण रक्कम रु. ८,४७,७०७/- (रुपये आठ लक्ष सत्तेचाळीस हजार सातशे सात फक्त) चे शोधन करण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषदेने दि. ८ डिसेंबर, २०२४ रोजी संपन्न झालेल्या सभेत बाब क्र. १४५ नुसार मान्यता प्रदान केली होती त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उपरोक्त स्तंभ क्र. ५ प्रमाणे दर्शविलेल्या खात्यात रक्कम वळते करण्यात आली.

मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी डॉ. रेखा शर्मा यांच्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र क्र.F.No.39-39/2023(HRDC) Dt.7th November, 2021 नुसार Arrears benefits in respect of Dr. Rekha Sharma, Professor of MMTTP (erstwhile HRDC) during 2012-13 to 2022-2023 करिता रक्कम रु. ७,४६,५६८/- मंजूर केले होते त्यानुसार पी. एफ. एम. एस. प्रणालीद्वारे आर. बी. आय. खाते क्र. १०६७१३०११५१ मधुन डॉ. रेखा शर्मा यांना टी. डी. एस. ची कपात करून रक्कम रु. ६,७१,२११/- चे शोधन करण्यात आले व टी. डी. एस. चा भरणा करण्यास्तव रक्कम रु. ७ ४,६५७/- मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या खात्यात वळते करण्यात आले.

मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी खालीलप्रमाणे खर्चाच्या रक्कमेची मागणी करण्याचे देयके सादर केलेली आहे

Batch-19	६७,५००/-
TDS @ 10% of Resource Persons	७,५००/-
Total-	७५,०००/-

उपरोक्तप्रमाणे बॅच–१९ ची रक्कम रु. ६७,५००/- रिसोर्स पर्सनला शोधन करण्यात आले व रु. ७,५००/- हे टी. डी. एस. कपातीसाठी मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या खात्यात वळते करण्यात आले.

मा. संचालक, युजीसी–(मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र) मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी खालीलप्रमाणे खर्चाच्या रक्कमेची मागणी करण्याचे देयके सादर केलेली आहे

Refresher Course in Marathi	१,३८,३९४/-
Refresher Course in English	२,१०,६०५/-
Refresher Course in Basic Sc.	८१,०००/-
Batch-15	६३,०००/-
Batch-16	६७,५००/-
Batch-17	६७,५००/-
Batch-18	६७,५००/-
STC Leadership Development	६३,०००/-
TDS @ 10% of Resource Persons	८३,२००/-
Miscellaneous/Contingency Exp.	७३,५०१/-
Total-	९,१५,२००/-
उपरोक्तप्रमाणे देयकांची रक्कम रु.९,१५,२००/- चे शोधन करण्यात आले.	

iRISE, 1st Floor, Dr. Homi Bhabha Road, Pune यांचेकडून संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे आयोजित "iRISE Early Carrer Researcher Capacity Building Programme Level-I Workshop" या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. १,५८,९०३/— चे शोधन संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेद्वारे सादर करण्यात आलेल्या देयकांचे शोधन करण्यात आले.

Maharashtra State Faculty Development Academy (MSFDA), Pune यांचेकडून संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे आयोजित "MSFDA, Pune funded Regional Workshop at RTMNU" या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. ८९,१३२/— संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेद्वारे सादर करण्यात आलेल्या देयकांचे शोधन करण्यात आले.

Rajiv Gandhi Science and Technology Commission, Mumbai यांचेकडून विभागप्रमुख, गणित विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे आयोजित "National Mathematics Day Celebration" या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. ४५,०००/— विभागप्रमुख, गणित विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी साधारण निधीतून अग्रिम घेवून कार्यक्रम केल्याने आलेल्या रकमेचे शोधन मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे नावे साधारण निधी खाते क्र. ००४ मध्ये करण्यात आले.

British Society for Neuroendocrinology (BSN Membership Service) यांचेकडून विभागप्रमुख, औषधिनिर्माणशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे आयोजित "Pan-Indian workshop on Neuroendocrinology" या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. ५,३४,८८८=३५ आणि पंजीयन शुल्काचे रक्कम रु. १,००,०००/— तसेच भाग—१ (च—२) मधून विभागाला मंजुरीत रक्कम रु. ५०,०००/— असे एकूण मंजुरीत रक्कम रु. ६,८४,८८८=३५ मधून विभागप्रमुख, औषधिनिर्माणशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे सादर करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,४६,०००/— देयकांचे शोधन करण्यात आले.

Rajiv Gandhi Science and Technology Commission, Mumbai यांचेकडून विभागप्रमुख, गणित विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे आयोजित "National Mathematics Day Celebration" या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. १३,०००/— विभागप्रमुख, गणित विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना शोधन करण्यात आले.

Government of India, Department of Atomic Energy (DAE), Mumbai यांचेकडून विभागप्रमुख, औषधिनिर्माणशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे आयोजित "Empowering Women and Innovating sustainability bridge lab and land for Vikasit Bharat" या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. ३३,३३३/— विभागाद्वारे खर्ची न केल्याने या रकमेचा परतावा Pay & Accounts Officer, DAE यांना करण्यात आले.

प्रधानमंत्री—उच्चतर शिक्षा अभियान (PM-USha) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचेकडून संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे Soft Component या शिर्षाअंतर्गत आयोजित "Artistic and Creative Expression Workshop" या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. १,६०,४३१/— संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेद्वारे सादर करण्यात आलेल्या देयकांचे शोधन करण्यात आले.

प्रधानमंत्री—उच्चतर शिक्षा अभियान (PM-USha) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचेकडून संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे Soft Component या शिर्षाअंतर्गत आयोजित "Professionalism in Workplaces for Non-Teaching Faculties of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University" या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. ८१,३६२/— संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेद्वारे सादर करण्यात आलेल्या देयकांचे शोधन करण्यात आले.

प्रधानमंत्री—उच्चतर शिक्षा अभियान (PM-USha) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचेकडून संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याद्वारे Soft Component या शिर्षाअंतर्गत आयोजित "Culture Diversity and Sensitivity" या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. १,१२,८९४/— संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेद्वारे सादर करण्यात आलेल्या देयकांचे शोधन करण्यात आले.

Rajiv Gandhi Science and Technology Commission Research Project 2024-2025

Sr. No	Name of Investigators	Title	Amount	Status
1.	Dr. Kavita Gour, Priyadarshani J. I. College of Engineering, Nagpur	Innovative Approaches Schiff Base Compounds in Digestive Enzyme Inhibition	3,00,000/-	Ongoing
2.	Dr. Kalpana H. Adhau, Institute of Science, Nagpur	Development of Oxide based electrolyte (CexM 1 – Xo2) (M=Gd, Sm and Nd) materials for low temperature solid fuel cell	4,80,000/-	Ongoing
3.	Dr. Anija Mol T Philip, Hislop College, Nagpur	Harness the Power of Farm Fresh Eggs to Create Innovative Solutions for Removing	4,65,000/-	Ongoing
4.	Dr. Kapil Ganorkar, Shri. Mathuradas Mohota College of Science, Nagpur	Synthesis and Characterization of Cost-effective mixed metal oxide nanocomposite and coated polydopamine based materials for electrochemical applications	4,60,000/-	Ongoing
5.	Dr. Archana Mahakalkar, Government Institute of Forensic Science, Nagpur	Development Genetic markers for forensic insects	4,80,000/-	Ongoing
6.	Dr. Minhaj Ahemd A Rehman, St. Vincent Palloti College of Engineering and Technology, Nagpur	Low- Cost Automatic Solar-Operated Light Trap for Insects in the Agriculture Field.	3,90,000/-	Ongoing
7.	Dr. Nitin Dhote, St. Vincent Palloti College of engineering and Technology, Nagpur	Plant Health Monitoring using Iot-based Drone System	2,80,000/-	Ongoing
8.	Dr. Manisha P. Puranik, Institute of Pharmaceutical Education and Research, Wardha	Rational Design in Silico Studies, Synthesis and in vitro evaluation of substituted Acetic 2-(1,3-Dioxa – 1-3 dihydro 2H-iso indol 2-YI) anhydride derivatives as MMP9 Inhibitors: A promising novel approach for breast cancer treatment.	4,10,000/-	Ongoing

अभियांत्रिकी विभाग :

विद्यापीठातील विविध शैक्षणिक परिसरातील कामाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

सिव्हिल कामे :

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील रूसा केंद्रातील प्रयोगशाळेसाठी ॲल्युमिनियम विभाजन प्रदान करणे. भौतिकशास्त्र विभागाला बहु–मोनोलिथिक पाच–स्तरीय उच्च तन्य पडदा, पावसाच्या पाण्याचे पाईप प्रदान करणे. रसायनशास्त्र इमारतीच्या कक्ष क्रमांक १०७ आणि २१७ च्या आर. सी. सी सदस्यांना संरचनात्मक बळकटीकरण (मजबुतीकरण) आणि दुरुस्ती.

शैक्षणिक अतिथीगृहाच्या पहिल्या मजल्यावरील कॉन्फरन्स हॉलसाठी प्रस्तावित अंतर्गत रचना (इंटेरीयर डिझायनिंग).

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील भौतिकशास्त्र विभागासाठी कार्यालय, प्रयोगशाळा, व्हेट्रीफाईड टाईल्स फ्लोरिंगसह एक्स–रे रूम, पेंटिंग, फॉल्स सिलींग इत्यादींचे नूतनीकरण. जुन्या ऑडिट स्टोअर रूममध्ये प्रकाशन विभाग स्थानांतरित करीत असल्यामुळे कोटा फ्लोअरिंग, पेंटिंग, प्लास्टरिंग तसेच मशिनकरिता आरसीसी फाउंडेशन प्लॅटफॉर्म प्रदान करणे.

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील औषधिनिर्माणशास्त्र विभागाच्या कक्ष क्रमांक ३१, ३१(अ), ३९, ४०, ४१, ४२ आणि ११० येथील नूतनीकरण करण्यात आले.

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील रसायनशास्त्र विभागाला वॉटरप्रूफिंग ट्रीटमेंट, पावसाच्या पाण्याचे पाईप प्रदान करणे.

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील मानसशास्त्र विभागाच्या विस्तारासाठी वर्गखोली, अपंगासाठी स्वच्छतागृह, मुलींसाठी सामान्य खोली बांधकाम तयार करण्यात आले.

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील विविध इमारती आणि रस्त्यांच्या देखभालीसाठी बांधकाम कामांचा वार्षिक देखभाल करार (एक वर्षासाठी).

जमनालाल बजाज इमारतीसमोरील बागेला फरसबंदी, गेट इत्यादींना बाह्य फायबर रीइन्फार्समेंट हेवी ड्यूटी टाईल्स आणि ॲल्युमिनियम खिडकी पुरविणे.

कुलगुरू बंगला आणि शिक्षक निवासस्थान परिसरपर्यंत ट्रायमिक्ससह डब्लूबीएम आणि काँक्रीट रस्त्याचे बांधकाम तयार करण्यात आले.

जमनालाल बजाज प्रशासकीय इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील बी. सी. सेल, खोली क्रमांक २७ आणि खोली क्रमांक २९ ला ॲल्युमिनियम पार्टीशन प्रदान करणे आणि दुरुस्त करणे.

पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावरील बी. सी. सेल आणि आय. आय. एल. विभागासाठी खुल्या टेरेसला पॉलीकार्बोनेट छप्पर आणि कॅन्टीनसाठी तात्पुरते स्वयंपाकघर उपलब्ध करून देणे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे डॉ. व्ही. बी. कोलते मुख्य ग्रंथालय परिसर येथे वादळाच्या पाण्याचे निचरा, प्लिंथ आणि बाजूच्या क्षेत्राचा विकास करणे.

डॉ. व्ही. बी. कोलते मुख्य ग्रंथालय परिसरात पावडर कोटेड ॲल्युमिनियम खिडक्या, ॲक्रेलिक/पॉलीकार्बोनेट खिडक्यांचे पॅन पुरवणे आणि दुरुस्ती करणे, विद्यमान एम. एस. खिडक्यांचे शटर स्टॅक करण्यासाठी दुरुस्त करणे, मुख्य ग्रंथालयातील खोली आणि एम. एस. ग्रिल आणि कॉरिडोर दुरुस्त करणे, केबिन आणि प्रवेशद्वाराचे अंतर्गत काम.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे मुलींच्या वसतिगृहासाठी कोर्ट यार्ड आणि स्टॉर्म वॉटर ड्रेन पाईप लाईनला फायब्रिलिंग फायबर हेवी ड्युटी टाईल्स पुरविणे. वसतिगृहातील विहिरीला एम. एस. स्ट्रक्चरल कव्हर प्रदान करणे

यूजीसी मानव संसाधन विकास केंद्र परिसरात प्लिंथ संरक्षण, रस्त्याच्या कडेला इंटरलॉकिंग ब्लॉक आणि क्षेत्र विकास प्रदान करणे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील अतिथीगृहात ॲल्युमिनियम खिडकी पुरविणे. अतिथीगृहा जवळील जनरेटर इत्यादीसाठी विद्युत उपकेंद्र, शेडसाठी विस्तार उपकेंद्र. अतिथीगृहासाठी (फेज–१) सर्व्हंट क्वॉर्टरचे प्रस्तावित बांधकाम.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विविध परिसरांमधील विविध इमारती आणि रस्त्यांच्या देखभालीसाठी बांधकामांचा वार्षिक देखभाल करार (एक वर्षासाठी). व्ही. सी. बंगल्याला बाह्य रंगकाम, कंपाउंड वॉल, कर्ब स्टोनला तैलचित्र आणि बंगल्यात भूमिगत पाणीपुरवठा पाईपलाईन प्रदान करणे.

गुरुनानक भवन, IGNOU स्टडी सेंटर कॅम्पस परिसर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील कार्यालयीन खोल्यांना स्लाइडिंग खिडकीची व्यवस्था आणि दुरुस्ती.

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील इमारत क्रमांक–०२ (हेरिटेज बिल्डिंग) चे विद्युतीकरण करणे. शैक्षणिक इमारत, छंद मंदिर, कॅन्टीन आणि पंप हाऊसचे विद्युतीकरण करणे. (नॉन हेरिटेज इमारत).

मुख्य प्रशासकीय इमारत परिशिष्ट १ आणि २, शैक्षणिक इमारत, महाविद्यालय विभाग, प्रेस इमारत, कॅन्टीन इमारत यांचे फरशीची दुरुस्ती, रंगकाम आणि इतर विविध दुरुस्ती व देखभालीचे काम.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे लॉ कॉलेज परिसरात ॲल्युमिनियम पार्टीशन, स्लाइडिंग विंडो, एम. एस. जिना आणि टॉयलेट ब्लॉकची दुरुस्तीचे काम.

महाविद्यालयाच्या टेरेसपर्यंत वॉटरप्रुफिंग ट्रीटमेंट, पावसाच्या पाण्याचे पाईप. विद्यमान अंतर्गत बिटुमिनस रस्त्याची दुरुस्ती. लॉ कॉलेजच्या रस्त्याच्या कडेला इंटर लॉकिंग पेव्हिंग ब्लॉक्सची व्यवस्था करणे.

इलेक्ट्रिकल कामे :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय येथे संगणक केंद्र आाणि A.C साठी पॉवर पॉईंट प्रदान करणे. विद्युतीकरण आणि केबल्स, स्ट्रीट लाईट्स, एलईडी पार लाईट आणि सजावटीचे दिवे उभारणे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील परीक्षा गृहातील प्रवासी लिफ्ट क्रमांक २ च्या सुटे भागांची दुरुस्ती आणि बदली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे एक वर्षासाठी विविध कार्यक्रमांसाठी जनरेटर, सिरीज लाईट, पार लाईट, फ्लड लाइट, पेडेस्टल फॅन, डेझर्ट कूलर आणि टॉवर एसीसाठी भाडे शुल्क. २५० केव्हीए ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती आणि एबी स्विच, डिओ फ्यूज आणि आवश्यक ॲक्सेसरीजचा पुरवठा आणि उभारणी.

रुसा केंद्रासाठी बीज मंडळ, एसी आणि अतिरिक्त बीज पुरवठा व्यवस्था, पॅनेल, अर्थिंग्जसाठी विद्युतीकरण प्रदान करणे. विविध विभागांच्या सिलिंग फॅन, एक्झॉस्ट फॅन, वॉल फॅन, पेडेस्टल फॅन आणि स्टोरेज वॉटर हिटरची दुरुस्ती आणि रिवाइंडिग. विविध पंप हाऊससाठी सबमर्सिबल पंपचा पुरवठा आणि उभारणी करणे. विविध इमारतींना विद्युत प्रतिष्ठापनांच्या दुरुस्तीसाठी वार्षिक देखभाल कंत्राट प्रदान करणे.

डॉ. व्ही. बी. कोलते यांच्या मुख्य ग्रंथालयाच्या ग्रंथपाल केबिन आणि ग्रंथालयाच्या प्रवेशद्वाराच्या अंतर्गत कामासाठी विद्युतीकरण प्रदान करणे. तळमजला, पहिला मजला आणि दुसरा मजला येथील स्टॉक रूमच्या नूतनीकरणासाठी विद्युतीकरण प्रदान करणे.

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, रसायनशास्त्र विभाग येथे प्रयोगशाळा आणि ग्रंथालयाच्या नूतनीकरणाअंतर्गत विद्युतीकरण प्रदान करणे.

महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील औषधिनिर्माणशास्त्र विभाग येथील कक्ष क्रमांक ३१, ३१अ, ३९,४०,४१,४२ आणि ११० च्या नूतनीकरणासाठी विद्युतीकरण प्रदान करणे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे भूगर्भशास्त्र विभाग येथे मायक्रोथर्मेन्ट्री प्रयोगशाळा, संग्रहालय एनईडी स्ट्रिप, पॅसेज आणि पॉवर बोर्ड, एसी ओईआर भूगर्भशास्त्र प्रयोगशालेला विद्युतीकरण प्रदान करणे.

जमनालाल बजाज प्रशासकीय इमारत, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे अतिरिक्त वीज पुरवठ्याच्या व्यवस्थेसाठी विद्युतीकरण आणि विज आणि एसीसाठी विद्युतीकरण करणे.

▪▪▪

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १०१ वा वर्धापनदिन व शताब्दी महोत्सव समापन समारंभप्रसंगी उद्घोधन करताना सन्माननीय विशेष अतिथी श्री. नितीनजी गडकरी (मा. मंत्री, परिवहन व महामार्ग विभाग, भारत सरकार). व्यासपीठावर पद्मविभूषित डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व डॉ. पंकज चांदे.

Honourable Chief Guest Shri Nitin Gadkari (Hon. Union Minister for Road Transport and Highways, Government of India) inaugurating the valedictory ceremony of the 101st Foundation Day and Centenary Celebrations of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University with Padma Vibhushan Dr. Raghunath Mashelkar, In-charge Vice-Chancellor Dr. Prashant Bokare, Pro Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Registrar Dr. Raju Hiwase and Dr. Pankaj Chande on the dais.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १०१ वा वर्धापनदिन व शताब्दी महोत्सव समापन समारंभप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे. व्यासपीठावर श्री. नितीनजी गडकरी, (मा. मंत्री, परिवहन व महामार्ग विभाग, भारत सरकार), पद्मविभूषित डॉ. रघुनाथ माशेलकर, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व डॉ. पंकज चांदे.

In-charge Vice-Chancellor Dr. Prashant Bokare expressing his views during the valedictory ceremony of the 101st Foundation Day and Centenary Celebrations of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University; with Hon. Shri. Nitin Gadkari, Padma Vibhushan Dr. Raghunath Mashelkar, Pro Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhye, Registrar Dr. Raju Hiwase, and Dr. Pankaj Chande present.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १०१ वा वर्धापनदिन व शताब्दी महोत्सव समापन समारंभप्रसंगी विद्यापीठाचे उत्कृष्ट आदर्श अधिकारी/शिक्षकेतर कर्मचारी पारितोषिक विजेते आपल्या कुटुंबासोबत.

Outstanding University Officers and Non-Teaching Staff award recipients along with their family members during the valedictory ceremony of the 101st Foundation Day and Centenary Celebrations of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शिक्षक दिनानिमित्त आपले विचार व्यक्त करताना प्रमुख अतिथी डॉ. प्रेम लाल पटेल, संचालक, विश्वेश्वरैया राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, नागपूर. तसेच व्यासपीठावर बसलेले प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व श्री. हरिष पालीवाल.

Chief Guest Dr. Prem Lal Patel, Chancellor, Visvesvaraya National Institute of Technology, Nagpur, expressing his views on Teachers' Day at Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University; with In-charge Vice-Chancellor Dr. Prashant Bokare, Pro Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Registrar Dr. Raju Hiwase and Shri. Harish Paliwal on the dais.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शिक्षक दिनानिमित्त सभागृहात प्रदान करण्यात येणाऱ्या उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, उत्कृष्ट आंतर–महाविद्यालयीन वार्षिकोत्सव स्पर्धा पुरस्काराचे मानकरींसह उपस्थित श्रोतागण.

Dignitaries present during the distribution of awards for Outstanding Teachers and Outstanding Inter-University Annual Competition winners on Teachers' Day at Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि व्हामनगर औद्योगिक महोत्सव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एंड्रप्रान्टेज विदर्भ कार्यक्रमात आपले विचार व्यक्त करताना विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र–कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व उपस्थित औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर.

In-charge Vice-Chancellor Dr. Prashant Bokare expressing his views during the Industrial Exhibition Programme jointly organized by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University and the Chamber of Commerce and Industry with Pro-Vice-Chancellor Dr. Rajendra Kakde, Registrar Dr. Raju Hiwase and industrial sector representatives present.

विद्यापीठाद्वारे आयोजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त 'छत्रपती शिवरायांचा लोक कल्याणकारी रयतेचा विचार' या विषयावर व्याख्यान देताना प्रा. डॉ. हरिदास आखरे, अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील श्रीमती कोकीळाबाई साबडे महिला महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्राध्यापक. शेजारी डावीकडून-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Prof. Dr. Haridas Aakhare delivering a lecture on "Chhatrapati Shivaji Maharaj's People-Oriented Governance" during the programme organized by the University on the occasion of the 395th Birth Anniversary of Chhatrapati Shivaji Maharaj with Pro-Vice-Chancellor Dr. Rajendra Kakde and Registrar Dr. Raju Hiwase present.

विद्यापीठाच्या मराठी विभागाद्वारे आयोजित मराठी भाषा गौरवदिन निमित्ताने 'मराठी भाषा व साहित्य : सद्यःस्थिती आणि आव्हाने' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना महाराष्ट्र टाईम्सचे संपादक श्री. श्रीपाद अपराजित. शेजारी डॉ. श्यामराव कोरेटी, प्रभारी अधिष्ठाता, विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे व इतर.

Shri. Shripad Aparajit expressing his views during the Marathi Language Day programme organized by the University Marathi Department on the topic "Marathi Language and Literature: Contemporary Status and Challenges"; with In-charge Professor Dr. Shyamrao Koreti, Head of the Department Dr. Shailendra Lende and others present.

'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा इतिहास' या पुस्तकाचे विमोचन आणि विद्यापीठ कर्मचाऱ्यांना भेट वस्तू वितरण या समारंभप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना प्रमुख अतिथी मा. सुश्री सरिता कौशिक, कार्यकारी संपादक, एबीपी माझा. व्यासपीठावर उपस्थित डॉ. श्यामराव कोरेटी, प्रभारी अधिष्ठाता, डॉ. समय बन्सोड, मा. कुलपती नामित व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भा.प्र.से.) तसेच कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Chief Guest Hon. Ms. Sarita Kaushik, Executive Editor, ABP Majha, expressing her views during the book release programme of "History of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University" and distribution of mementoes to University employees; with In-charge Professor Dr. Shyamrao Koreti, Dr. Samay Bansod, Management Council Nominee Member, In-charge Vice-Chancellor Dr. Madhavi Khode Chaware (I.A.S.) and Registrar Dr. Raju Hiwase present.

'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा इतिहास' या पुस्तकाचे विमोचन आणि विद्यापीठ कर्मचाऱ्यांना भेट वस्तू वितरण या समारंभप्रसंगी विचार व्यक्त करताना प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चावरे (भा.प्र.से.) व्यासपीठावर उपस्थित डॉ. श्यामराव कोरेटी, प्रभारी अधिष्ठाता, डॉ. समय बनसोड, मा. सुश्री सरिता कौशिक, कार्यकारी संपादक, एबीपी माझा व कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

In-charge Vice-Chancellor Dr. Madhavi Khode Chaware (I.A.S.) expressing her views during the book release programme of "History of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University" and distribution of mementoes to University employees; with Dean Dr. Shyamrao Koreti, Dr. Samay Bansod, Hon. Ms. Sarita Kaushik (ABP Majha), and Registrar Dr. Raju Hiwase present.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला सुरक्षितता व शिक्षणसुनी' या विषयावर विचार व्यक्त करताना शुभा राव. व्यासपीठावर उपस्थित प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. वंदना धवड आणि डॉ. शालिनी लिहीतकर.

Smt. Shubha Rao expressing her views on the topic "Women's Safety and Education" during the programme jointly organized by the Higher and Technical Education Department, Government of Maharashtra, and Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University; with Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Registrar Dr. Raju Hiwase, Dr. Vandana Dhawad and Dr. Shalini Lihitakar present.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत 'भूमिहीन शेतमजूर' या कार्यशाळेचे उद्घाटन करताना मा. श्री. श्यामप्रसादजी. व्यासपीठावर उपस्थित प्र–कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे व इतर.

Hon. Shri. Shyamprasadji inaugurating the workshop titled "Bhumihin Shetmajur" at Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University; with Pro Vice-Chancellor Dr. Rajendra Kakade and others present on the dais.

विद्यापीठाद्वारे कै. दादा मनोहरराव कल्लावार स्मृतिव्याख्यानमालेत 'महात्मा बसवेश्वरांच्या कार्याची समकालीनतेतील उपयुक्तता' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना मंचावर डॉ. गोविंद गणाजी नांदेडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना प्रभारी अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी व श्री. अभय कल्लावार.

Dean & Professor Dr. Shyamrao Koreti and Shri Abhay Kallawar welcoming Chief Guest Dr. Govind Ganaji Nandede by presenting a memento during the Dr. Dada Manoharrao Kallawar Memorial Lecture Series organized by the University, where Dr. Nandede expressed his views on "The contemporary relevance of Mahatma Basaweshwar's work.".

विद्यापीठाद्वारे मौलाना अब्दुल करीम पारेख स्मृती व्याख्यानमालेत ' Role of Religion in Character Building' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना हितवादचे संपादक मा. श्री. विजय फणशीकर. शेजारी डॉ. वीणा दांडे, प्रभारी अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी व डॉ. विजय खंडाळ.

Hon. Shri Vijay Phanashikar, Editor of Hitavada, expressing his views on the topic "Role of Religion in Character Building" during the Moulana Abdul Karim Parekh Memorial Lecture Series; with Dr. Veena Dandhe, In-charge Dean & Professor Dr. Shyamrao Koreti and Dr. Vijay Khandal present.

'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा इतिहास' या पुस्तकाचे विमोचन करताना मा. सुश्री सरिता कौशिक, कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. समय बनसोड, प्रभारी अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी, प्रकाशन अधिकारी श्री. प्रविण गोतमारे व इतर मान्यवर.

Hon. Ms. Sarita Kaushik, Executive Editor, ABP Majha, releasing the book "History of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University" with In-charge Vice-Chancellor Dr. Madhavi Khode Chaware, Registrar Dr. Raju Hiwase, Dr. Samay Bansod, In-charge Dean & Professor Dr. Shyamrao Koreti, Publication Officer Shri Pravin Gotmare and other dignitaries present.

'राष्ट्रसंतांची जनजागृती चळवळ ग्रंथ' व 'वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवनदर्शन' या ग्रंथांचे विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव पर्वावर पद्मविभूषण मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. सी. डी. मायी, प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Release of the books "Rashtrasant's Mass Awareness Thought Stream" and "An Insight into the Life and Thought of Rashtrasant Tukadoji Maharaj" during the Centenary Celebrations of the University; with Padma Vibhushan Dr. Raghunath Mashelkar, Dr. C. D. Mayi, In-charge Vice-Chancellor Dr. Prashant Bokare, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Registrar Dr. Raju Hiwase present.

वंदनीय राष्ट्रसंतांची पुण्यतिथी निमित्त ग्रामगीता भवनामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर लघुचित्रपट पाहण्यास आलेले प्रेक्षक.

Floral tribute offered at the statue of Rashtrasant Tukadoji Maharaj at his birthplace village during the commemorative programme.

विद्यापीठाद्वारे आयोजित 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अपेक्षित विद्यार्थी आणि जीवनशिक्षण' या विषयावर व्याख्यानमालेप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना प्रभारी अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी. शेजारी मा. सकेत काले, श्रीक्षेत्र रेवसा, जि. अमरावती आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनाच्या विभागप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे.

In-charge Dean & Professor Dr. Shyamrao Koreti expressing his views during the lecture organized by the University on the topic "Students Dedicated to Rashtrasant Tukadoji Maharaj and His Life Philosophy"; with Hon. Shri Sanket Kale, Shri Kshetra Rewasa (District Amravati), and Head of the Rashtrasant Tukadoji Maharaj Studies Department Dr. Vijayalaxmi Thote present.

'जिल्हा युवा संसद' या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित कार्यक्रमात सहभागी प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भा.प्र.से.), कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. समय बनसोड व डॉ. सोपानदेव पिसे.

In-charge Vice-Chancellor Dr. Madhavi Khode Chaware (I.A.S.) participating in the programme organized by the National Service Scheme Department titled "District Youth Parliament" with Registrar Dr. Raju Hiwase, Dr. Samay Bansod and Dr. Sopandev Pise.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिर, ओढीशा येथे एकत्रित आलेले विद्यार्थीगण.

Students participating in the National Integration Camp organized by the University National Service Scheme Department at Odisha.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे मुंबई येथे प्रजासत्ताक दिन पथसंचालन निवड शिबिरासाठे सहभागी स्वयंसेवक व विद्यार्थी गण.

Selected volunteers and students of the National Service Scheme Department of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University participating in Republic Day celebrations held in Mumbai.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे स्वच्छता सेवा व जनजागृती अभियान रैली मध्ये सहभागी झालेले विद्यार्थी गण.

Students participating in the cleanliness drive and public awareness campaign organized by the National Service Scheme Department.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आपले विचार व्यक्त करताना प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे. शेजारी डॉ. सोपानदेव पिसे आणि इतर मान्यवर.

Pro-Vice-Chancellor Dr. Rajendra Kakde expressing his thoughts on the occassion of the Death Anniversary of fredom fighter V. D. Sawarkar organized by the National Service Scheme. Dr. Sopandev Pise and other dignitaries present.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिनाप्रसंगी योगासने करताना विद्यार्थीगण.

Students performing Yogasan on the occasion of International Yoga Day organized by the Department of National Service Scheme.

राष्ट्रीय सेवा योजना

समन्वयक : डॉ. सोपानदेव पिसे

MY भारत पोर्टलवर नोंदणीकृत संस्था, एकूण ZBSA खाते उघडलेली संख्या २४१, आजपर्यंत ZBSA खाते मॅप केलेली संख्या २३७, शासकीय संस्था ४ (NSS स्वयंसेवक क्षमता – ५००), खासगी संस्था २३७ (NSS स्वयंसेवक क्षमता – २९,६५०),

राज्य शासनाने नियमित उपक्रमांसाठी दिलेली NSS क्षमता (अनुदानित) – ३०,१५०, विद्यापीठ/संचालनालयातील एकूण NSS युनिट्स – ३४०, वर्षभरातील प्रत्यक्ष नोंदणी एकूण ३०,१५०, (स्व–विपुरवठा युनिट) – ३५००, विद्यापीठातील स्व–वित्तपुरवठा NSS युनिट्स – ६०, वर्षभरातील प्रत्यक्ष नोंदणी एकूण – ३५००.

राज्य शासनाने यावर्षी विशेष शिबिरांसाठी दिलेली क्षमता – १५,०७५, आयोजित विशेष शिबिरे – १९२, दत्तक घेतलेली गावे – १९२, विशेष शिबिरातील स्वयंसेवक एकूण १४,४५०. एकूण NSS कार्यक्रम अधिकारी एकूण ३४६, प्रशिक्षित कार्यक्रम अधिकारी एकूण २०२, अप्रमाणित कार्यक्रम अधिकारी एकूण १४४.

वृक्षारोपण : राष्ट्रीय सेवा योजना या विभागांतर्गत वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन, हरितगृह परिणाम नियंत्रण व निसर्गप्रेमाची जाणीव देणे हा होता. या उपक्रमादरम्यान स्वयंसेवकांनी एकूण २६,१७० रोपे लावली. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव निर्माण झाली तसेच स्थानिक नागरिकांमध्ये वृक्षलागवडीचे महत्त्व प्रभावीपणे पोहोचविण्यात आले.

रक्तदान शिबिरे : राष्ट्रीय सेवा योजना या विभागांतर्गत रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व पटवून देणे, समाजात जीव वाचविण्याची जाणीव निर्माण करणे तसेच निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण २४६ रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली. एकूण ८१३२ स्वयंसेवकांनी रक्तदान केले.

पल्स पोलिओ लसीकरण : या विभागांतर्गत पल्स पोलिओ लसीकरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वयंसेवकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना रोगप्रतिबंधक लसीकरणाचे महत्त्व समजावून देणे, बालकांना पोलिओसारख्या आजारापासून संरक्षण मिळवून देणे तसेच जनजागृती निर्माण करणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण ३८११ स्वयंसेवक सहभागी झाले. या मोहिमेमुळे एकूण ३९१२ बालकांना लसीकरणाचा थेट लाभ मिळाला.

आरोग्य/नेत्र/थॅलेसेमिया/लसीकरण शिबिरे : या घेतलेल्या कार्यक्रमात आरोग्य संवर्धन, रोगप्रतिबंध, रक्तविकार जनजागृती तसेच निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण १८६ शिबिरे आयोजित करण्यात आली. एकूण ८६२० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

जागृती कार्यक्रम/रॅली/अभियान/स्वच्छता अभियान : या कार्यक्रमात सामाजिक प्रश्नांविषयी जनजागृती करणे, पर्यावरण व स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे तसेच नागरिकांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण २१४ कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यात एकूण १६८१३ स्वयंसेवक सहभागी झाले.

श्रमदान : या कार्यक्रमाचा उद्देश सामूहिक श्रमाचे महत्त्व पटवून देणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे तसेच समाजात स्वावलंबन आणि कार्यसंस्कृतीची जाणीव निर्माण करणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण १९४ श्रमदान कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये एकूण १४,४५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. स्वयंसेवकांनी एकूण ५६,९१३ तास श्रमदानासाठी दिले.

स्वसंरक्षण प्रशिक्षण : विभागात स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना आत्मसंरक्षणाचे कौशल्य प्राप्त करून देणे, महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे तसेच सुरक्षित समाजाची जाणीव करून देणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण ५२ कार्यक्रमात एकूण १८४२ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण : या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना भूकंप, पूर, आगीसारख्या आपत्ती काळात स्वत:चे व समाजाचे रक्षण करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण १६० स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यात आले तसेच प्रत्यक्ष सरावामध्ये १०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

विद्यापीठ स्तरावरील/युनिट स्तरावरील आयोजित प्रमुख कार्यक्रम :

दि. ५ एप्रिल २०२४ रोजी, स्थळ सुरेश भट सभागृह येथे करण्यात आले. या SVEEP कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना

मतदार जनजागृतीचे महत्त्व पटवून देणे तसेच लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्यास प्रवृत्त करणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण ३६६ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सुमारे १०९८ लाभार्थ्यांपर्यंत मतदार जनजागृतीचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.

आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम दि. २१ जून २०२४ रोजी विद्यापीठाचा सेंटर हॉल येथे पार पडला. या कार्यक्रमाचा उद्देश शारीरिक–मानसिक स्वास्थ्य, योगाचे महत्त्व व निरोगी जीवनशैलीची जाणीव करून देणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण १७१ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा थेट लाभ एकूण ६८४ नागरिकांना झाला.

'हर घर तिरंगा' हा कार्यक्रम दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित करण्यात आला. या उपक्रमादरम्यान एकूण ३२८ स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा थेट लाभ ११४८ नागरिकांपर्यंत पोहोचला. NSS स्थापना दिन तसेच NSS पुरस्कार वितरण समारंभ दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडला. या कार्यक्रमाचा उद्देश समाजसेवेची भावना वाढवणे, NSS च्या कार्याची जाणीव करणे व पुरस्कार वितरणाद्वारे प्रेरणा निर्माण करणे हा होता. या उपक्रमादरम्यान एकूण ३३६ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. स्वच्छता दौड कार्यक्रम दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी संविधान चौक येथे आयोजित करण्यात आला. या उपक्रमादरम्यान एकूण ७९१ स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा थेट लाभ २३७३ नागरिकांपर्यंत पोहोचला. वार्षिक नियोजन बैठक दि. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी गुरुनानक हॉल येथे घेण्यात आली. या उपक्रमादरम्यान एकूण ३४६ स्वयंसेवकांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला. संविधान दिन कार्यक्रम दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी साजरा करण्यात आला. या उपक्रमादरम्यान एकूण ४५२ स्वयंसेवकांनी संविधानाची शपथ घेतली.

महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी दीक्षाभूमी येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमादरम्यान एकूण ६७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा थेट लाभ ३३,७५५ नागरिकांपर्यंत पोहोचला. लिंग समानता व सायबर सुरक्षाविषयक कार्यक्रम दि. १० डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला. या उपक्रमादरम्यान एकूण २४१ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा थेट लाभ ९३९ नागरिकांपर्यंत पोहोचला. अल्पसंख्याक दिन कार्यक्रम दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी साजरा करण्यात आला. या उपक्रमादरम्यान एकूण २८१ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. उद्योग महोत्सव दि. ७ ते ९ फेब्रुवारी २०२५ दरम्यान स्थळ विद्यापीठ कॅम्पस येथे आयोजित करण्यात आला. या उपक्रमादरम्यान एकूण १३६६ स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती कार्यक्रम दि. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरी करण्यात आली. या उपक्रमादरम्यान एकूण १८३ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा थेट लाभ ९१५ नागरिकांपर्यंत पोहोचला. जिल्हा युवा संसद कार्यक्रम दिनांक १८ व १९ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आला. यामध्ये एकूण १५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

विद्यापीठ छंद मंदिर

उद्देश : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेनुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने इ. स. १९६० मध्ये विद्यापीठाच्या तसेच विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे कौशल्य व कार्यक्षमतेच्या सर्वांगीण विकासाकरिता निरनिराळ्या छंद अभ्यासक्रमात प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने हे हॉबी वर्कशॉप स्थापन केलेले आहे. छंद मंदिर (Hobby Workshop) विभागात खालील छंदात विद्यार्थ्यांना छंद प्रशिक्षण देण्यात येते.

छंद वर्कशॉपमध्ये निरनिराळ्या छंद अभ्यासक्रमात विद्यार्थी प्रवेश घेऊन छंद प्रशिक्षण पूर्ण करतात.

१. डिजीटल फोटोग्राफी – डिजीटल कॅमेऱ्याचे आधारे फोटो काढण्याची कला.

२. मातीकाम व पेंटिंग – मातीपासून सुंदर मूर्ती व पुतळे नक्षीकाम करणे व त्यास रंगविण्याची कला.

३. इलेक्ट्रॉनिक्स – दैनंदिन वापरातील वस्तुंचे इलेक्ट्रॉनिक्स मॉडेल बसविण्याची कला.

४. मोबाईल फोन रिपेअरिंग– मोबाईल फोनमध्ये निर्माण झालेले दोष सुधारण्याची कला.

छंद कार्यशाळेमध्ये एखादी वस्तू तयार करण्याचा उद्देश प्रथम डोळ्यासमोर ठेवला जातो. ती वस्तू तयार करीत असतांना सर्व कृती नीट समजावून विद्यार्थ्यांकडून करवून घेतल्या जाते. प्रबोधक आणि प्रतिचार (stimulus and response) या पद्धतीचा छंद कार्यशाळेमध्ये अवलंब केला जातो. अशाप्रकारे शिकण्यात विद्यार्थ्यांना गोडी वाटते व सर्व कृतीचे ज्ञान सहजच होते.

विद्यार्थी कॉलेजमधील असल्यामुळे त्याला अगदी नेहमीच्या साध्या वस्तूपेक्षा काही तरी नावीन्य असलेल्या वस्तूंची विशेष गोडी वाटते. उदा. अगदी व्यवहारातील वस्तू ज्या अतिशय आकर्षक रितीने केलेल्या असतात अथवा वर्किंग मॉडेल्स इत्यादी विद्यार्थ्यांना फार आवडतात. म्हणून अशा प्रकारच्या वस्तू त्याना छंद कार्यशाळेमध्ये तयार करायला विद्यार्थ्यांना सांगण्यात येतात. शाळा अगर कॉलेजात शिकलेल्या वैज्ञानिक तत्त्वांचा विद्यार्थी येथे प्रत्यक्षात उपयोग करतो

छंद कार्यशाळेच्या माहितीचे प्रसारण

छंद मंदिरात शिकविण्यात येणाऱ्या छंद अभ्यासक्रमाविषयीची माहिती विविध महाविद्यालयात परिपत्रक पाठवून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची व्यवस्था करण्यात आली. तरी आता विद्यार्थी छंद मंदिरात येऊन माहिती घेतात.

विद्यापीठ सेवा उपस्कर बांधणी केंद्र

विद्यापीठ सेवा उपस्कर बांधणी केंद्राची स्थापना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेनुसार १९८० साली झाली. विद्यापीठाचे विज्ञान विभागातील विद्यार्थी व संशोधन करणारे विद्यार्थी यांना तांत्रिक कार्यासंबंधी सेवा देणे तसेच प्रयोगशाळेतील उपकरणांची निगा व दुरुस्तीची कामे, संशोधनात्मक कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांची देखभाल व काचेचे साहित्य बनविणे इत्यादी कामे या विभागात पार पाडली जातात. सद्य:स्थितीत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार सदर केंद्र विद्यापीठाचे 'सेवा युनिट' म्हणून कार्यरत आहे.सेवा उपस्कर बांधणी केंद्राच्या विभागामध्ये खालीलप्रमाणे उपविभाग आहेत.

१. यांत्रिकी कार्यशाळा २. काचफुगारी विभाग ३. पृथक्करणीय विभाग ४. विद्युत उपकरणे व दुरुस्ती विभाग

सद्य:स्थितीत विद्युत उपकरणे व दुरुस्ती विभाग सक्रिय असून संशोधनात वापरण्यात येणारी तांत्रिक उपकरणे, संगणक व प्रिंटरशी निगडीत एकूण ९५ कामे अहवाल कालावधीत पार पाडण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त, विद्यापीठाअंतर्गत मोडत असलेल्या विभागांना उपकरणे खरेदी करण्याकरिता ना–हरकत प्रमाणपत्र देणे व विभागांना तांत्रिक कार्यासंबंधी सेवा पुरविण्याची कामे केंद्राद्वारे पार पाडण्यात येत असते.

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त्य आजी–माजी शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा स्नेह मेळावा समारंभ :

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त्य आजी–माजी शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या स्नेह मेळ्याव्याचे आयोजन दि. २ ऑगस्ट, २०२४ रोजी डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कवी कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे तसेच कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठाचे आजी–माजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त्य मा. कुलगुरू आणि माजी विद्यार्थी समितीचे सन्माननीय सदस्य माजी विद्यार्थी महामेळावा उद्घाटन समारंभ :

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त्य मा. कुलगुरू आणि माजी विद्यार्थी समितीचे सन्माननीय सदस्य माजी विद्यार्थी महामेळावा उद्घाटन समारंभाचे आयोजन दि. ३ ऑगस्ट, २०२४ रोजी डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. नितीनजी गडकरी (मा. मंत्री, परिवहन व महामार्ग विभाग, भारत सरकार), उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, सन्मान्य अतिथी मा. न्यायमूर्ती श्री. विकास सिरपूरकर, सर्वोच्च न्यायालय (से.नि.), नागपूरचे प्रख्यात नेत्रतज्ज्ञ पद्मश्री डॉ. विकास महात्मे तसेच नागपूरचे प्रख्यात न्यूरो सर्जन पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे तसेच डॉ. मुरलीधर चांदेकर, डॉ. कल्पना पांडे, डॉ. राजेश सिंह यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचदिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शताब्दी महोत्सवानिमित्त्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत 'क्रांतीनायक' या नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अधिकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी ह्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

विद्यापीठाचा १०१ वा वर्धापनदिन व शताब्दी महोत्सव समापन समारंभ :

विद्यापीठाचा १०१ वा वर्धापनदिन सोहळा ४ ऑगस्ट, २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून एफ. आर. एस. चे माजी महासंचालक पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती श्री. सी. पी. राधाकृष्णन, कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, श्री. नितीनजी गडकरी, (मा. मंत्री, परिवहन व महामार्ग विभाग, भारत सरकार), उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे तसेच कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली सोहळा संपन्न झाला.

यावर्षी विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव समापन सभारंभा–निमित्त्य विज्ञान/शिक्षण/सामाजिक/औद्योगिक व इतर क्षेत्रात अतुलनीय कार्य करणारे मान्यवर डॉ. चारूदत्त दिगंबरराव मायी, नागपूर यांना 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार' प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात प्राचार्य श्री. बलराज अहेर स्मृती आदर्श शिक्षकेतर अधिकारी (वर्ग –२) सुवर्णपदक श्रीमती संगिता आत्राम (अधीक्षक, सामान्य परीक्षा व चौकशी विभाग) यांना प्रदान करण्यात आले. काटोलचे शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेला 'आदर्श शिक्षण संस्था' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आदर्श अधिकारी पुरस्कार श्री. संजय रामरावजी भोयर (अधीक्षक, विद्याशाखा), आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार श्री. मंगेश नामदेवराव उताणे (उच्च श्रेणी लिपिक, वित्त व लेखा विभाग), श्री. दिलीप पांडुरंग लंगडे (चपराशी, गृहविज्ञान विभाग) श्री. दुर्गेशसिंग केवलसिंग बैस (फर्रास, मा. कुलसचिवांचे कार्यालय) तसेच संलग्नित महाविद्यालयातील वर्ग – ३ आणि ४ मधील कर्मचारी श्री. संदीप मनोहर कोठार (वरिष्ठ लिपिक,

मातृसेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क, नागपूर), श्री. युवराज सज्जन गजघाटे (प्रयोगशाला परिचर, हिस्लॉप महाविद्यालय, नागपूर) यांना देण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी आमदार निवास येथील उपहारगृहात स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

शिक्षक दिन समारोह :

विद्यापीठाद्वारे आयोजित शिक्षक दिनानिमित्त 'शताब्दी महोत्सव पुरस्कार प्रदान समारंभ' दिनांक ५ सप्टेंबर, २०२४ रोजी विद्यापीठाचे गुरूनानक भवन येथे आयोजित करण्यात आला होता. या समारोहाला विश्वेश्वरैया राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, नागपूरचे डॉ. प्रेम लाल पटेल प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे तसेच कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती.

२०२४ या वर्षामध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल 'डॉ. आर. कृष्णकुमार सुवर्णपदक' प्राचार्य डॉ. सुजित मैत्रे, बिंझानी नगर महाविद्यालय, उमरेड रोड, नागपूर यांना प्रदान करण्यात आले.

तसेच डॉ. सचिन पी. उंटवाले (जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, हिंगणा रोड, नागपूर), डॉ. विठ्ठल गुलाबराव अरजपुरे (सुर्योदय कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, विहीरगांव, उमरेड रोड, नागपूर ग्रामीण) यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार तर विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतून डॉ. नंदकिशोर एन. करडे (प्राध्यापक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ रसायनशास्त्र विभाग) आणि आंतर-विद्याशाखेतून डॉ. प्रीन्स अजयकुमार तेजराम आगाशे (प्राध्यापक, मातृसेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशलवर्क, नागपूर) यांना विद्यापीठाचे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

विद्यापीठाचे उत्कृष्ट संशोधक पुरस्कार प्रो. विना एस. बेलगमवार (प्राध्यापक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ औषधिनिर्माणशास्त्र विभाग) व डॉ. मिनहाज अहमद ए. रेहमान (सेंट विन्सेंट पलोटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, गवसी मानापूर, वर्धा रोड, नागपूर)यांना प्रदान करण्यात आले.

उत्कृष्ट समाजकार्य डॉ. राहुल श्याम खराबे (प्राध्यापक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, व्यवसाय प्रबंधन विभाग) उत्कृष्ट लेखन पुरस्कार डॉ. शालिनी आर. लिहीतकर (प्राध्यापक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ग्रंथालय व माहितीशास्त्रज्ञ विभाग) यांना प्रदान करण्यात आले.

शताब्दी महोत्सव समारंभ :

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त्य विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनामध्ये दि. २४ मार्च, २०२५ रोजी 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा इतिहास' या पुस्तकाचे विमोचन आणि विद्यापीठ कर्मचाऱ्यांना भेट वस्तू वितरण' हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी मा. सुश्री सरिता कौशिक, कार्यकारी संपादक एबीपी माझा, कार्यक्रमाच्या अध्यक्षा कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. समय बनसोड, प्रभारी अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर उपस्थित असून कर्मचाऱ्यांना भेटवस्तूचे वितरण करण्यात आले.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी :

विद्यापीठाच्या वतीने ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी ग्रामगीतेच्या माध्यमातून ग्रामविकासाची शिकवण देणारे वंदनीय राष्ट्रसंतांची पुण्यतिथी ग्रामगीता भवनामध्ये साजरी करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन विभागाद्वारे 'लघुचित्रपट' आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त व्याख्यान :

विद्यापीठाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी, २०२५ ला व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनामध्ये विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे ह्यांचे अध्यक्षतेखाली तसेच कुलसचिव डॉ. राजू हिवसे ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा जयंती उत्सव पार पडला. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. हरिदास आखरे ह्यांचे 'छत्रपती शिवरायांचा लोक कल्याणकारी स्वराज्य विचार' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

मराठी भाषा गौरव दिन :

कविवर्य श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्य मराठी विभागात दि. २९ फेब्रुवारी, २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने महाराष्ट्र टाईम्सचे संपादक श्री. श्रीपाद अपराजित ह्यांनी 'मराठी भाषा व साहित्य : सद्य:स्थिती आणि आव्हाने' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी मानवविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे आणि शिक्षक व

शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ११६ वी ग्रामजयंती :

दि. ३० एप्रिल, २०२५ रोजी वंदनीय राष्ट्रसंतांची ११६ वी जयंतीनिमित्त विद्यापीठातील राष्ट्रसंतांच्या पुतळ्यास माल्यार्पण करण्यात आले. अत्यंत पवित्र व उल्हासित वातावरणात ग्रामजयंती साजरी झाली. याप्रसंगी ग्रामगीता भवनामध्ये ह. भ. प. श्री. हेमंत मेश्राम महाराज यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच २ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता ग्रामगीता भवन ते जमनालाल बजाज प्रशासकीय भवनपर्यंत रामधून काढण्यात आली होती. श्री. गोपालजी सालोडकर (सुप्रसिद्ध गायक व संगीतकार) यांचे युगप्रवर्तक वं. राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांचे संगीतमय जीवनदर्शन सादर करण्यात आले. याप्रसंगी कॅन्सर तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर आणि बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाच्या कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भा.प्र.से.) यांनी भूषविले. त्याप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. सुभाष कोंडावार, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. समय बनसोड, डॉ. शामराव कोरेटी, डॉ. संजय कविश्वर, डॉ. विजयालक्ष्मी थोटे आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा जयंतीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यशाळा

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर एक दिवसीय विभागस्तरीय कार्यशाळेचे आयोजन दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी विद्यापीठाचे गुरूनानक भवन, नागपूर येथे करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, गृहविज्ञान विभागाच्या विभागप्रमुख डॉ. वंदना धवड, कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समितीच्या अध्यक्षा डॉ. शालिनी लिहीतकर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. जनकल्याणकारी समिती, नागपूर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'भूमिहीन शेतमजूर' या विषयावर दि. ६ मार्च २०२५ रोजी कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनामध्ये करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी हैद्राबादचे सामाजिक समरस्त मंचचे राष्ट्रीय संयोजक श्री. श्याम प्रसाद, अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू डा. प्रशांत बोकारे होते. प्र–कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे तसेच विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

